


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१७६ ■ रविवार ६ एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26


श्री नेत्रालय हॉस्पिटल नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

# कर्जमाफीच्या पैशात तुम्ही साखरपुडे, लग्न करतात! शेतकऱ्यांवरील वक्तव्यानंतर कृषिमंत्री पुन्हा वादात

**नाशिक, दि.५- कर्जमाफीच्या पैशात शेतकरी साखरपुडे, लग्न करतात, असे म्हणत राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेतला आहे. नाशिक दौऱ्यावर असलेल्या कृषीमंत्री कोकाटेंनी शेतकरी कर्जमाफीसंदर्भात वादग्रस्त विधान केल्याने राज्यभरातील शेतकरी, विरोधकांकडून त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला जात आहे.**

नाशिकमध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी माणिकराव कोकाटे आले होते. यावेळी कोकाटेंनी शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि पैशाच्या वापराबाबत नाराजी व्यक्त केली. एका शेतकऱ्याने त्यांना कर्जमाफीबाबत थेट प्रश्न विचारला, अजित पवार म्हणाले की कर्जमाफी होणार नाही मग रेग्युलर कर्ज भरणाऱ्यांना कर्जमाफी मिळेल का? या प्रश्नावर कोकाटे यांनी उत्तर देताना स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली आणि शेतकऱ्यांचा रोषही ओढावून घेतला. जे शेतकरी कर्ज वेळेवर फेडतात त्यांनी फेडावं पण अनेकजण पाच-दहा वर्ष फक्त कर्जमाफीची वाट बघतात. कर्ज घेतात आणि काही भरत नाहीत. आणि जेव्हा कर्जमाफी होते तेव्हा मिळालेल्या त्या पैशांचा उपयोग शेतीसाठी होतो का? एक रुपयाचीही गुंतवणूक शेतीत करता का? असा थेट सवाल त्यांनी शेतकऱ्याला केला.



सरकार शेतकऱ्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विविध योजना देते, त्यामध्ये पाईपलाईन, सिंचन, शेततळे अशा योजना समाविष्ट आहेत. पण शेतकऱ्यांकडून या निधीचा उपयोग शेतीत करण्याऐवजी वैयक्तिक खर्चासाठी होतो, अशी टीका त्यांनी केली. तुम्ही पीक विमा मागता, पण त्या पैशांतून साखरपुडे करता, लग्न करता, असे कोकाटे उपस्थित शेतकऱ्यांना संबोधत म्हणाले. यावेळी त्यांनी थेट शेतकऱ्यांच्या आर्थिक सवयींवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले. (पान ८ वर)

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचे नाशिकमध्ये जय श्रीराम

नाशिक, दि.५- प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर हर्षवर्धन सपकाळ हे प्रथमच नाशिकमध्ये येत आहेत. रविवारी दि.६ रोजी रामनवमी असल्याने नाशिकच्या प्रसिद्ध श्री काळाराम मंदिरात भेट देऊन ते जय श्री रामचा नारा देणार आहेत. नाशिक शहरातील पंचवटी परिसरात काळाराम मंदिर आहे. अयोध्येतील श्री राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा होण्यापूर्वी स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील काळाराम मंदिरात आले होते. त्यांनी काळाराम मंदिरात आरती करून स्वच्छता केली होती. त्यानंतर देशभरात हे मंदिर चर्चेत आले होते. पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यानंतर अयोध्येत राम मंदिराच्या लोकार्पणाची धूम असताना (पान ८ वर)

# विभागीय आदर्श क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर नंदुरबार, धुळ्यातील शिक्षकांचा समावेश; आज होणार वितरण

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- नाशिक विभागीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कारासाठी नंदुरबार येथील जगदिश पाटील व युवराज पाटील तर आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारासाठी येथील मुख्याध्यापक सुषमा शाह व नूतनवर्षा वळवी यांची निवड करण्यात आली आहे. रविवार सहा एप्रिल रोजी जळगांव येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.**

महाराष्ट्र शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ व जिल्हा क्रीडा कार्यालय जळगाव यांच्यावतीने यावर्षी नाशिक विभागातील आदर्श क्रीडा शिक्षक व मुख्याध्यापक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षीपासून विभागातील त्या-त्या जिल्ह्यात क्रीडा क्षेत्रास सतत सहकार्य करणारे व योगदान देणारे मुख्याध्यापक यांनाही या पुरस्कारात समाविष्ट करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित पुरस्कार सोहळ्याचे आयोजन जळगाव जिल्ह्यास मिळाले आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये नाशिक- आदर्श मुख्याध्यापक संजय चव्हाण (जुहरमल सरूपचंद रुंगठा हायस्कूल, अशोकस्तंभ, नाशिक), क्रीडा शिक्षक किशोर राजगुरू (लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक), राजाराम पोटे (मराठा हायस्कूल, शिवाजीनगर, नाशिक), धुळे मुख्याध्यापक संजय पवार (राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, धुळे), फादर जॉय व्हेटोली सी एम आय (चावरा हायस्कूल, धुळे), क्रीडा शिक्षक डॉ.भूपेंद्र मालपुरे (जो.रा.सिटी व द.मा.बारी कनिष्ठ महाविद्यालय, धुळे), विजय एकनाथ सिसोदे (एच.आर. पटेल कन्या व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरपूर, धुळे), जळगाव मुख्याध्यापक लक्ष्मण तायडे (भाऊसाहेब राऊत विद्यालय, जळगाव), चंद्रशेखर पाटील (बी.यू.एन. रायसोनी विद्यालय, जळगाव), क्रीडा शिक्षक निलेश पाटील (जयदुर्गा माध्यमिक विद्यालय, मेहरून), योगेश सोनवणे (पान ८ वर)



# धुळे तालुक्यातील रस्ते दुरुस्तीसाठी केंद्राकडून १५ कोटी रुपये मंजूर

**धुळे, दि.५- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी धुळे तालुक्यातील रस्ता दुरुस्तीसाठी १५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या कामांची लवकरच निविदा निघणार असल्याची माहिती आ.भदाणे यांनी दिली आहे.**

शहराला जोडणारे तालुक्यातील सर्व रस्ते चकचकित व दर्जेदार करण्यासाठी आमदार राम भदाणे यांनी नियोजन केले आले. रस्ते दुरुस्ती साठी केंद्राकडून जास्तीत जास्त निधी आणण्याचा त्यांचा प्रयतक आहे. यासठी त्यांचा सतत पाठपुरावा सुरु आहे. नुकताच त्यांनी बोरिस ते निकुंभे -ढढाने- धोंडी, नगाव- बिलाडी-जापी- शिरढाने-नावरा-नावरी या रस्तासाठी केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. पाठपुरावाची दखल घेत रस्ते दुरस्तीसाठी केंद्राने १५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. तालूक्यातील रस्ता दुरुस्ती साठी निधी मंजूर झाल्या बद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. तालुक्यातील बोरिस ते निकुंभे मार्गे नावरा नवरी पर्यंत या रस्तावरती रहदारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शेतकरी व व्यावसायिक यांच्या साठी हा मार्ग सोयस्कर आहे. यासाठी निधी मंजूर झाला आहे. तालुक्यातील अनेक रस्ते दुरुस्तीसाठी नियोजित आहेत. त्यांच्या (पान ८ वर)

## नंदुरबार जिल्ह्यात चोरीचे सत्र सुरुच

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात चोरीच्या घटनांत घट होत नसून घरफोडी व चोऱ्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. नंदुरबार शहरात विजय चंदू पाटील यांच्या मोबाईल चोरी झाला असून बसस्थानकात चोरट्याने मोबाईल लंपास केला. विजय पाटील हे मुळचे जळगाव येथील रहिवाशी आहेत. आसाने गावाकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असतांना मोबाईल लंपास करण्यात आला. तर नवापूर वॉटर झेट लुमन्स मशिन येथे लावलेले एचपी ईलेक्ट्रीक मोटार दोन एप्रिल ते तीन एप्रिल दरम्यान चोरीस गेले. पारस अशोक अग्रवाल यांनी फिर्याद दिल्याने नवापूर पोलिसात अमर तानाजी वसावे रा बंधारे व पियुष किसन पाडवी या दोन्ही संशयीताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तळोद्यात दोन गटात हाणामारी तलवार, लोखंडी रॉडचा वापर

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- गाडीवर दगड मारीत असल्याच्या कारणातून तळोदा शहरात दोन गटातील लोकांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडली. या हाणामारीत लाकडी डेंगारा, तलवार, लोखंडी रॉड, काठीने एकमेकांना मारहाण केल्यामुळे दोन गटातील सहा जण जखमी झाले आहेत. परस्परविरोधी फिर्यादीवरुन १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

तळोदा येथील पोलिस ठाण्यात एका महिलेने पहिली फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे की, शुभम दिघवा हा वाहनांवर दगड मारतो. या कारणावरुन वाद झाला. या वादातून तीन जणांनी महिलेला मारहाण करीत शिवीगाळ केली. तसेच तिच्या सा-सूलाही मारहाण करण्यात आली. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या महिलेचे पती व दीर या दोघांनाही हाताबुक्क्यासह लाकडी डेंगाऱ्याने मारहाण केली. या मारहाणीत महिलेच्या गळ्यातील सोन्या पोत तुटून पडल्याने नुकसान झाले आहे. याप्रकरणी शुभम संतोष दिघवा, आकाश संतोष दिघवा व एक जण (सर्व रा.जोहरीवाड तळोदा) अशा तिघांविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. वनसिंग (पान ८ वर)

## चाकूचा धाक दाखवून मुलीचा विनयभंग

नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- मांडवीचा रुणमालपाड या गावात तसेच आरोपीच्या गावात सतरा वर्ष आठ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीस डांबून ठेवत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एका विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चाकूचा धाक दाखवून मला तुझ्याशी लग्न.करायचे आहे,अशी धमकी देत तिला डांबून ठेवण्यात आले.तसेच तिचा विनयभंग करण्यात आला. या प्रकरणी दिपक सुंड्या वळवी रा मांडवीचा मोवडाबीपाडा याच्या विरोधात धडगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोउनि राजेंद्र पाटील यांच्याकडे या प्रकरणाचा तपास देण्यात आला आहे. ३१ मार्च रोजी रात्री पासून तर दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत विनयभंग करण्यात आला, अशी तक्रार करण्यात आली आहे.



# घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराच्या एल.सी.बी.ने मुसक्या आवळल्या

**धुळे, दि.५- चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन परिसरात झालेल्या घरफोडीतील आरोपीच्या एल.सी.बी.च्या पथकाने मुसक्या आवळल्या असून एक पसार झाला आहे. संशयित आरोपीकडून शहाण्णव हजार शंभर रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन परिसरातून घरातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याबाबत फिर्याद नोंदविण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास सुरू असतांना स्थानिक गुन्हे शाखेला मिळलेल्या माहितीनुसार, धुळ्यातील अंबिका नगरातील रीहान उर्फ पोपण्या फरीद पठाण (वय १९) या तरूणाला ताब्यात घेवून त्याने हा गुन्हा त्याचा साथीदार फैजान उर्फ इन्या मुजमिल अन्सारी (वय २५)रा.हाजी नगर, इसार मशिदजवळ,धुळे याच्यासोबत केल्याची कबुली दिली. फैजान अन्सारी पसार झाला असून रिहान पठाण याच्याकडून शहाण्णव हजार शंभर रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने व इतर साहित्य हस्तगत करण्यात आले आहेत. रिहान (पान ८ वर)



# वनकायद्याचा भंग; दगड, मुरुम चोरी मनपा अधिकाऱ्यांविरुद्ध गोटेंची तक्रार

**धुळे, दि.५- महापालिकेच्या आयुक्त, वनसंरक्षक व अन्य नऊ अधिकाऱ्यांनी वन कायद्याचा भंग केला आहे. दगड, मुरूमाची चोरी केली. विना परवानगीने देवपूर गट नंबर ४६ या वन विभागाच्या मालकीच्या आणि ताबे उपभोगातील पाच हेक्टर चाळीस आर जमिनीवर अतिक्रमण करून शासकीय गोदाम ते बिलाडी रस्ता निमाण करून वन खात्याचे नुकसान केल्याने संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. अशा मागणीचे निवेदन माजी आ. अनिल गोटे यांनी देवपूर पोलीस स्टेशनचे पोनि. धनंजय पाटील यांना दिले.**

मनपाच्या आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील, वनसंरक्षक निनुसिंग व इतर नऊ अधिकाऱ्यांनी वनकायद्याचा भंग केल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन मा.आ. गोटेंनी पोनि. धनंजय पाटील यांना दिले. यावेळी मा.आ.अनिल गोटे समवेत शिवसेना उबाठाचे जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख नरेंद्र परदेशी, डॉ.सोमनाथ चौधरी, चंद्रकांत हजारे, सचिन रूणवाल, विष्णु जावडेकर, दिपक जाधव, बंटी अहिरे, वैभव पाटील, निलेश कांजरेकर उपस्थित होते. गुन्हा दाखल करणार नसाल तर का दाखल करणार नाही ? त्यासंदर्भात पत्र द्यावे. अशी मागणीही केली.

## मोहाडी रोड परिसरात दिवसा दागिने लंपास

धुळे, दि.५- मोहाडी रोड परिसरातील गणपती मुर्ती कारखाना समोरील शिवतिर्थ अपार्टमेंट येथील घराचे कुलुप तोडून घरातील सोन्याचे दागिने भर दिवसा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. आश्रम शाळेतील कर्मचारी राजेंद्र धनराज पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिवतिर्थ अपार्टमेंट येथून फिर्यादीची पत्नी मुलीला सोडण्यासाठी निघाल्या. बाहेर जातांना घराला कुलुप लावले. अर्धा तासानंतर घरी आल्यानंतर घराला लावलेले कुलुप आढळून आले नाही. घरात जावून पाहिले असता बेडरूम मधील लाकडी कपाटाचे कुलुप तोडून एक लाख पासष्ट हजार (पान ८ वर)

# उत्सव काळात सलोखा कायम ठेवा उपविभागीय पो.अधिकाऱ्यांचे आवाहन

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- आगामी सण, उत्सव काळात सर्वांनी शांतता राखावी. सोशलमिडीयावर कुणीही आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करु नये तसेच अफवांवरही विश्वास ठेवू नये. शांतता राखून सर्वांनी एकोपा ठेवावा, असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन यांनी केले.**

नवापूर तालुक्यातील खांडबारा पोलिस दुरक्षेत्रात आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक घेण्यात आली. याप्रसंगी नंदुरबारचे उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन, विसरवाडीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, सरपंच अविनाश गावित, शैलेश गावित, बंडु भावसार, गणेश पाडवी, योगेश चौधरी, नयन जयस्वाल, अनिल शर्मा, अनुपम परदेशी, सनी चौधरी, सागर पाडवी, मनोज चौधरी, जगदीश चौधरी, खलील बेलदार, शानवाज खाटीक, ईलीयास (पान ८ वर)





# तपनभाई पटेल मेमो.हॉस्पिटलतर्फे रुग्णवाहिकेचे आज लोकार्पण

**शिरपूर, दि.५- एस.व्ही. के.एम. संचालित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व रिसर्च सेंटर शिरपूर आणि रसिकलाल पटेल मेडीकल फाऊन्डेशन अ‍ॅन्ड रिसर्च इंस्टीट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य रक्षक' रुग्ण वाहिका लोकार्पण सोहळा ६ एप्रिल रोजी दुपारी ४.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.**

प्रभु श्रीराम नवमीच्या शुभ मुहुर्तावर सर्व रुग्णांसाठी अत्याधुनिक आरोग्य सेवेत सुसज्ज अशी कार्डियाक 'आरोग्य रक्षक' रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विर्लेपार्ले केळवणी मंडळ सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल राहतील. आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते कार्यक्रम संपन्न होईल. सदर कार्यक्रम आर.सी.पटेल मेन बिल्डिंग येथे राजगोपाल भंडारी हॉलमध्ये संपन्न होत आहे.

# टॉवर फाऊंडेशन चोरी करणारी टोळी गजाआड सहासष्ट लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हा दाखल

**धुळे, दि.५- साक्री तालुक्यातील फोफादे गावाच्या शिवारात दि.४ एप्रिल रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास सुझलॉन कंपनीच्या टॉवरचे फाऊंडेशन टी-१० सेलमध्ये लोखंडाची चोरी झाली.या प्रकरणी निजामपुर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला. याघटनेतील चार संशयित आरोपींना ताब्यात घेवून सहासष्ट लाख सोळा हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली. इतर आरोपींचा शोध सुरू आहे.**



साक्री तालुक्यातील कॉपर वायर, सौर प्रकल्पातील उपयोगी साहित्य चोरीच्या घटना नेहमीच घडतात. निजामपूर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यांनी कंपनीच्या टॉवर फाऊंडेशन चोरणाऱ्या चौकडीला गजाआड केले आहे. त्यात वसीम खान शेर खान (वय ५४), मनजितसिंग समनामसिंग (वय ३२)रा. चिमाखुड्डी, तहसिल बरावा जि.गुरूदासपूर, पंजाब, राजबिरसिंग जसवंतसिंग (वय ३९)रा. चात्रील, तहसिल बराला जि.गुरूदासपूर ह.मु.छडवेल ता. साक्री,जि.धुळे, हरप्रितसिंग बलविंद सिंग (वय २३) रा. कलेरमगर तहसिल मजिरा जि.अमृतसर (पान ८ वर)

# करुणा शर्माच मुंडेंच्या पहिल्या पत्नी; कोर्टाचा धनंजय मुंडेंना धक्का

**माझगाव, दि.५ - तक्रारकर्त्या करुणा शर्माच आमदार धनंजय मुंडेंच्या पहिल्या पत्नी असल्याचा निर्वाळा शनिवार दि.५ एप्रिल रोजी माझगाव सत्र न्यायालयाने दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री धनंजय मुंडे यांना धक्का बसला आहे.**

करुणा शर्मा विरोधात दाखल करण्यात आलेली धनंजय मुंडे यांची याचिका न्यायालयाने शनिवारी फेटाळल्याने मुंडेंना दुसरा धक्का दिला आहे. न्यायालयाने करुणा शर्मा यांच्या बाजूने निकाल देत कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय काम ठेवला. आता या निकालाविरोधात धनंजय मुंडे उच्च न्यायालयात जाऊ शकतात. मात्र करुणा मुंडे सुमोटो दाखल करण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच करुणा शर्मा पोटगी वाढवण्याची मागणी करू शकतात. मुंबईतील कौटुंबिक न्यायालयाने करुणा शर्मा यांना धनंजय मुंडे यांची पत्नी ठरणारा निकाल दिला होता.



तसेच धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांना महिन्याला २ लाख रुपयांची पोटगी देण्याचे आदेश दिले होते. त्या निकालाविरोधात माझगाव न्यायालयात धनंजय मुंडे यांनी धाव घेतली होती. परंतु त्या ठिकाणी धनंजय मुंडे यांना धक्का बसला. त्यासाठी करुणा शर्मा यांनी दाखल केलेली कागदपत्रे महत्वाची ठरली.

### इच्छापत्र आणि स्वीकृतीपत्र

धनंजय मुंडे यांनी माझगाव सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याच्या तीन ते चार सुनावण्या झाल्या. त्यात शनिवारी करुणा शर्मा यांनी स्वत: युक्तीवाद केला. तसेच धनंजय मुंडे यांची पत्नी असल्याचा पुरावा म्हणून दोन महत्वाचे कागदपत्रे दिली. त्यात धनंजय मुंडे यांचे अंतिम इच्छापत्र आणि स्वीकृती पत्र होते. स्वीकृती पत्रात माझ्या घराच्या दबावापोटी मी लग्न करत आहे. पण करुणा मुंडे यांचा सांभाळ करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले होते. हे सर्व पुरावे तपासल्यानंतर वांद्रे कोर्टाचा निकाल माझगाव न्यायालयाने कायम ठेवला.

### मुंडेंनी दिला होता करुणांना नकार

कोर्टात धनंजय मुंडे यांनी मुलांचा सांभाळ करण्याची तयारी दर्शवली होती. परंतु करुणा शर्मा यांना पत्नी करण्यास नकार दिला होता. आता माझगाव न्यायालयाने पोटगी देण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. दोन लाख रुपये पोटगी करुणा शर्मा यांना मिळणार आहे. दरम्यान, आता करुणा शर्मा पोटगी वाढवून घेण्याची मागणी करण्याची शक्यता आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -82,900 रु.+3% GST
सोने- 24 K -90,500 रु.+3% GST
चांदी- 97,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सेवा
सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर
PATIENT SAFETY & QUALITY OF CARE NABH (ENTRY LEVEL) PRE ACCREDITED
आज रविवार रोजी सुप्रसिध्द हृदयरोग तज्ञ यांच्याकडून
मोफत हृदयरोग निदान शिबीर
आपणास कळविण्यात आनंद होतो कि सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्या तर्फे हृदयरोग निदान शिबीर आयोजन करण्यात आले आहे.
खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.
श्वास घेण्यास त्रास होणे | हृदयाचे ठोके वाढणे | छातीत धडधड होणे
डॉ. प्रितम दिलीप पाटील
एमबीबीएस, एमडी. डीएनबी
( कार्डिओलॉजी )
कन्सलटंटः इंटरवेंशनल कार्डिओलॉजिस्ट

तपासणी आणि ECG मोफत ( फ्री )
२ डी इको या चाचणीसाठी 50% सूट
वार. रविवार दि. - ०६/०४/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड,साक्री रोड, धुळे 02562 - 246333, 247555



# आमोदा माध्य.विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत सायकलींचे वाटप

**शहादा, दि.५ (प्रतिनिधी)- मानव विकास मिशन अंतर्गत इ. ८ वी ते १२ वी पर्यंत ५ किमी परीसरात ये-जा करणाऱ्या मुलींना मोफत सायकल दिली जाते. त्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय आमोदा येथे सायकल वाटप करण्यात आले.**

याप्रसंगी माजी.पं.स.सदस्य सत्येन वळवी यांच्या हस्ते सायकल पूजन करण्यात आले. श्रीफळ वाहुन कार्यक्रमास शुभारंभ करण्यात आला. सर्व मान्यवरांचे मुख्याध्यापक जगदिश पवार यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तसेच युवा सामाजिक कार्यकर्ते सागर नाईक, आमोदा केंद्रांचे केंद्रप्रमूख सुरेश भदाणे, आमोदा, फत्तेपूर, मडकाणी येथील पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.डी. पाटील यांनी केले तर आभार दिनेश सुर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रेमचंद अहिरराव यांना पुरस्कार जाहीर

धुळे, दि.५- येथील प्रसिद्ध कवी तथा शिवव्याख्याते प्रेमचंद अहिरराव यांच्या 'जंगल सहल' या कवितासंग्रहाला इंदौर (मध्यप्रदेश) येथील कवि वसंत राशिनकर काव्यसाधना अखिल भारतीय सन्मान २०२४ हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. परिस पब्लिकेशन पुणे यांनी हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे. इंदौर येथील आपले वाचनालयचे सचिव तथा प्रसिद्ध साहित्यिक संदीप राशिनकर व अध्यक्ष सचिन यवतीकर यांनी कळविले आहे. यापूर्वी प्रेमचंद अहिरराव यांच्या 'जंगल सहल' या कवितासंग्रहाची शासनाच्या ग्रंथालय संचालनालयामार्फत निवड झालेली असून कवी प्रेमचंद अहिरराव यांच्या कवितांचा समावेश महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या क्रमिक पाठ्यपुस्तक अभ्यासक्रमात झालेला आहे. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# नागझिरी साबलापाणीत उ.महाराष्ट्र विद्यापीठ संस्थेमार्फत शेतकरी मेळावा

**म्हसावद, दि.५ (प्रतिनिधी)- भविष्यातील वाढती जनसंख्या लक्षात घेता अन्नधान्यालाही मागणी वाढणार आहे. त्यामुळे आपल्या जमिनीला आपण आधी पेक्षा जास्त केले असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्रचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.राजेंद्र दहातोंडे यांनी केले. नुकतेच साबलापाणी (नागझिरी) येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांना उद्देशून ते बोलत होते.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टिव्हिटीज (सी.वाय.डी.ए.) व ए.एस.के. फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शहादा तालुक्यातील




नागझिरी (साबलापाणी) येथे या शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.राजेंद्र दहातोंडे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी उपस्थित आत्मा विभागाचे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री रवींद्र बच्छाव, कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक जाकीर शेख, पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक गुणवंत पाटील, कृषी सहाय्यक प्रियंका खेडकर आदी मान्यवरांनी शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. रवींद्र बच्छाव यांनी जैविक शेती विषयी मार्गदर्शन करताना डॉक्टर पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती उपक्रमाबद्दल माहिती दिली. तर जाकीर शेख यांनी महाराष्ट्र शासनातर्फे नैसर्गिक शेतीसाठी शेतकऱ्यांना मिळत असणाऱ्या अर्थसाह्य बद्दल माहिती सांगून योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे विषयी माहिती दिली. तर गुणवंत पाटील यांनी काही फायदेशीर जैविक कीडनाशकांविषयी माहिती देऊन ते तयार करण्याची पद्धत देखील सांगितली. तसेच गटशेती मुळे शेतकऱ्यांना होत असलेले विविध फायदे सांगून उपस्थित शेतकऱ्यांना गट शेती करण्यासाठी प्रोत्साहित केले.

या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक गौरव निकम यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जयश्री सपकाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीवायडीए संस्थेचे कर्मचारी नेहा ढोके, विकास पाडवी, गौरव निकम, आरती पावरा, युवराज चौधरी, फेंदा पावरा, दीपक पावरा आदींनी मेहनत घेतली.

# आर.सी.पटेल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड

**शिरपूर, दि.५ - येथील आर. सी. पटेल मराठी माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची मेड इन थ्रीडी फ्युचर आंतरप्रिनर या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर टॉप १५० मध्ये निवड झाली आहे.**

ही स्पर्धा डसॉल्ट सिस्टीम, ला फाउंडेशन या आंतरराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनी व भारत सरकार यांच्या अंतर्गत अटल इनोवेशन मिशन व नीती आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेची पुढील पायरी म्हणून टीम अटल युरेका या सहा विद्यार्थ्यांच्या निवड झालेल्या स्टार्टअप ला २१ हजार ५०० रु. प्रोजेक्ट बांधणीसाठी व स्टार्टअप ची रचना करण्यासाठी देण्यात आली. या रकमेतून विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रोजेक्टची बांधणी केली. त्यांच्या प्रोजेक्टचे नाव



अटल स्वच्छ असे होते. हा एक बहुउपयोगी प्रकारचा झाडू आहे जो प्रामुख्याने नगरपालिका व सफाई कर्मचाऱ्यांना केंद्रित करून बनविण्यात आला आहे.

या गटात तुषार निंबा सूर्यवंशी, तन्मय अंकुश मराठे, रितेश राजेंद्र मराठे, महेश सुधीर पाटील, यश राजेंद्र साळुंखे व वेदांत अरुण सूर्यवंशी या विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप ची टॉप १५० मध्ये निवड झाली आहे. प्रोजेक्ट हा तज्ञ समिती यांच्या विश्लेषणा खालून जाणार आहे व तिथे निवड झाल्यास ते संपूर्ण भारतात टॉप ३० मध्ये स्थान पटकावतील. या प्रकल्पाचे प्रमुख मार्गदर्शक पी. के. पाटील व सहाय्यक मार्गदर्शक श्रीमती के. एस. माहेश्वरी या दोघांचीही सुपर १५० मेंटोर मध्ये निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत वरील विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना आयोजक नीती आयोग देखील द सॉल्ट सिस्टीम यांच्यामार्फत विशेष बक्षीस म्हणजेच टी-शर्ट व डायरी देऊन त्यांना गौरविण्यात आले.

विद्यार्थी व शिक्षक यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, सर्व संचालक, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्य पी.आर. साळुंखे, पर्यवेक्षक एस. एन. पाटील यांनी अभिनंदन केले.

# आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया, सीईटी परीक्षेबाबत मार्गदर्शन

**शिरपूर, दि.५- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया व सी.ई.टी. परीक्षेबाबत मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली.**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात येत्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्ष बी.एड. सी.ई.टी. परीक्षा व प्रवेश प्रक्रियेवर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दोन सत्रात संपन्न झालेल्या या कार्यशाळेच्या पहिल्या टप्प्यात उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. दिपक बाविस्कर होते. प्रास्ताविकात डॉ. गजानन खेकाडे यांनी, बी.एड. सी.ई.टी. परीक्षेपूर्वी महाविद्यालय सी.ई.टी. परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन वर्ग घेऊन संपूर्ण अभ्यासक्रम व गुणभार तसेच महत्वपूर्ण अशा आशयावर मार्गदर्शन करते असे सांगितले.



उद्घाटनानंतर प्राचार्य डॉ. दिपक बाविस्कर यांनी दोन वर्षांच्या बी.एड. अभ्यासक्रमाचा आढावा दिला. त्यांनी अभ्यासक्रमाचे विविध विषय आणि घटक स्पष्ट केले. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्याची एकूण रचना समजण्यास मदत झाली. बीएड सीईटी परीक्षेचे स्वरूप आणि विविध विभागांमध्ये गुणांचे वितरण कसे केले जाते यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. सीईटीमध्ये येणाऱ्या प्रश्नांच्या प्रकारांबद्दल उपयुक्त माहिती दिली. कार्यशाळेच्या दुसऱ्या टप्प्यात बीएड सीईटी वर आधारित विभाग व विषय निहाय मार्गदर्शन सत्रे पार पडली. यात डॉ. विजेंद्र पुराणिक यांनी राजकीय शास्त्र, चालू घडामोडी, भाषा व साहित्य या आशयावर मार्गदर्शन केले. जे. एल. चौधरी यांनी नेतृत्व, संप्रेषण, महत्व या आशयावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रिया कुरकुरे यांनी बुद्धिमत्ता, डॉ. गजानन खेकाडे यांनी तार्किक तर्क, ईश्वर बोरसे यांनी भूगोल, डॉ. तुषार माळी यांनी शिक्षण व समाजातील प्रमुख घटक, श्रीमती जया बाविस्कर यांनी इतिहास विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालय द्वारा आयोजित या एक दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सहभागी काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीसह शालार्थ आयडीचा मार्ग मोकळा; शुभांगीताई पाटील यांचा पाठपुरावा

**धुळे, दि.५- राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः,पूर्णतः, अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे व पदभरतीचे प्रमाण निश्चित करणे बाबत शासन निर्णय काढून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा व शालार्थ आयडी चा मार्ग आज मोकळा झाला आहे.**

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांवरील शिक्षकेतर कर्मचारी ज्यामध्ये वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, ग्रंथपाल,शिपाई यांसारखी पदे शासनाने संच मान्यतेत व्यपगत केली होती. त्यामुळे या पदांची मागील अनेक वर्षापासून भरती रखडली होती. जे कर्मचारी या पदांवर काम करत होती, त्यांची वैयक्तिक मान्यता निघूनही शालार्थ आयडी साठी त्यांच्याकडून बिंदू नामावली अद्यावत नसल्यामुळे त्यांना आयडी मिळत नव्हता. या जीआर मुळे बिंदू नामावलीचा ही प्रश्न मार्गी लागणार आहे. तसेच मागील अनेक वर्षा पासून नियुक्ती रखडलेली होती. व त्यामुळे शाळेतील कामाचा पुरता बोजवारा उडालेला होता. या कर्मचाऱ्यांची कामे देखील शिक्षकांना करावी लागत. त्याचबरोबर अनेक वर्षांपासून या पदांवर काम करत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून नियुक्ती मिळत नसल्यामुळे शिक्षकेतर कर्मचारी



वेतनापासून व शासनाच्या पगारापासून वंचित होते. त्यांची पदे व्यपगत केल्यामुळे त्यांना शालार्थ आयडी देखील मिळत नसल्याने हे कर्मचारी मागील कित्येक वर्षापासून बिन पगारी काम करत होती. याबाबत असंख्य शिक्षकेतर कर्मचारी यांनी महाराष्ट्र टीचर्स असोसिएशनच्या राज्याध्यक्ष तथा शिवसेनेच्या राज्य उपनेते शुभांगीताई पाटील यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. त्या अनुषंगाने मागील अनेक दिवसांपासून शुभांगीताई पाटील या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीसाठी आग्रही होत्या. त्याबाबत त्यांचा मंत्रालय स्तरावर व संचालक कार्यालय स्तरावर सतत पाठपुरावा सुरू होता.याबाबत मागच्या आठवड्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळा सह शुभांगीताईंनी सदर विभागाशी संबंधित राज्य शासनाचे सचिव तुषार महाजन यांची भेट घेऊन सदर प्रश्न बाबत आग्रही भूमिका मांडली होती. त्याचप्रमाणे या मुद्द्यासाठी वेळोवेळी शासन स्तरावर पाठपुरावा केला होता. त्याचीच परिणीती म्हणून आज शुभांगीताई पाटील यांच्या मागणीची दखल घेत राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय नुसार आज राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः,पूर्णतः, अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे व पदभरतीचे प्रमाण निश्चित करणे बाबत शासन निर्णय काढून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा व शालार्थ आयडी चा मार्ग आज मोकळा झाला आहे.

# वुमन हॅकाथॉममध्ये आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनींना उपविजेतेपद

**शिरपूर, दि.५- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पुणे येथील झेंसार टेक्नॉलॉजी व ए.डब्ल्यू.एस. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वुमन हॅकाथॉन-२०२५ मध्ये उपविजेतेपद पटकावत महाविद्यालयाचा गौरव वाढविला.**

वुमन हॅकाथॉन-२०२५ स्पर्धा एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी, लोणी-काळभोर आणि झेंसार टेक्नॉलॉजीज, खराडी येथे पार पडलेल्या या स्पर्धेत राज्यभरातून महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थिनींनी आपल्या नवकल्पनेचा आणि तांत्रिक कौशल्याचा उत्तम आविष्कार सादर केला. सहभागी स्पर्धकांमधून सरस कामगिरी करीत हे यश त्यांनी संपादित केले. ए.आय.एम.एल., डेटा सायन्स, संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या विद्याशाखांमधील फक्त विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आली होती. झेंसार टीमने यासाठी प्रत्येक टीमला काही



अत्यंत महत्वाच्या विषयांवर समस्या देण्यात आल्या आणि स्पर्धकांना त्यांवर तंत्रज्ञानाच्या साह्याने किफायतशीर असा मार्ग शोधण्यास सांगितले. यावेळी स्पर्धकांना अद्यावत तांत्रिक कौशल्य वापरून सदर समस्येचे निराकरण प्रभावी पद्धतीने कसे करता येईल याचे प्रात्यक्षिके द्वारे परीक्षकांसमोर सादरीकरण करायचे असते. यात शेतकऱ्यांसाठी त्यांना शेतीबद्दल जाणून घेण्यास आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यास जे मदत करेल असे ॲप तयार करायचे होते. सदर ॲप बनविण्यासाठी या विद्यार्थिनींनी एडब्ल्यूएस पार्टी रॉक वापरले.

आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या एकूण ५७ विद्यार्थिनींनी यात सहभागी घेतला होता आणि यातून अनेक फेऱ्यांना सामोरे जात शेवटी धनश्री किरण पाटील, तनया महेश पाटील, दीक्षा माधव पाल या तीन विद्यार्थिनींनी आपले कौशल्य सिद्ध करीत प्रभावी समाधान शोधले व सदर वुमन हॅकाथॉन-स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. आयोजकांतर्फे विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# नंदुरबारच्या एकलव्य विद्यालयात रोबो क्लबची स्थापना

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार संचलित एकलव्य विद्यालय तथा ज.ग.नटावदकर कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या पंचवीस वर्षात विज्ञानाच्या क्षेत्रातील अनेक उपक्रम राबवण्यात आलेले आहेत. शाळेने आतापर्यंत आंतरराष्ट्रीय वर्ल्ड रेकॉर्ड, राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनं, राज्यस्तरीय विज्ञानातील स्पर्धा यात नाव मिळवलेले आहे. एकलव्य विद्यालयातील विज्ञान विभागात अनेक प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी चालवले जातात जेणेकरून विद्यार्थ्यांना विज्ञानासारख्या विषयांमध्ये आवड निर्माण होईल व विज्ञान विषयात गती येईल.**


यावर्षी आर्टिफिशियल इंटेलिजन्स तसेच आधुनिक तंत्रज्ञानातील रोबोटिक्स चे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अवगत व्हावे व विद्यार्थ्यांनी स्वतःही रोबोटिक्स क्षेत्रामध्ये भविष्यात काम करावे हा हेतू ठेवून पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुहास नटावदकर यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनाने एकलव्य रोबो क्लब स्थापन करण्यात आला.एकलव्य रोबो क्लबचे उद्घाटन एकलव्य विद्यालय व ज. ग. नटावदकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य सुहासिनी नटावदकर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे समन्वयक रोहन नटावदकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

उद्घाटनासाठी विशेष तयार करण्यात आलेल्या वेग-वेगळे सेंसर व वेगवेगळ्या कामांमध्ये मदत करणाऱ्या १५ रोबोंबद्दलची माहिती मॉडेल व प्रात्यक्षिकांसह पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ, संस्थेचे विज्ञान प्रमुख मिलिंद वडनगरे यांनी दिली. भविष्यात विद्यार्थी कशाप्रकारे रोबो बनवू शकतात त्याचेही प्रात्यक्षिक देण्यात आले. विद्यालयाच्या या नवीन उपक्रमास संस्थेचे समन्वयक रोहन नटावदकर यांनी शुभेच्छा दिल्यात.

प्रास्ताविक ओलंपियाड परीक्षा प्रमुख प्रकाश चौधरी यांनी केले. सूत्रसंचलन एकलव्य विद्यालय तथा ज.ग.नटावदकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागप्रमुख सौ.मेधा गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. किरण रघुवंशी यांनी केले. कार्यक्रमास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शिक्षक तथा प्रयोगशाळा कर्मचारी उपस्थित होते.













## शब्दकोडे क्रमांक : २१२९



आडवे शब्द : १.मेणापासून बनवलेला दिवा ४.पाप ८.चेहरा १०.मसाल्यासाठी प्रसिद्ध असलेले मुंबईतील एक ठिकाण १२.बारीक कणीसारखे १४.गावाकडचा १६.रब-उलट लिहा १७.जत्रा १९.ताकद २०. घराण्याची वाढती वेल २१.सटटा २३.साप २५.पोटातील कृमी २६.भीमाचे आयुध २७.कलंक २८.पठन ३१.परमेश्वर ३४.हवाई वाहतुकीसाठी वापरतात ते आकाश यान ३५.संकट ३८.राक्षस ४०.एक आंबट फळ ४१.घोषणा ४२.संथ गतीचा ४३.मग्न ४५.हवेने फुगवला जाणारी एक चीज ४७.जोर ४९.काला ५२.अंगठ्याच्या विरुद्ध दिशेला असलेले बोट ५३.भीती ५४.कणीस


उभे शब्द : १.एक पालेभाजी २.काचेचा हवाबंद डबा ३.वडील ५.सरकारी वसूल गोळा करणारा गांवकामगार ६.हिंदीत-उद्या ७.समुद्र ८.महान ९.तबल्याचा साथीदार ११.एक मुघल सम्राट १२.कलाकार १३. कलावंताच्या कलेस रसिकांची मिळालेली पसंतीची पावती १५.वसाहत १८.काळजी १९.मुक्ता बर्वे, उपेंद्र लिमये यांचा एक सिनेमा २१.अनिल कपूर, उर्मिला मातोंडकर, श्रीदेवी यांचा एक सिनेमा २२.शत्रूचे विमान ओळखण्याची यंत्रप्रणाली २४.ऐकण्याचे इंद्रिय २५.युदध २९.रुची ३०.कुली ३२.श्वास घेण्याची क्रिया ३३.प्रवास ३६.अग्निसंस्कार ३७.विनाश करणारा ३८.पायरी ३९.पर्वत ४०. हिंदीत-निखारा ४४. नाडी ४५.नासलेला ४६. मग्न ४८.किल्ला ५०.एक प्रकारचे विदेशी मद्य ५१. त्याप्रमाणे

शब्दकोडे क्रमांक : २१२८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बे | ल | न | | वे | लां | टी | | टि | क | ली | |
| स | | र | सा | | बा | | मु | का | | ट | क |
| न | ट | | मा | ता | | का | का | | श | र | |
| | र | त | न | | स | न | द | शी | र | | र |
| स | बू | री | | क | ल्ला | | म | | म | हा | न |
| | ज | | खो | ड | | मै | | का | | ल | |
| के | | अ | | क | री | ना | क | पू | र | | वि |
| श | हा | मृ | त | | घ | | पा | र | | को | रा |
| व | | त | ग | र | | खा | ट | | गं | | ट |
| सु | त | | डा | | त | न | | जु | गा | ड | |
| त | | वी | | ट | | दा | द | ला | | फ | ना |
| | क | र | न | अ | र्जु | न | | ब | रे | ली | |

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर



मुलाखत–

**पार्थ विकास कपोले**
नवी दिल्ली, मो.९४०५१९२९९८

# शिल्पकलेतला राम

देशातील बुजूर्ग असे शिल्पकार राम सुतार यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा मानाचा 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. धुळे शहरानजिकच्या गोंदूर या लहानशा गावचे मूळ रहिवासी असलेल्या राम सुतार यांची शिल्पकलेतील कामगिरी मात्र जागतिक आहे. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, सरदार पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक भव्य शिल्पकृती त्यांनी साकारल्या आहेत. वयाची शंभर वर्षे पूर्ण केलेले राम सुतार हे आजही तडफेने कार्यरत आहेत. त्यांच्या शिल्पप्रवासाचा घेतलेला हा आढावा...

**१. आपले बालपण हे धुळ्यातल्या गोंदूर गावात गेले, बालपणीची दिवस कसे होते?**

धुळे शहराला अगदी लागूनच असलेले गोंदूर हे माझे गाव. माझा जन्म १९२५ सालचा. माझे वडील सुतार आणि लोहारकामात पारंगत होते. त्यामुळे लहानपणापासूनच सुतारकाम, लोहारकामाशी माझा परिचय झाला. अनेकदा वडिलांसोबत त्यांच्या कामाच्या ठिकाणीही मी जात असे. इयत्ता चौथीपर्यंत मी तेथेच शिकलो, त्यानंतर पाचवीसाठी जवळच्याच निमडाळे गावात मी जात असे. पुढे सहावीसाठी मी आर्वी मोगल या गावात आलो. त्याची तर एक कहाणीच आहे. मला गोंदूरमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांची मी सेवाही करत असे. त्यामुळे त्यांनी विचार केला की विद्यार्थी अतिशय हुशार आहे, याला आपल्यासोबतच बोलावून घ्यावे. जेणेकरून त्याच्या शिक्षणाची आबाळ होणार नाही. पुढचे शिक्षण घेण्यासाठी मी धुळे शहरात चालत चालत आलो. योगायोगाने धुळ्यात माझ्या बहिणीच्या यजमानांचे भाऊ मला भेटले. त्यांनी माझी चौकशी करून त्यांच्या मावसबहिणीकडे मला नेले. मग उमराणकर कुटुंबाने माझी चौकशी केली आणि त्यांच्या घरीच मला ठेवून घेतले.




**२. शाळा, चित्रकला आणि जे. जे. स्कूल ऑफ आर्ट हा प्रवास कसा होता?**

सातवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर मी इंग्रजी शाळेत जाऊ लागलो. तेथे चित्रकला हा विषय आम्हाला होता. इंग्रजी शाळेत आम्हाला श्रीरामकृष्ण जोशी नावाचे शिक्षक होते. ते चित्रकला अतिशय छान शिकवत असत. मी त्यांना जाऊन भेटलो आणि माझी कामे त्यांना दाखवली. त्यांना ते फार आवडले. त्यांना मला एकदा महात्मा गांधींचा पुतळा बनविण्यास सांगितले. त्यांच्या सुचनेनुसार मी तो पुतळा बनवला. ही गोष्ट आहे १९४८ सालची. जोशी सरांनीच मला जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये जाण्याचा सल्ला दिला. त्यांचे एक नातेवाईक माटुंग्यात राहत असत, त्यांच्याकडे माझी राहण्याची सोयही करून दिली. जे. जे. स्कूलमध्ये माझे काम पाहून मला थेट डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश देण्यात आला. त्यानंतर पाच वर्षांचा अभ्यासक्रम मी चार वर्षात पूर्ण केला, प्रत्येक वर्षी मी पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालो आणि मेओ मेडलही मी प्राप्त केले.

## सुतार म्हणजे सूत्रधार !

आम्ही सुतार आहोत. सुतार म्हणजे सूत्रधार, ज्याच्या हाती सूत्र आहेत तो!. त्यामुळे माझ्या अंगातील कला ही आमचा वारसाच आहे, असे मी मानतो. त्यामुळे लोहकाम, सुतारकाम, स्थापत्य हा आम्हा सूत्राधारांचा वारसा. माझे वडील सुतारकाम आणि लोहारकाम करत असत. मी लहानपणापासून त्यांचे काम बघत असे. त्यामुळे आमच्या कामातील हत्यांरांशी माझा लहानपणापासूनच संबंध आला. त्यामुळे आपसूकच माझ्या अंगात ही कला आली.

**३. प्रत्यक्ष कामाची सुरुवात कशी झाली?**

मुंबईमध्ये एलिफंटा अर्थात घारापुरीच्या लेणी आहेत. तेथे मी अनेकदा जात असे. त्यामुळे भारतीय लेण्याविषयी मला अतिशय जवळून अभ्यास करता आला. पुढे योगायोगाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणातर्फे (एएसआय) मला बोलावणे आले आणि अजिंठा – वेरूळ येथील लेणी दुरुस्तीच्या कामामध्ये मला सामील करून घेण्यात आले. त्यानिमित्ताने १९५४ ते १९५८ अशी सलग चार वर्षे वेरूळच्या लेणी दुरुस्तीच्या कामात मी होतो.


**४. देशाच्या राजधानीत अर्थात दिल्लीत कसे आलात?**

१९५९ साली केंद्र सरकारच्या जाहिरात आणि दृश्य प्रसिद्धी संचालनालय अर्थात डीएव्हीपीमध्ये 'प्रदर्शनांसाठी तांत्रिक सहाय्यक' असे पद रिक्त असल्याचे मला समजले. त्यासाठी मी अर्ज केला आणि माझी निवडही झाली आणि मी दिल्लीत आलो.

**५. दिल्ली आणि शिल्पकला हा प्रवास कसा सुरू झाला?**

डीएव्हीपीद्वारे आयोजित होणाऱ्या विविध प्रदर्शनांसाठी मी काम केले. अर्थात, हे सर्व होत असतानाही माझी मूळ शिल्पकलेची आवड मला शांत बसू देत नव्हती, त्यामुळे मी विविध शिल्पे तयार करतच असे. दिल्लीत त्याचदरम्यान कृषी विभागाचे एक प्रदर्शन होते. त्यावेळी माझ्या विभागातील मंडळींना माझ्या शिल्पकलेविषयी माहिती होतीच. त्यांनी मला या प्रदर्शनासाठी शेतकऱ्यांशी संबंधित एखादे शिल्प बनवता आले तर पहा, अशी सुचना केली. त्यानुसार मी प्रगती मैदानात होणाऱ्या त्या प्रदर्शनस्थळी जाऊन आयोजकांना माझे काम दाखवले आणि त्यांना अर्थातच ते खूप आवडले. त्यांनी मला मुख्य प्रवेशद्वारासाठी दोन शिल्पे करण्याचे काम दिले. मात्र, त्यावेळी मी डीएव्हीपीमध्ये काम करत होतो. तेथे काम करताना मला दुसरे काम करता येणार नाही, असा नियम वरिष्ठांनी सांगितला. त्यामुळे मी अखेरीस माझ्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला आणि पूर्णवेळ शिल्पकलेसाठी काम करू लागलो.

## सातवीत असताना साकारले पहिले शिल्प



मी सातवीत असतानाची गोष्ट. त्यावेळी शाळेत आम्ही दगडी पाटी वापरत असू. तर त्या पाटीवर कोरीवकाम करून मी भवानीमाता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत आहे, असे शिल्प तयार केले होते. ते माझे पहिले शिल्प, ते मी अजुनही जपून ठेवले आहे. विशेष म्हणजे तेव्हा आमच्या जोशी गुरूजींनी ते शिल्प मुंबईत एका प्रदर्शनात पाठवले होते आणि मला त्यासाठी रौप्यपदकही मिळाले होते. तेव्हापासून मी खऱ्या अर्थाने शिल्पकलेकडे ओढला गेलो.

**६. दिल्लीत तुमची शिल्पकला कशी बहरली?**

दिल्लीत पूर्णवेळ शिल्पकला मी सुरू केली. त्याचदरम्यान जोगळेकर नावाचे एक स्थापत्य अभियंत्यांशी माझा परिचय झाला. त्यावेळी संसदेत असलेले ब्रिटीशांची प्रतिके हटवून त्याजागी अशोकस्तंभ लावण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला होता. हे काम मला जोगळेकरांच्या सहकार्याने मिळाले. त्यासाठी सहा फुटांचा अशोकस्तंभ आग्र्याहून विशिष्ट दगड आणून कोरला. अर्थात, हे काम सोपे नव्हते. त्यासाठी तीस ते चाळीस फुटांचे मचाण प्रथम बांधावे लागले, त्यानंतर भिंतीत असलेली ब्रिटीश प्रतिके काढणे आणि नंतर त्याच जागेत अशोकस्तंभ बसविणे अशी प्रक्रिया करावी लागली. अर्थात, हे काम करत असतानाच देशाच्या पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्याशी माझा परिचय झाला. माझे काम सुरू असताना ते संसदेत आले होते, त्यावेळी त्यांनी माझ्याजवळ येऊन माझी आणि कामाची चौकशी केली. या कामासाठी मला ३ हजार रुपये मिळाले होते.



पुढे गोविंद वल्लभ पंत यांचा १० फूट उंचीचा कांस्य पुतळा मी उभारला, व्यावसायिक शिल्पकार म्हणून हा माझा पहिलाच पुतळा होता. त्यासाठी दिल्लीतील साउथ एक्सटेंशनमध्ये एक घर भाड्याने घेतले आणि त्याच्या अंगणात पुतळ्यावर काम केले होते. हा अनुभव माझ्यासाठी खूप महत्त्वाचा होता. त्यानंतर दिल्लीतल्या इंडिया गेटवरील कॅनोपीमधील पंचम जॉर्जचा पुतळा काढून तेथे महात्मा गांधी यांचा पुतळा बसविण्याचे सरकारतर्फे ठरविण्यात आले होते. तो पुतळा बनविण्याचीही संधी मला मिळाली. त्यासाठी मी दोन पुतळे तयार केले – पहिला म्हणजे गांधीजी उभे असलेले आणि दुसरा म्हणजे ध्यानमुद्रेत बसलेले. अर्थात, त्यावेळी ब्रिटीशांनी उभारलेल्या कॅनोपीमध्ये महात्माजींचा पुतळा बसविणे योग्य ठरणार नसल्याचा मतप्रवाहही होता. परिणामी कॅनोपीमध्ये महात्मा गांधींचा पुतळा बसवू नये, अशा निष्कर्षाप्रत सरकार आले. त्यावेळी इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान होत्या. अर्थात, त्यानंतर ध्यानमुद्रेतील महात्माजींचा पुतळा आता देशाच्या संसदेत स्थापन करण्यात आला असून तो जागतिक आकर्षण ठरला आहे. पुढे देशाच्या संसदेत मला पं. नेहरू, सरदार पटेल, इंदिरा गांधी, मौलाना आझाद असे जवळपास १६ पुतळे साकारण्याची संधी मला मिळाली आणि मी दिल्लीत खऱ्या अर्थाने स्थिरावलो.

**७. स्टॅच्यू ऑफ युनिटी साकारतानाच्या काय आठवणी आहेत?**

गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे भव्य स्मारक उभारण्यास प्रारंभ केला होता. त्यासाठी सरदार पटेल यांचा जगातील सर्वात उंच पुतळा (१५९ मीटर्स) उभारावा, अशी त्यांची योजना होती. त्यातही एक वैशिष्ट्य होते. सरदार पटेल यांनी देशातील ६०० हून अधिक संस्थाने एकत्र करून देशाला एकसंध केले होते, त्यामुळे त्यांचा भव्य पुतळाही तशाच प्रकारे ६०० भाग जोडून तयार करण्याची कल्पना होती. त्यासाठी देशात विविध शिल्पकारांनी तयार केलेले सरदार पटेलांचे पुतळे अभ्यासण्यात आले, त्यामध्ये मी केलेला पुतळा सर्वांच्या पसंतीस उतरला आणि सरदार पटेलांचा भव्य पुतळा मी साकारणार; हे निश्चित झाले. काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वच जण कामाला लागलो होतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात पुतळ्याचे कास्टींग भारतात करणे शक्य नव्हते. त्यासाठी ते काम परदेशात करण्याचा निर्णयही आम्ही घेतला. त्यानुसार, पुतळ्याचे ९० टक्के काम आम्ही भारतात पूर्ण केले आणि उर्वरित १० टक्के काम परदेशात करून घेतले.

**८. आणखी कोणकोणते भव्य पुतळे साकारले?**

अरबी समुद्रात प्रस्तावित असलेल्या शिवस्मारकातील छत्रपत शिवाजी महाराजांचा पुतळा (१२२ मीटर्स) साकारण्याची संधी मला मिळाली आहे. त्याचप्रमाणे इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाही पुतळा (१०६.६८ मीटर्स) साकारला आहे. त्याचप्रमाणे प्रभू श्रीरामचंद्रांचा अयोध्या येथील १८३ मीटर्सचा पुतळादेखील साकारण्याचे भाग्य मला लाभले आहे.

**९. भारतातील शिल्पकला – मूर्तीकला याकडे तुम्ही कसे बघता?**

शिल्पकलेत भारतात पूर्वीच्या पिढीने जे काम केले आहे, ते अनन्यसाधारण आहे. अर्थात, त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी हवी. भारतातील मंदिरे असतील, लेणी असतील; हे सर्व बघितल्यावर शिल्पकलेचे मूळ भारतच असल्याचे जाणवते. भारतातील मंदिरांचे कोरीव काम, अखंड पाषाणातून साकारलेले वेरूळचे कैलास लेणे हे सर्व अतिशय प्रेरणादायी आहे. जगात अशी काम अन्य कोणत्याही देशात झालेली दिसत नाहीत. त्यामुळे अर्थातच भारतीय शिल्पकलेचे भवितव्य उज्ज्वलच आहे.


**१०. एखादे शिल्प साकारताना त्यासाठी तयारी कशी सुरू होते?**

कोणत्याही व्यक्तीचे शिल्प साकारण्यापूर्वी मी त्या व्यक्तीचा अभ्यास करतो. त्याचे कार्य, त्याच्या सवयी, त्याची बोलण्याची पद्धती, त्याची हसण्याची पद्धत, त्याची विचार करण्याची पद्धती आदी. उदाहरणार्थ – महात्मा गांधींचा पुतळा साकारायचा असेल तर ते नेहमी देत असलेले शांतीचा संदेश, त्यांची ध्यानास बसण्याची पद्धत हे बघून त्यांचा चेहरा कसा असेल, डोळे कसे असतील याचा अभ्यास मी करतो. कारण, चेहऱ्यातील अगदी सुक्ष्मातीसुक्ष्म हालभावही शिल्पामध्ये उतरविण्याचा माझा प्रयत्न असतो. त्याचप्रमाणे सरदार पटेल म्हटले की करारीपणा, पं. नेहरू म्हटले की विचारवंत आणि इंदिरा गांधी म्हटले की एकला चलो रे..., अशा विविध बाबींचाही अभ्यास मी करतो. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी सामाजिक क्रांती भारतात घडवली, त्याचे प्रतिबिंब त्यांच्या शिल्पामध्ये कसे येईल; याचाही मी विशेष अभ्यास केला.






**११. शिल्पकारांच्या नव्या पिढीस काय संदेश देणार?**



अलिकडे लोक मेहनत करण्यास तयार नाहीत, असे मला दिसते. मॉर्डन आर्ट म्हणून एक प्रकार अशा मेहनत न करणाऱ्या मंडळींनी निर्माण केला की काय, असे त्यामुळे वाटते. कारण, मॉडर्न आर्टच्या नावाखाली थोडक्यात काहीतरी करायचे आणि त्यास शिल्पकला म्हणायचे; असे प्रकार होताना दिसतात. मात्र, हा प्रकार म्हणजे फसवणूक असल्याचे माझे स्पष्ट मत आहे. अर्थात, यामध्ये काही सन्माननीय अपवाद आहेत. त्यामुळे नव्या पिढीने भारतीय शिल्पकारीतेचा देदीप्यमान वारसा अभ्यासून मेहनत करणे अतिशय आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पैशांसाठी नव्हे तर तुमची पॅशन जपण्यासाठी काम करा, असे मी नव्या कलाकारांना नेहमी सांगत असतो.

**'पद्म' सन्मान**

शिल्पकार राम सुतार यांना यापूर्वी २३ मार्च १९९९ रोजी 'पद्मश्री' आणि १२ एप्रिल २०१७ रोजी 'पद्मभूषण' या नागरी सन्मानांनी केंद्र सरकारतर्फे गौरविण्यात आले आहे.

**सौजन्य– मुंबई तरुण भारत**


---

**प्रांजळाचे आरसे**

प्राचार्य डॉ.कृष्णा पोतदार
मो.९४२२८९५४६५

# साहित्याच्या माध्यमातून शॉक ट्रीटमेंट देणारे लेखक : श्री. श्रीलाल शुक्ल

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक श्री. श्रीलाल शुक्ल यांचे हे जन्म–शताब्दी वर्ष आहे. त्यांचे व्यक्तिमत्व हे अत्यंत साधं, निर्मळ आणि प्रामाणिक होतं. ते नेहमी प्रसन्न मुद्रेने चेहऱ्यावर स्मित हास्य ठेवत येणाऱ्यांचं मनापासून स्व–ागत करीत. असं असलं तरी त्यांना इतरांना जे काही सांगायचं असे ते कोणचीही भीड–भाड न बाळगता, शिवाय काहीही न लपवतात अत्यंत स्पष्टपणे सांगत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे वैशिष्ट्य होतं की ते स्वतः शासकीय सेवेत असूनही तेथल्या व्यवस्थेवर–प्रशासनावर कडाडून प्रहार करीत असत.




श्रीलाल शुक्ल यांचा जन्म उत्तर प्रदेशातील लखनौ जिल्ह्यातील अंतरौली गावात ३१ डिसेंबर १९२५ रोजी झाला. त्यांचे आजोबा पंडित गंगाधर शुक्ल हे साहित्य आणि संगीताचे विशेष जाणकार होते. त्यांना संस्कृत, हिंदी, उर्दू आणि फारसी भाषांचे उत्तम ज्ञान होते. आपल्या मुलांवर ही त्यांनी या भाषांच्या साहित्याचा संस्कार केला. वडीलांचा हा वारसा पं. ब्रज किशोर शुक्ला यांनी अत्यंत समर्थपणे चालवला. श्रीलाल शुक्लांच्या जन्मापूर्वीच त्यांच्या आजोबांचा काही महिन्यापूर्वी मृत्यू झाला होता. श्रीलालांचे वडील पं. ब्रज किशोर शुक्लांना कवितेची खूप आवड होती. त्यांचा कुठलाही व्यवसाय नव्हता. आपल्या शेतीकडेही त्यांनी दुर्लक्ष केलेले होते. हळूहळू तीही लयास गेली. श्रीलाल तेव्हा नुकतेच महाविद्यालयात जाऊ लागले होते. तेव्हाच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि सर्व परिवाराची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंतच झालं. खरं तर त्यांना पुढे जाऊन एम. ए. करायचं होतं आणि कायद्याचं शिक्षण ही घ्यायचं होतं. गरिबी आणि शिक्षण व साहित्याच्या प्रति अदम्य विश्वासामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कार होत राहिलेत. त्यांच्या अंतरौली गावात जमीनदारी व्यवसायामुळे वेगवेगळ्या जाती–जमातीच्या आपापल्या परंपरा आणि पद्धती होत्या. तसेच त्या गावात पक्के रस्ते, घाणेरडया गल्ल्या आणि एकही विटा–सिमेंटने बांधलेले पक्के घर नव्हते. अशा या गावातच त्यांचे बालपण गेले.

श्रीलाल शुक्लांनी बी. ए झाल्यानंतर काही दिवस अध्यापकाचे काम केले. परंतु नंतर १९४९ ला ते स्टेट सिविल सर्विस मध्ये निवडले गेलेत. तेथेच त्यांना त्यानंतर आय. ए. एस् मध्ये पदोन्नती मिळाली. ते स्वतः अत्यंत मेहनती, प्रामाणिक काम करणारे असल्यामुळे प्रशासनात त्यांचे नाव झाले. त्यांच्या नावाचा दबदबा वाढलेला होता. आय. ए. एस् मध्ये पदोन्नती झाल्यामुळे त्यांना चिकित्सा आणि स्वास्थ विभागात विशेष सचिव म्हणून काम करावे लागले. तसेच ते वित्त आणि सहकार मंत्रालयाशी ही संबंधित होते. मुख्य प्रशासन अधिकारी म्हणून काही वर्ष ते अलाहाबाद येथे कार्यरत होते. १९८३ ला ते सेवामुक्त झालेत.

श्रीलाल शुक्ल हे खऱ्या अर्थाने प्रकाशात आले ते त्यांच्या प्रकाशित झालेल्या राग दरबारी कादंबरीमुळे. ही त्यांच्या काळातील सर्वोत्कृष्ट व्यंग रचना आहे. आपल्या सामाजिक जीवनात व्याप्त असलेली कठीणता, विघटित जीवन मूल्यांचा मोहभंग, अस्वस्थ आणि पलायनवादी युवा वर्ग, वाढत्या गुंडागर्दीने आणि दादागिरीने होत असलेला विध्वंस, उत्श्रृंखलता, षडयंत्र, तणाव अनैतिकता, हिंसा, नेतागिरी यावर त्यांनी अत्यंत बोचरे, कडाडून प्रहार करणारे व्यंग लेखन केले आहे. या सर्व उध्वस्त करणाऱ्या परिस्थिती आणि घटकांमुळे दिवसें–दिवस ग्रामीण जीवन आणि शहरी संस्कृती विस्कळीत होत चाललेली आहे. रागदरबारी कादंबरीत यांचे अत्यंत प्रभावशाली चित्रण झालेले आहे. आणि याचमुळे ही कादंबरी ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवडली गेली. २००८ मध्ये श्रीलाल शुक्लांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले गेले. आज ही या कादंबरीतले सर्व प्रसंग, घटना वर्तमानात घडत असल्यासारख्या वाटतात म्हणून ती अत्यंत प्रासंगिक अशी कादंबरी आहे. श्रीलाल शुक्लांच्या अंगद के पाव, अज्ञातवास, आदमी का जहर, सीमाएँ टूटती है, मकान, पहिला पडाव, विश्रामपूर का संत व राग विराग ह्या बहुचर्चित अशा कादंबऱ्या आहेत. त्यांना १९६९ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार, १९९६ मध्ये व्यास सन्मान, २००८ मध्ये पद्मभूषण आणि २०११ मध्ये ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविले गेलेले आहे.

समाजात असलेल्या अत्यंत प्रांजळ आणि सुज्ञ बुद्धिवादी व्यक्तींसाठी राग दरबारी ही एक व्यंगात्मक उपाहार आहे; भेट आहे!. १९६७ साली प्रकाशित झालेल्या या कादंबरीला १९६९ मध्ये भारतीय साहित्य अकादमीचा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला होता. राग दरबारीचे कथानक आणि तिच्या समस्त घटनाचक्रांचे केंद्र शिवपालगंज आहे. शिवपालगंज सरकारी दप्तरात ग्रामपंचायतीचा भाग म्हणून नोंदवला गेला आहे. शिवपालगंज हे शहरी हद्द संपताच वसलेले एक गाव आहे; वस्ती आहे. शहराची नगरपालिका आणि गावाच्या पंचायतीला जोडणारा रस्ता सुद्धा शिवपालगंज मधूनच जातो. एकूण काय तर शहरी संस्कृतीच्या वाईट आणि विकृत प्रवृत्तींनी शिवपालगंज कधीच काबीज केलेले आहे. यामुळे लढाई, झगडे, भ्रष्टाचार, घृणीत ग्रामीण राजकारण, निवडणुकांच्या कसरती, संपत्तीवाद, विषमता, दुःख, कुंठा, पहलवानी, दादागिरी, चोरी यासारख्या अनेक गोष्टींची चर्चा राग दरबारीत आहे. शिवपालगंज हे एक अशा वस्तीचे गाव आहे जे वर्तमान विकासापासून वीस वर्षे मागे आहे. खरं तर स्वतंत्र भारतात विकासाच्या दृष्टीने मागे राहिलेल्या सर्वच गावांचा राग दरबारी ही कादंबरी म्हणजे अस्सल पुरावा आहे.

राग दरबारी ही कादंबरी संपूर्ण देशाची कहाणी सांगते आणि ही कहाणी प्रस्तुत करणारा मंच आहे शिवपालगंज. ज्याचा सूत्रधार आहे रंगनाथ नावाचा शोध–विद्यार्थी. रंगनाथ हा आत्मकेंद्रित व्यक्तिमत्त्वाचा धनी आणि निष्क्रिय मनोवृत्तीचा युवक आहे. तब्येत सुधारण्याच्या उद्देशाने आपल्या मामाकडे आलेला हा तरुण मामा वैद्यांनी सांगितलेला स्वास्थ प्राप्तीच्या कार्यक्रमाचे ग्रहण करतो आणि त्यांच्याच बैठकीत बसणाऱ्या गंजडी (गांजा पिणारे) बरोबर हास्य–विनोदात रमून जातो. मामा वैद्यांच्या मते गांजा पिणे ब्रह्मचर्याचे नुकसान करणारे नसून वीर्य रक्षा करणारे आहे. त्यामुळे ते रंगनाथ वर कसलाही आक्षेप घेत नाहीत. खरं तर रंगनाथ एक अभ्यासू शोध–विद्यार्थी आहे पण शिवपालगंजच्या या दलदलीत तो फसतो. त्याला लक्षात येते की येथे बुद्धिमत्तेला काही किंमत नाही. किंमत आहे ती फक्त मूर्खपणाला. सुरुवातीला तो मोठ्या कुतूहलाने इथल्या घडामोडी पाहतो. या व्यवस्थेला स्वीकारणे त्याला अशक्य होते. तो पाहतो की इथे दादा मनोवृत्तीवाले रूप्पन सारखे विद्यार्थी आहेत. भ्रष्टाचारी फूड इन्स्पेक्टर आहे; यात्रेत स्त्रियांच्या शरीराशी चाळा करणारे विकृत आहेत. निरंकुश सत्ताधारी आणि शोषण करणारे प्राचार्य आहेत. मास्टर खन्ना आणि मास्टर मालवीय सारखे अनैतिक कुकर्म करणारे शिक्षक **(पान ४ वर)**




# रावन जित्ता शे

रामराम हो मंडई रामराम, काय चाल्न बठ्ठ ठिकठाक शे ना , सावध -हावा बर कारन रावन आजु जित्ता शे . नै तुम्हले मन्हा बोलानं थोड आश्चर्य वाटनं व्हई की नितीन भाऊ झोपमा ते बडबडी राहिना . नयी हो मंडई मी चांगला जागा शे आनी तुम्हनाशी बोली राहिनु . मंडई रामायन घडीस्नी हजारो वरीस व्हई गयात , रामराज्य चाल्नं गय पन तो रावन काही मरना नयी तो आज भी जित्ता शे आनी जवलगुन सुर्यनी धग शे आनी जवलगुन मानुस या धरती वर शे तवलगुन तो रावन काही मराव नयी .

मंडई आपला कानवर रोज काहीना काही बातम्या पडत -हातीस , त्या बातमीसमा काही चांगल्या ते काही वाईट -हातीस , मंडई मानुसना मनमा सुड लेवानी एक सुप्त भावना जागी कायम जागी -हास आनी संधी मियताच सुड लेव-ना प्रयत्न व्हस . काही लोके समोरासमोर दांगडो पडतस ,पेरनी करा पासुन ते पिक पोतामा भरा पावोत कष्ट करनं पडस तवय कुठे ते दोन पैसा हातमा येतस .पन मंडई मानुसमाना रावन नेमका तवयच जागा व्हस जवय तोंडमा दोन सुखना पडानी येय -हास . रातोरात उभा ,तयार पिकनी नासाडी व्हई जास आनी त्या शेतकरीनी बठ्ठी मेहनत वाया जास , आपलं बयत वावर तो देखस आनी तो धायमोकस्नी रडाले लागस , त्याना कच्चा बच्चा ,त्यानी गृहलक्ष्मी रडाले लागी जास . मंडई काय सुख मियत व्हयी अस नुकसान करावर.. जो हायी काम करस तो नक्कीच मानुस नयी व्हनार तो नक्कीच हैवान शे . मंडई रावनणी ते आमने सामने राम ना संगे युध्द कर व्हत पन मानुसमाना रावन या रावन पेक्षा जास्त क्रूर शे , तो आमने सामने युध्द नै करस पन समोरना मानुस वर असा घाव घालस की त्यानी बठ्ठी दुनिया उजडी जास आनी ज्यानं नुकसान व्हस तो मानुस मझारमातुन कोल्लाखट्ट व्हई जास . जर त्याले सावरनार कोनी व्हई ते बर नैते खर काम -हास नै दादा . तो आपला जिवनना शेवट करी लेस .

मंडई हेवा दावा , लढाई झगडा , भाऊबंदकी या परकार काही आत्तेना नयी शेतस , मानुसनी उत्क्रांती व्हयनी आनी तो भटकंती करत धरतीवर फिराले लागना , ज्या वस्तुमुये आपला फायदा शे म्हनजे छत्रपती संभाजी महाराजना अमानुस वध ,मंडई जमीनना तुकडा करता मानुसमाना रावन जित्ता व्हयना आनी फितुरी व्हयनी आनी एक शूरवीर हिंदु राजाना वध त्या मुगलस्नी करा , जो राजा आपला हिंदुस्ना करता लढत व्हता , हिंदुस्न स्वराज्य करना गुंता तो आयुष्यभर लढना त्याच छत्रपती संभाजी महाराजले पकडी दिंध, काय म्हनो याले . मंडई आपला नाववर एक बिघा नयी ते शंभर बिघा जमीन शे आनी आपन त्या जमीनना मालक शेतस हाई फक्त मानुसनी एक समज शे , वास्तवमा देखाले जावो ते मानुसना संगे काहीच येस नै , मानुस मरावर कपाले जो एक रुपया लावतस तो भी संगे लयी जाता येस नै , मानुसले बठ्ठ कयस पन वयत काहीच नै .मानुस शिकना सवरना ,वज्जी परगती करी पन स्वताना मनवर ताबा कसा ठेवो हाई काही शिकना नै , मानुसनी पोहोच पार मंगय ग्रह पावोत चाल्नी गयी , सूर्यनारायन जोगे पोहचानी तयारी चाली राहिनी पन मंडई आपला शेजारी, नातेवाईक पावोत तो काही पोहचु शकना नयी . आख्खं जग मोबाईलना माध्यमतुन त्याना मुठ्ठीमा ई लागनं पन तो मनले मोठं कराले ईसरी गया

मंडई मानुसना या वढाय मनले आवाकामा आना करता एक उपाय शे आनी तो म्हनजे अध्यात्म , आपला ग्रंथ, पुरान आनी चांगला विचारवंत लेखकस्ना दर्जेदार पुस्तके . या आपन वाचाले सुरुवात करी ते जिवननं सत्य आपुनले समजस, आपला ज्ञानमा भर पडी असा अनुभवना विचार आपुनले कस जगानं आनी कसं जगु नयी हायी हायी समजस. आपला आचार आनी विचार कसा योग्य किंवा अयोग्य शेतस हायी माहिती व्हस . मंडई आपला सर्वात मोठा गुरु म्हनजे आपला अंतरात्मा, जो कधीच आपलाशी खोटं बोलत नयी , आपुन जर चुकीनं वागनुत त्या रातले आपुनले शांत जप लागस नयी कारन आपला अंतरात्मा आपुनले सत्य आनी असत्यनी जानीव करी देस . पन मंडई ज्याना अंतरात्माच मरेल -हास त्याले काहीच फरक पडस नयी , तो मानुस खुन ,बलात्कार, मारामारी करीस्नीभी शांत झोपस. ज्याना अंतरात्माच मरी जास तो मानुस -हासच नै तो हैवान बनी जास . ज्यानावर धाकलपन पासुन चांगला संस्कार व्हयेल -हातस तो मानुस सतरादाव ईचार करीस्नी काम करस आनी आपला मनमा रावनले जित्ता होऊ देस नयी .

माती मन्ही स्यान , माती मन्ही आन
मातीनाच देह आनी मातीम्हाज जानं
सोनाचांदीनी आस , शे जिवले कास
मातीच से ती , व्हस मनले फक्त भास
भारी नको भरु तु तुन्हा गोरागोमटा रंग वर
मातीनाच रंग शे तो तुन्हा मुठभर हाडकेस्वर
सात तालनी बांधी माडी ,हाई गोट शे खोटी
रगतनं पानी करीस्नी गड्या जमाडी रे तु माती
धनदौलत करता जिवले तु मातीमा मियाडं
धनगोतनी दिधा दगा ,देख तु काय कमाडं

इस्टन बारदान जमा करता करता जिव तुन्हा खंगना. खंगीस्नी मरना तवय तू दोन चिमट्या राख इतलाच उरना



करीस्नी मोकया व्हई जातस पन काही लोके गुपचूप सुड लेवाना प्रयत्न करतस . असा लोकेस्नी समोरासमोर दांगडो करानी हिंमत -हात नयी मन्हीस्नी त्या वडा न तेल वांगावर परमाने वागतस . खेडापाडामा एकमेकना वावरना बांध कोराना , वावरमा रातोरात उभा पिके कापीस्नी फेकाना , उभा ऊसले आग लावाना ,केयीस्ना घड कापीस्नी फेकाना, पपईना झाडे झोपाडी देवाना असा परकार आपुनले देखाले आनी वाचाले मियतस. समोरना मानुस बरोबर समोरासमोर खेटानी हिंमत ज्यापान नयी -हास त्याच गांडुये असी खुन्नस ठिस्नी असा वागतस , पन त्या हावु ईचार करतत नै की ज्यानं आपन नुकसान करी राहिनुत त्यानी कितला कष्टतुन पिक जगाडं व्हई, रातदिन तो वावरमा खपना व्हई. डोयास्मा तेल टाकीस्नी पहारा दिधा व्हई.

मंडई वावरमा तहानभूक ईसरीस्नी पिके जगाडना ती वस्तु फक्त आपुनले मियाले पाहिजे हायी स्वार्थनी भावना त्यानामा जित्ती झायी आनी मानुसमाना शैतान, रावन जित्ता व्हयना . मानुसनी जशी जशी परतगी करी तसा तो मतलबी बनना , पहिले मानुस शिकार वरतुन झगडा करे , मारामा-या करे नंतर बाई वरतुन झगडा व्होवाले लागनात , नंतर जमीन वरतुन जुपाले लागनी , आपला रामायन महाभारत ग्रंथमा अश्या घटना घडेल शेतीस आनी आजलगुन त्या कटका चालुज शेतस . रामायनमा आपलं जीवन आदर्श कस जगवो यानी आचारसंहिताच सांगेल शे ,आनी महाभारतमा मानुसनी कस वागु नये हायी सांगेल शे . पांडवस्नी मोठ्या मोठ्या चुका क-यात आनी त्याना फायदा कौरवस्नी कसा लिधा हायी शिका सारखं शे .

मानुसमाना रावन जित्ता व्हयना ते कितलं मोठं नुकसान व्हवु शकस याना सर्वात भयानक उदाहरन

चला मंडई भेटुत पुढना हप्त्याले , तवलगुन रामराम.

---

# मन हे राम व्हावे!

ऋचा पारेख
मुंबई, मो.९९३०१२१४९०

आज रामनवमी! सर्वत्र श्रीरामाच्या नावाचा जयघोष. आजच्या दिवशी गीत रामायण, भजन,कीर्तन, मिरवणूक, रामलीला, असे अनेक उत्सव जल्लोषात साजरे होतात. !अनेक गटातून संदेश,आले रामरक्षा म्हणा. रामाचा जप १०८वेळा करा. कल्याण होईल.रामरक्षा म्हणा हे खरं तर अगदी घरापासून शाळेपर्यंत चे संस्कार!

रामाची महिमा शब्दात वर्णावी इतकी सहज नाही. राम म्हणजे मार्ग पण आहे आणि ध्येय पण आहे.राम युद्ध पण आहे आणि योग्य पण आहे. राम मनोहर पण आहे आणि मनस्वी पण आहे. आराध्य आणि आराधना पण आहे. साध्य आणि साधना पण आहे. मानस आणि गीता पण आहे. राम, राम आणि सीता पण आहे. आज आणि काल पण आहे. गृहस्थ आणि संत पण आहे. जिथे जिथे उत्तम तिथे तिथे राम!

आजी म्हणायची नेहमी मुलांमध्ये बाळकृष्ण आणि लल्ला राम असतो. तो बोलू शकत नाही, पण तुम्ही खऱ्या भावनेने त्याच्याशी बोललात तर तुमचा थेट संवाद रामाशी होतो. ही आस्थावादी दृष्टी पारंपरिक असली तरी खूप निरागस,स्नेहमयी, आणि सगळ्या तर्कांपासून दूर होती. त्यात निर्मळ भावनेची उदात्तता होती. असीम आशीर्वादाचे वैराट्य होते. रामाला रामाशी जोडण्याची निष्कपट कामना होती.

आज आपण जी भक्ती करतोय, धावा करतोय, त्यात आपण *रामासाठी* किती करणार आहोत. अपवाद अर्थात असतील ही. सामान्यतया आपण रामापर्यत पोहोचवणार आहोत त्या आपल्या व्यथा!आपण किती दुःखी आहोत, निराश आहोत, व्यथित आहोत अनासक्त आहोत, आणि तरी सुद्धा आम्ही तुझी भक्ती करत आहोत, म्हणून *हे श्रीरामा =ज* तुला आमचं कल्याण करावं लागेल....म्हणजे रामालाच आदेश. अनंत यातना भोगूनही आम्ही तुझ्यासाठी इतका सोहळा करतो, भक्ती करतो, हे रामा!आमचं कल्याण कर. म्हणजे रामावरच उपकार! मी तुला सोन्याचा मुकुट चढवीन बस माझी तिजोरी फक्त भरलेली राहू दे. म्हणजे रामालाच लाच!याचा अर्थ आपण राम तर होणार नाहीच आहोत पण प्रयत्नही करण्याची इच्छा नाही. प्रभू श्री रामासाठी आजच्या दिवशी तरी हे सत्य पचवायला हरकत नाही. हा एक यथार्थ विचार आहे.

कोणाचीही धार्मिक भावना दुखवायची नाही पण काही वास्तव हे विस्तवासारखं असलं तरी पचवावं लागतं. आपल्यातल्या भिरुतेची पराकाष्ठा ही आहे की, आपण आपल्यातल्या रामाचे विसर्जन करून मोकळे झालो आहोत. आपल्यातच राम दिसला नसेल तर तो बाहेर कसा शोधणार? राम म्हणजे निष्ठा, सहनशीलता, संयम, गांभीर्य, न्यायप्रियता,




व्यवस्थापन, नीतिमत्ता, प्रेम,दया, वचनबद्धता!यातल्या किती गोष्टी आपण पाळतो? पुन्हा सांगते अपवाद हा भाग वेगळा. आपल्याला स्वतःत असलेला राम नको असतो. कारण थेट त्या रामाशी संवाद साधण्याचं धाडस आपल्यात नसतं. आपल्यातला खोटेपणा, दांभिकपणा, असत्य, कुटनीती, स्वार्थ, त्याच्यासमक्ष मांडण्याचे धाडस नसते. ज्या ज्या वेळी आपण व्यभिचाराने वागतो, भ्रष्टाचार करतो, माणुसकी सोडून वागतो, नाती -गोती वेशीवर टांगतो, मर्यादा सोडून वागतो,त्या त्या वेळी तुमच्यातला राम तुम्हाला मर्यादा दर्शवून देतो. तुम्हाला ते करण्यापासून परावृत्त करतो. पण त्याच्या मार्गांवर पदक्रमण अवघड वाटायला लागलं की रामाचे विसर्जन करून टाकतो. शिल्लक उरतो तो फक्त बाह्य आस्था भाव!

ज्यांच्यात असे राम होते ते त्याच्याशी थेट संवाद साधू शकले, मतं आणि मनं परिवर्तन करू शकले. पण असे साहसी व्हायला युगं जावी लागतात. असे साहसी खऱ्या अर्थाने कबीर होते.

मोको कहां ढुंढे रे बंदे मै तो तेरे पास में
ना मै देवल, ना मस्जिद मै, ना काबे कैलास में

अशा कबीर ला आपण मारले, धिक्कारले, आणि ज्यांनी थोडं फार त्याला मानलं ते त्या मर्मा पर्यंत पोहोचण्यास सक्षम नव्हते. कारण,आतल्या रामाचे विसर्जन.......

संवेदनहीनता आणि संवादहीनता ह्या दोन्ही गोष्टी घेऊन रामाला शोधणे शक्य नाही. पाखंड, उदासीनता, वैर, स्वार्थ, स्पर्धा, इर्षा, ह्या सगळ्या भावना सुप्तपणे मनात पाळून आपण हळूहळू आपल्यातल्या रामाला विराम देत आलो आहोत. हे सगळं सोडून अशी दृष्टी विकसित करू जी उत्तम कर्माची आरती करण्यासाठी तत्पर दिपशिखेच्या रूपात प्रज्वलीत असेल!

रामराज्य सगळ्यांनाच हवंय!रामाच्या चरणात सगळ्यांनाच रहायचं आहे, त्याच्या चरणी सदैव नतमस्तक व्हायचं आहे, पण रामासारखं आचरण मात्र करायचं नकोय.रामराज्य म्हणजे त्याग, सत्य,, तपस्या, आणि स्वअनुशासन. रामराज्य म्हणजे एक विचार आणि आचार. परमार्थ, विवेक, व्यवस्थापन, चरित्र, कौटुंबिक एकता, मर्यादा, नीती, साहस, संयम, निर्णयक्षमता हे सगळं समाविष्ट असलेला एक विचार आणि त्याचे आचरण!

ह्या गोष्टी केवळ पाच पन्नास लोकांनी करून साध्य होणार नाही. संपूर्ण समाज जेव्हा हा विचार स्वीकार करेल, आचरणात आणेल तेव्हा रामराज्य स्वप्नं साकार होण्यासाठी आकार घेऊ लागेल. आणि संपूर्ण समाज त्यावेळी बदलतो जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वतःला सुधारवण्याचा प्रयत्न करेल.

आपल्या सगळ्यातला राम जागृत होवो ही श्रीरामाच्या चरणी प्रार्थना!!

*******

---

# साहित्याच्या माध्यमातून शॉक ट्रीटमेंट देणारे लेखक

(पान ३ वरुन) आहेत; आपल्या इशाऱ्यावर संपूर्ण शिवपालगंजला नाचवणारे मामा वैद्य आहेत तर आपल्याच वडिलांचे डोके फोडणारा छोटा पहिलवान आहे. खरं तर बुद्धीवादी माणसाला या सर्वांचा राग येऊन याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे होता, एखादी क्रांती किंवा आंदोलन करायला हवे होते परंतु रंगनाथ यावर काहीच करू इच्छित नाही. उलट तेथून तो पळ काढतो. आजकालच्या बुद्धीवादी तरुणाईकडे लेखक लक्ष वेधू इच्छितात. मामा वैद्य संपूर्ण कादंबरीत एक अवसरवादी राजनेता म्हणून वावरताना दिसतो. रूप्पन बाबू आवारा आणि अनुशासनहीन विद्यार्थी वर्गाचा प्रतिनिधी आहे. बद्री, छोटे, जोगनाथ इत्यादी गुंडागर्दी करणारे आणि समाजविद्रोही तत्वे आहेत. गयादीन एक प्रतिष्ठित नागरिक असून अन्यायाविरुद्ध एक शब्दही बोलत नाहीत.

शिवपालगंज मध्ये जे जे काही घडते ते ते भारतातल्या प्रत्येक खेड्यात घडताना दिसते. प्रामाणिक आणि निर्मळ माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असणारे लेखक या निमित्ताने हे सांगू इच्छिता की गावामध्ये वाढणाऱ्या या अपप्रवृत्तींना कोणी रोखणारा आहे की नाही? म्हणून लेखक व्यंगशैलीचा सहारा घेतात आणि सर्व प्रकारच्या अपप्रवृत्तींवर घणाघाती प्रहार करतात. मानवीय विवशता, अन्याय, अमानुषता, भ्रष्टाचार, संपत्तीवाद याचा प्रभाव वाढल्यामुळे मानवी संबंधात एक पोकळपणा आलेला आहे. नैराश्य आणि संस्कारहीनता वाढली आहे. मूल्यांचा ऱ्हास होतो आहे. राजकारण, समाज, अर्थव्यवस्था, शिक्षण, साहित्य, संस्कृती, धर्म, नैतिकता आणि मानवीय भावना इत्यादी सर्व लेखकांच्या व्यंगाचे प्रहारक लक्ष आहेत. शाब्दिक अंतर्विरोधाचे फोलपण, अर्थहीन नारेबाजी, सुधारवादी कोऱ्या कागदी योजना, समझौतावादी दृष्टिकोण आणि विसंगतीच्या विरुद्ध न बोलू शकण्याचा आंतरिक जळफळाट तसेच आहे या परिस्थितीला व नियतीच्या जडतेला स्वीकारण्याची विवशता राग दरबारी कादंबरी प्रहारक लक्ष्य आहे.

जन्म-शताब्दी वर्ष निमित्ताने श्रीलाल शुक्लांच्या साहित्याचे पुनर्वाचन करताना जाणवतं की अत्यंत साध्या-सरळ व्यक्तिमत्त्वाच्या धनी असलेल्या या लेखकाने आपल्या समग्र साहित्याच्या माध्यमातून आजचे वास्तव मांडत सुज्ञ वाचकांना आणि पाठकांना शॉक ट्रीटमेंट देण्याच्या पद्धतीचा व्यंगात्मक कौशल्यपूर्ण वापर केला आहे. जन्म-शताब्दी वर्षानिमित्त त्यांना कोटी कोटी अभिवादन!

---



# १५४ वर्षांपूर्वीचं प्राचीन श्रीराम मंदिर !

सुरेश थोरात
धुळे, मो. ९९६०८६०७५९

नुकतेच अयोध्येत प्रभूश्री रामचंद्राच्या नूतन बालमूर्ती नवनिर्मित श्रीराम मंदिरातील गर्भगृहात स्थापित करुन प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे.त्यामुळे सर्वत्र 'राममय' वातावरण निर्माण झालं आहे.सगळ्यांच्या मनात रामनामाचा जप सुरु आहे.श्रीरामाविषयी प्रत्येकाच्या मनात एक वेगळी अपार अशी श्रद्धा आहे. धुळेकरांना सुद्धा प्रभूश्रीरामचंद्र म्हणजे श्रीराम मंदिराची माहिती ज्ञात व्हावी,म्हणून हा सविस्तर लेख सादर करीत आहे.

धुळे शहर म्हणजे ऐतिहासिक वास्तूंचा खजिना,असं म्हटलं तर वावगं होणार नाही. हया शहराला सर्व प्राचीन,पुरातन वास्तूंचा इतिहास आहे आणि आज आपण अशाच एका १५४ वर्षापूर्वीच्या प्राचीन मंदिराचा इतिहास जाणून घेणार आहोत.शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या आग्रारोड वरील 'श्रीराम मंदिर 'सहजच येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांचं लक्ष वेधून घेतं.

रत्नजडित सिंहासन ! वरी शोभे रघुनंदन !!१!!
वामांगी ते सीताबाई ! जगतजननी माझी आई !!२!!
पश्चातभागी लक्ष्मण ! पुढे अंजनीनंदन !!३!!
भरत,शत्रुघ्न भाई ! चामर ढाळती दोन्ही बाही !!४!!
नल नील,जांबुवंत ! अंगद,सुग्रीव,बिभिषण भक्त !!५!!
देह बुद्धी नेणो काही ! दास अंकित रामापायी !!६!!

या श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या अभंगामध्ये वर्णन केल्यानुसार हे मंदिर आहे. लंकाविजयी प्रभूश्री रामचंद्राचा अयोध्येतील हा 'विजयी रामदरबार' आहे. नाशिकच्या गोराराम आणि काळाराम मंदिराच्या कल्पनेनुसार धुळे शहरातील हे मंदिर जणू धुळ्याचं भूषण आहे.शहरात 'काळाराम मंदिर' असावं असं ब्रह्मचारी बुवा म्हणजेच परमपूजनीय श्री नारायण व्यंकटेश कावळे यांना वाटलं.बुवा साहेब हे रामदासी होते.खोलगल्ली तील पुरंदरे यांच्या श्रीराम मंदिरात ब्रह्मचारी बुवा श्रीरामाची अत्यंत तल्लीनतेने पूजा करीत असत.केसराचा गंध,रंगीत कपडे,नैवेद्य अर्पण असे साग्रसंगीत पूजा झाल्यानंतर धुळेकर नागरिक पूजामय रामभक्ती पाहण्यासाठी अलोट गर्दी करीत असत.

अयोध्यापती श्रीरामचंद्रांनी ज्यावेळेस लंकेवर विजय मिळवून खल प्रवृत्ती रावणाचा पराभव केला. त्यानंतर अयोध्येत जो 'विजयी दरबार 'भरला त्या दरबाराच्या वर्णनाप्रमाणे हे 'श्रीराम मंदिर' बांधण्याचे स्वप्न ब्रम्हचारी बुवा उर्फ नारायण व्यंकटेश कावळे या महात्म्यानं पाहिलं आणि या स्वप्नपूर्तीसाठी धुळ्यातील अतिशय धार्मिक व दानशूर कुटुंबीय श्री भगवानदास म्हणजे प्रसिद्ध खुशालदास दामोदरदास पेढीचे कर्ते म्हणजे प्रसिद्ध कायदे पंडित श्री गिरीधरभाई गुजराथी यांचे पणजोबा यांच्या कडे इच्छा प्रकट केली. त्यांनीही कल्पना उचलून धरीत त्वरित आग्रारोड येथील आपली जागा श्री नारायणरावांना १८७० च्या सुमारास दान केली.मंदिर बांधकामास साधारणतः १८७२ पासून प्रारंभ झाला.या मंदिराचा बांधकामाचा इतिहास असा की,नागपूरातील सीताबर्डी भागात जागा घेऊन तेथे स्वतःच्या देखरेखी खाली दगड घडविण्यात आले. कळसाचे कोरीव काम सुद्धा तेथे घडविले असून ते येथे आणून बरोबर मापात बसले. ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे.मंदिर निर्माणातील तंतोतंत कटाक्ष,समक्ष उभे राहून देवळाची रचना,मूर्ती स्थापना करून रामदासी संप्रदायाच्या यथाशास्त्रानुसार अवलंब केला आहे. जयपूरहून ह्या मूर्त्या आणून प्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत थाटात संपन्न झाला ते वर्ष होतं १८७५. हे मंदिर नागर शैलीत बांधण्यात आले असून पुढे नगरखाना होता.

अयोध्यानरेश प्रभू श्रीरामाची भारतीय ऋतुमानानुसार व सुखसंपन्न अशा राजारामाची साग्रसंगीत पूजा बुवा करायचे.म्हणजे उन्हाळ्यात श्रीखंड नैवेद्य,आंब्याचे पन्हे, चंदनाची उटी,वाळ्याचे पडदे, मलमलीचे कपडे,पंखा,तर थंडीत उबदार कपडे, खिचडीचा नैवेद्य असे ऋतूनुसार देवास सेवा देत असत.देवांची निरनिराळी वस्त्रे, टोप्या नावे घालून टापटीपपणे ठेवल्या जात. थोडक्यात ब्रह्मचारी बुवांनी भोळ्या भक्तीभावाने श्रीराम सेवा आयुष्यभर केली आणि शेवटी भौमानंद या गुरुंच्या हस्ते आतूर संन्यास घेतला.श्रावण शुद्ध प्रतिपदा शके १८२६ साली श्रीरामचरणी लीन झाले.असे ब्रह्मचारी बुवा योगानंद सरस्वती यांचे समाधी मंदिर श्री पद्मनाथ स्वामी महाराज मठा जवळील जागेत आहे.

हे मंदिर जवळपास एकशे पंचवीस वर्षे श्री.गणपतराव शेवडे,श्री.पानट,श्री.जोशी,श्र..रणसिंग,श्री मोराणकर कुटुंबीयांनी मनोभावे सेवा करून सांभाळलं. ह्या मंदिराच्या उभारणीसाठी त्याकाळी श्री.रणसिंग, श्री.जोशी,श्री.डिसा आणि श्री नाशिककर कुटुंबीयांनी भरीव मदत केली. ह्या मंदिराची रचना ही टूमदार असून तीन टप्प्यात दृष्टीस पडते.पहिला टप्पा म्हणजे मुख्य प्रवेशद्वार,दुसरा टप्पा म्हणजे भव्य सभा मंडप आणि तिसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे गर्भगृह.जे एकूण सोळा सुंदर नक्षीकाम असलेल्या खांबावर आणि सोळा सुंदर अशा कमानींवर आधारित उभं आहे.हे मंदिर म्हणजे वास्तूकलेचा, बांधकामाचा एक अति उत्कृष्ट आदर्श नमूनाच म्हणावा लागेल.ह्या मंदिराची रचना पूर्व पश्चिम अशी आहे. आपण सर्वप्रथम गर्भ गृहाबद्दल माहिती जाणून घेऊ या.शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच जूना मुंबई आग्रा रोडवर हे श्रीराम मंदिर असून हे 'पट्टाभिषिक्त श्रीराम मंदिर' आहे.पट्टाभिषिक्त म्हणजे श्रीराम रावण यांच्या युद्धानंतर म्हणजे लंका विजयानंतर अयोध्येच्या सिंहासनावर राज्यभिषेका साठी आरूढ असलेल्या प्रसंगाप्रमाणे मूर्तीचे हे अद्वितीय असं मंदिर आहे.म्हणजेच श्रीरामाचे डाव्या मांडीवर सीतामाई बसलेल्या आहेत आणि श्रीरामाच्या उजव्या बाजूस लक्ष्मण,भरत, शत्रुघ्न, दक्षिणमुखी हनुमान तर श्रीरामाचे उजव्या बाजूस नल,निल,जाम्बुवंत,कपिल असा हा संपूर्ण 'श्रीराम दरबार 'आपल्या दृष्टीस पडतो.भारतात असं रामदरबाराचं एकमेव मंदिर असावं असं जूने जाणकार सांगतात.

जमिनीपासून साधारणतः चार फूट उंचीच्या सुंदर अशा चबुतऱ्यावर सर्व मूर्त्या विराजमान झाल्या असून मूर्तीच्या मागील बाजूस भिंतीवर अल्युमिनियम धातूच्या पत्र्यावर पॉलीश केलेले चांदीचे सुंदर असं प्रभावळ असलेले दिसते. तसेच श्रीरामाची मूर्ती ही एकाच काळ्या पाषाणापासून निर्माण केलेली आहे आणि मस्तकावर सुवर्ण, अन् हिरे मोत्यांनी सजवलेला मुकुट असून चांदीची मोठी नक्षीदार छत्री सुद्धा नजरेत भरते. बारीक निरीक्षण केल्यावर गाभाऱ्याचे प्रवेशद्वार उंच असून सर्वात उंच दर्शनी भागावर उजव्या बाजूस चंद्र,ससा तर तर डाव्या बाजूस सूर्य असे कोरीव काम, तसेच गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या उंचावर दोन्ही बाजूस गजसिंहाच्या दगडी कोरीव मूर्ती आहेत. 'गजसिंह ' हिंदू पौराणिक कथेतील एक पौराणिक संकरित प्राणी आहे.जो हत्तीचे डोके किंवा सोंड असलेला सिंह किंवा राजसिंह (पौराणिक सिंह) म्हणून दिसतो. तसेच वरील दोन्ही बाजूस हत्तीच्या सोंडेचा आकार आणि मध्यभागी श्रीगणेश व आजूबाजूस रिद्धी,सिद्धी यांचं दर्शन होतं.गर्भगृहाच्या बाहेरील ओट्यावर तीन नक्षीदार कमानी असून मधली कमान मोठी व आजूबाजूच्या कमानी लहान आहेत.सुंदर असं कोरीव नक्षीकाम दगडी खांबावर कमळांच्या फुलावर आधारित असल्याचं लगेच लक्षात येतं. त्याचप्रमाणे गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर डाव्या बाजूस जय आणि उजव्या बाजूस विजय द्वारपाल यांच्या मूर्त्या आहेत. गर्भगृहाच्या बाहेरील बाजूस म्हणजे ओट्यावर चारही बाजूने एकूण सोळा कमानी सह सोळा कोरीव नक्षीकाम केलेले दगडी खांब आहेत.त्यातील दर्शनी भागाच्या खांबावरील कमानीवर आतून आणि बाहेरून दोन सुंदर अशा मोरांनी पिसारा फुलविलेला असून मध्यभागी राक्षसाचा चेहरा दर्शविला आहे.तसेच मंदिराच्या बाहेरील भिंतीवर डाव्या बाजूस भगवान हनुमानाची सुंदर संगमरवरी मूर्ती दृष्टीस पडते.भगवान हनुमान प्रभू श्रीरामचंद्राचे सहकारी आणि निष्ठावंत भक्त आहेत.जे त्यांच्या शौर्यासाठी आणि कर्तव्य भावनेसाठी ओळखले जातात.लक्ष्मणाचा जीव वाचविण्यासाठी हनुमानाने एकदा द्रोणगिरी परत उचलून आणला तो फक्त जीवन रक्षक औषधी वनस्पती - संजीवनी आणण्यासाठी. अशी ही आखीव रेखीव मूर्ती आहे.गाभाऱ्या बाहेरील भिंतीजवळ उजव्या बाजूस ही आणखी एक हनुमानाची संगमरवरी मूर्ती असून हातामध्ये गदा घेऊन उभ्या स्थितीत दृष्टीस पडते. ही मूर्ती सहसा हनुमानासह उभ्या स्थितीत राम आणि सीता यांच्या दोन्ही बाजूला बसलेले असते.परंतु येथे ही एकटी स्वतंत्र मूर्ती दृष्टीस पडते.ही मूर्ती हनुमानाची भक्ती दर्शविते आणि ती भक्ती आणि निष्ठेचे प्रतीक मानले जाते.अशाप्रकारे या मंदिरात हनुमानाच्या एकूण तीन मूर्त्या आहेत.

गर्भगृहाच्या बाहेर सोळा खांब,कमानी सह आहेत,त्याची माहिती जाणून घेऊ या.गर्भ ग्रहाच्या प्रवेशद्वारा बाहेरील डाव्या बाजूचा खांब क्रमांक एक... हा खांब पूर्णपणे दगडी असून जमिनीवर दगडाच्या आकाराचे कमळाचे फुलावर पूर्णपणे आधारित आहे. खांबावरील वैशिष्ट्य म्हणजे या खांबावर लहान अशी चार मूखी ब्रह्मदेवाची सुबक, कोरीव अशी मूर्ती आहे.इतरत्र फक्त तीन मूखी ब्रह्मच आपणास पाहावयास मिळतात. त्याच खांबावर राधाकृष्ण,विश्वामित्र ऋषी,विष्णू तसेच वरील बाजूस कमानीवर पंख असलेली परी,त्यावर राक्षसमूख,लहान बाळाला धरलेली स्त्री,पुन्हा पंख असलेली परी,मध्यभागी नागधारी शंकर भगवान,तर उजवीकडे विश्वामित्र,पुन्हा पंख असलेली परी,सोबतच लहान घोडे आणि लहान पोपटही दिसतात.डाव्या बाजूकडील खांब क्रमांक दोन...खांबाच्या बाहेरील बाजूने अकरा विविध मूर्त्या असून आतील बाजूने सात मूर्त्या असून वरील कमानीवर महिषासूर माता तसेच नंदीवरील शंकर-पार्वती, मारुतीच्या डोक्यावर मारुती, त्याच्या डोक्यावर पती पत्नीची जोडी,तसेच वरील कमानीवर एकत्रित रित्या वावरत असलेले मेंढी,सिंह आणि सिंहीण यांच्या मूर्त्या स्पष्टपणे दिसतात. डाव्या बाजूकडील खांब क्रमांक तीन...खांबाच्या बाहेरील बाजूस हरणावर बसलेली देवी आणि आतील बाजूस नक्षीकाम,वरील बाजूस चार लहान मूर्त्या दिसतात. डाव्या बाजूकडील खांब क्रमांक चार...बाहेरील बाजूस विष्णूची मूर्ती,आतील बाजूस नक्षी,फुले,पाने यांनी सुशोभित तसेच वरील बाजूस चार लहान मूर्त्या आणि कमानी वरील पोपटावर आठ विविध मूर्त्या दिसतात. डाव्या बाजूकडील खांब क्रमांक पाच...पाने,फुले,नक्षी तसेच बाहेरील बाजूस व्यापारी सदृश्य मूर्ती, मागील बाजूस नक्षी आणि कमानीवर आठ पोपटाच्या मूर्त्या व नक्षी काम दिसते.डाव्या बाजूकडील खांब क्रमांक सहा... खांबाच्या सर्व बाजूंनी पाने,फुले,नक्षी असून खालच्या बाजूस कमळाचे फुल,वरील बाजूस चार सिंहाचे मुखवटे आणि कमानी मध्ये आठ विविध मूर्त्या दिसतात.डाव्या बाजूकडील खांब क्रमांक सात...खाली कमळाच्या फुलावर आधारित खांब असून बाहेरील बाजूस पंचवीस अशा सुंदर कमळांची फुले दगडात एकमेकांवर कोरलेली दिसतात.तसेच दोन मूर्त्यासह पाने,फुलांची नक्षी सुद्धा नजरेत भरते. गर्भगृहाच्या मागील बाजूकडील खांब क्रमांक आठ... दोन दोन पोपटावर आधारित तसेच आठ पोपट कमानीवर असून पाने,फुले, नक्षी, कमळावर वरील (पान ६ वर)

# खान्देश वैभव


प्राचार्य डॉ.अनिल बैसाणे
मो.९८२३२७७६१२
प्राचार्य डॉ.सुभाष पाटील
मो.९४२२२१८९९९




# महान सेनानायक काजरसिंग ऊर्फ वीर खाज्या नाईक

राजस्थान हे भिल्ल समूहाचे मूळ वस्तीस्थान मानले जाते. स्वराज्यभिमानी भिल्ल वीरांनी परकीय आक्रमकांविरुद्ध ऐतद्देशीय राज्यकर्त्यांना सशस्त्र मदत केली होती. यात सेनापती पूंजा भिल्ल यांचा आवर्जून उल्लेख करण्यात येतो. मात्र हेच भिल्ल शूरवीर डोईजड होऊ नयेत म्हणून ऐतद्देशीयांनीच त्यांचे पारिपत्य करण्याचा उद्योग आरंभिला होता. तेव्हा भिल्ल समूहाला डोंगर, दर्या-खोर्यांचा आश्रय घ्यावा लागला. पहाडी पट्ट्यांमध्ये त्यांनी स्वतंत्र राज्य उभारून आपला आत्मसन्मान जागृत ठेवला. ऐतद्देशीयांकडून झालेली हेटाळणी ते विसरू शकत नव्हते. पुढील काळात स्थिरावलेल्या परकीय ब्रिटिश राजवटींकडूनही आपली अशीच उपेक्षा होईल म्हणून त्यांनी संघर्ष चालूच ठेवला. म्हणूनच धूर्त आणि कावेबाज ब्रिटिश शासनाने भिल्लवीरांचा हा विरोध मोडून काढण्याकरिता विशेष नीती-धोरणाचा अवलंब केला.

**विशेष नीती-धोरणाचा अवलंब :-**

स्वतंत्र आणि स्वयं:भू आचार असलेल्या भिल्ल वीरांनी ब्रिटिश राजवटीला स्थिरावण्याच्या काळापासूनच विरोध केला. म्हणूनच या स्वाभिमानी भिल्ल राजवटींचा बंदोबस्त करण्याकरिता कॅप्टन ब्रिंग्ज या मुत्सद्दी ब्रिटिश अधिकार्याची नियुक्ती करण्यात आली. त्याने मुंबईचे कमिशनर एल्फिन्स्टन याच्या सल्ल्यानुसार कार्यवाही केली मात्र यश आले नाही. म्हणून पुढे कर्नल जेम्स अर्ल औट्रम यांच्याशी विचार-विनिमय करून विशेष नीती-धोरणाचा अवलंब करण्यात आला. त्यानुसार इनामे व जहागिर्या देणे, तनखा देणे, मदत करणे असे धोरण जाहीर करण्यात आले. तरीही विरोध केलाच तर ठार मारणे असे हे विशेष नीती-धोरण होते. काहींनी या नीती-धोरणाचा स्वीकार केला. मात्र यामुळे ब्रिटिश गुलामगिरीचा पाश आपल्या गळ्याभोवती आवळला जाईल म्हणून काही स्वाभिमानी वीरांनी ब्रिटिशांना विरोध चालूच ठेवला.

**प्रशिक्षित भिल्लसेनेची उभारणी :-**

सातपुड्यातील डोंगररांगांमधील भिल्ल नाईकांनी पहाडी भागाचा फायदा घेत ब्रिटिशांना जेरीस आणले. ब्रिटिश अधिकार्यांना सर्वच आघाड्यांवर अपयशाचा सामना करावा लागत होता. म्हणूनच भिल्ल तरुणांचीच भरती करून प्रशिक्षित फौज उभारावी आणि त्यांच्याच मार्फत भिल्ल वीरांचा बंदोबस्त करण्याचे धोरण आखण्यात आले. याच्यातूनच खानदेश भिल्ल फलटण, धडगाव रायफल्स सारख्या भिल्ल फलटणी तयार झाल्यात. मात्र ब्रिटिशांचा डाव ब्रिटिशांवरच उलटविण्याचा धूर्तपणा ब्रिटिश शासनाची नोकरी पत्करून प्रशिक्षित झालेल्या भिल्ल शिपायांनी दाखविला. कारण भरती होऊन प्रशिक्षित झालेल्या काजरसिंग ऊर्फ वीर खाज्या नाईक यांनी ब्रिटिशांविरुद्धच युद्ध छेडले.

**काजरसिंग ऊर्फ वीर खाज्या नाईक :-**

ताहराबाद परिसरातील (ता. सटाणा, जि. नाशिक ) एका आदिवासी वस्तीत वास्तव्य करीत असलेला बरडा भिल्ल म्हणजेच कजर्या नाईक होय. सालदारकी करीत असलेला कजर्या नाईक कधी-कधी रस्ता लूटही करीत. मिळालेली लूट मात्र तो आपल्या दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाज बांधवांना देत असे. अशाच एका लूट प्रकरणात पोलीस त्याच्या मागावर होते. तेव्हा त्याने ताहराबादच्या पूर्वेकडील टेकड्यांचा आश्रय घेतला. व तेथून सरळ येवला येथे आपल्या नातेवाईकांकडे निघून गेला. तेथेच कजर्यास अहिल्यानगर पूर्वीचे अहमदनगर येथे पोलीस भरती असल्याचे समजले. हजर झालेल्या कजर्याची निवड झाली, मात्र यावेळी कजर्याने आपले नाव काजरसिंग म्हणून नोंदविले होते. त्यामुळे पोलीस खात्यात भरती झालेल्या कजर्याचे ब्रिटिश दप्तरी काजरसिंग नाईक अशी नोंद करण्यात आली.

**घोडा व बंदूकधारी काज्या नाईक :-**

पोलीस प्रशिक्षण घेतल्यानंतर काजरसिंगला नायकाला दर्जा देण्यात आला. शिरपूर पासून ते सेंधवा पर्यंतच्या ४० मैल अंतरावरील महामार्गाच्या सुरक्षेची जबाबदारी सोपविण्यात आली. घोडा व बंदुकधारी काजरसिंगच्या नेतृत्वात काही पोलीस शिपाई देण्यात आले होते. या परिसरातील लोकांकडून काजरसिंगाला काज्या नाईक म्हणून ओळख मिळाली. काज्या नाईकाचेच पुढे खाज्या नाईक असे नाव रूढ झाले. खाज्या नाईक घोडेस्वारी व नेमबाजीत निपुण होता. धाडसी, शूर व कुशल संघटक असलेल्या खाज्या नाईकाने सन १८३१ ते १८५१ पर्यंत इमानदारीने ब्रिटिश शासनास सेवा पुरविली. या वीस वर्षाच्या काळात ह्या घाटपरिसरात एकही चोरी, लूट प्रकरण उद्भवले नाही. एवढा दरारा खाज्या नाईकांनी निर्माण केला होता.

**सशस्त्र उठावाची योजना :-**

ब्रिटिश पोलीस दलात नायक म्हणून प्रामाणिकपणे कार्य करणार्या खाज्या नाईकला पुढे मात्र काही वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागले. एका लूट प्रकरणातील गुन्हेगाराला कबुली जबाब घेताना झालेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. खाज्या नाईकवर खटला भरण्यात येऊन तो साबित करण्यात आला. दहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली. मात्र तुरुंगातील त्याच्या चांगल्या वर्तनामुळे पाच वर्षातच सुटका करण्यात येऊन सन १८५७ मध्ये पुन्हा नोकरीवर घेण्यात आले. यावेळी कॅप्टन बर्च सारख्या ब्रिटिश अधिकार्यांकडून त्याला अपमानास्पद वागणूक देण्यात आली. ब्रिटिशांना आपल्यावर गुलामगिरीचे पारतंत्र्यच लादावयाचे असल्याचे त्याच्या लक्षात आले. तेव्हा अशा परकीय ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करून आपल्या देशातून घालविण्याचा त्याने निश्चयच केला.

**राष्ट्रीय लष्कराची उभारणी :-**

खाज्या नाईकाने जनता आणि पोलीस पाटील यांचा विश्वास संपादन केला होता. त्याने ब्रिटिश नोकरीचा त्याग करून ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठावाची तयारी चालविल्याचे




आंबापाणी येथील रणसंग्रामात हौतात्म्य पत्करणाऱ्या भिल्ल वीरांच्या विरगळ (प्रस्तावित स्मारक) श्री.सुनील थोरात, श्री.दोधा खुमसिंग, श्री.राहुट्या खजान.

कळताच अतिशय हुशार व मुत्सद्दी भिल्ल क्रांतीवीर भीमा नाईक त्यास येऊन मिळाला. हे वृत्त सर्वत्र पसरताच अक्राणीमहल येथील काळुबाबा, मवासिया नाईक, आनंदा नाईक, भाऊसिंग रावल, रुमाल्या नाईक असे शूरवीर आपल्या अनुयायांसह खाज्या नाईकांच्या नेतृत्वात एकत्र आलेत. यामुळे सुमारे १५०० लढवय्या सैनिकांची ही फलटण उभी राहिली. तसेच धार व इंदोर राज्यातील मुक्त झालेले पेंढारी, पठाण, अरब, रोहिले, मक्राणी हे सैनिकही खाज्या नाईकांना येऊन मिळालेत. तसेच भीमा नाईकांचे सर्वत्र संपर्क होते. त्यामुळे झाशी, ग्वाल्हेर, सिन्नर येथील क्रांतीकारकांकडून सर्वतोपरी सहकार्य मिळत असे. भीमा नाईक हा लुटीचा माल खपवून आपल्या सैन्याकरिता हत्यारे खरेदी करीत असे. सिन्नरच्या भागोजी नाईकांशी संधान साधून निजामाकडून आणि बडवानीच्या राजाकडून शस्त्रास्त्रे, दारुगोळा मिळविण्याचा त्याचा प्रयत्न राहत असे. तसेच खाज्या नाईक व भीमा नाईक यांनी नेमाड, नाशिक, अहिल्यानगर या भागातील भिल्ल वीरांशीही संपर्क ठेवून मदत मिळविण्याचाही प्रयत्न चालविला होता. एवढेच नव्हे तर भीमा नाईक स्वतःला दिल्लीच्या बादशहाचा प्रतिनिधी समजत असे. असे राष्ट्रीय स्तरावरचे लष्कर खाज्या नाईक व भीमा नाईक यांनी उभारले होते.

**सात लाखाच्या खजिन्याची लूट :-**

लष्करी सज्जता झाल्यानंतर घाटावर नियंत्रण बसविले. गाड्या, वाहने यांच्याकडून कर वसुली सुरू केली. रुमाल्या नाईकांच्या नेतृत्वात तर सारंगखेडाची लूट केली. यानंतर त्यांनी ब्रिटिश शासनाला जबरदस्त हादरा देण्याची योजना हाती घेतली. कारण त्यांना इंदोरहून सात लाखाचा खजिना मुंबईला जात असल्याची वार्ता लागली होती. तीनशे सैनिकांच्या बंदोबस्तात जाणारा खजिना बिजासनी घाटातील जांभळी चौकीजवळ १७ नोव्हेंबर १८५७ रोजी लुटण्यात आला. तरीही शांत न बसता नंदुरबार, सुलतानपूर, शहादा या परिसरात खाज्या नाईकांच्या नेतृत्वात आक्रमणे होतच राहिली. घाट मार्ग ताब्यात आल्याने मुंबई-आग्रा मार्ग असुरक्षित बनला. म्हणून मुंबई-आग्रा रहदारी ब्रिटिशांना बर्हाणपूर मार्गाने वळवावी लागली.

**आंबापाणीचा भीषण रणसंग्राम :-**

या देशातील अनेक राज्ये-संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात विलीन झाली. मात्र आदिवासींनी आपल्या अस्मितेपोटी ब्रिटिशांविरुद्ध लढे चालूच ठेवले होते. सातपुडा पट्ट्यातील भिल्ल वीरांच्या पाडावाकरिता शासनाने लेफ्टनंट केनडी, कर्नल बर्च, कॅप्टन ब्रिंग्ज, कर्नल औट्रम सारख्या लष्करी अधिकार्यांना मुलकी अधिकारही दिले होते. मात्र त्यांना अपेक्षित यश येत नव्हते. म्हणून शेवटी मेजर इव्हॉन्सने ब्रिटिश सामर्थ्याचा प्रत्यय आणून वाटाघाटीचा मार्ग स्वीकारला. मात्र खाज्या नाईक व भीमा नाईक यांनीही लष्करी डावपेचाद्वारे आपणही कमी नसल्याचे दाखवून दिले. शेवटी ११ एप्रिल १८५८ रोजी मेजर इव्हॉन्सने आंबापाणी येथे खाज्या नाईक व भीमा नाईक यांच्यावर हल्ला चढविला. (सद्यस्थितीत शिरपूर तालुक्यातील पळासनेरच्या पूर्वेस दोन ते अडीच कि.मी. वर आंबापाणी हे गाव मालवण पंचायत, वरला तहसील, जि. बडवानी, मध्य प्रदेश मध्ये येते.)

सकाळपासून सुरू झालेला हा रणसंग्राम साडेतीन वाजेपर्यंत चालू होता. ब्रिटिशांची शिस्तबद्ध आधुनिक शस्त्रास्त्रांनी युक्त अशी फौज होती. असे असले तरी खाज्या नाईक व भीमा नाईक यांच्या नेतृत्वातील भिल्ल सैनिकांनी गनिमी पद्धतीने म्हणजेच डोंगरदर्याच्या आश्रयाने पारंपारिक हत्यारांनी ब्रिटिश फौजेवर हल्ले चढविले. यात ब्रिटिशांचे १६ शिपाई व दोन अधिकारी ठार झालेत. तर ४५ जखमी झाले होते. भिल्ल सेनेतील ६५ भिल्ल वीरांना हौतात्मे प्राप्त झाले तर १७० वीर घायाळ झाले. बंदी बनविण्यात आलेल्या ७२ भिल्ल सैनिकांना मृत्युदंड सुनावण्यात येऊन सामुदायिकपणे गोळ्या घालून ठार करण्यात आले. या युद्धात भिल्ल सैनिकांना मदत करणार्या ४६० स्त्रिया व लहान मुलांना पकडून धुळे येथील कारागृहात ठेवण्यात आले होते.

**वीर खाज्या नाईक यांचा विश्वासघात :-**

आंबापाणीच्या रणसंग्रामात खाज्या नाईकांचा एकुलता एक मुलगा पोलादसिंगसह अनेक जीवाभावाचे साथीदार कामी आले होते. तर खाज्या नाईकांची पत्नी, बहीण व भीमा नाईकांची पुतणी, भाऊ रावल यांची पत्नी ब्रिटिशांच्या कैदी बनल्या होत्या. पोलादसिंगच्या पत्नीला सामुदायिक मृत्युदंड प्रसंगी ठार करण्यात आले होते. याचा सूड खाज्या नाईकास घ्यावयाचा होता. म्हणूनच ब्रिटिश शासनाने खाज्या नाईकाला बिनशर्त माफी दिली असतानाही त्याने ब्रिटिशांविरुद्धच्या आक्रमक कारवाया चालूच ठेवल्या होत्या. नांदगाव व चाळीसगाव येथे त्याने धाडसी दरोडे घातले होते. म्हणून जमादार रोहिद्दीन नाईक यांच्यामार्फत खाज्या नाईकास पकडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात त्यांना यश आले नाही. म्हणून खाज्या नाईकाच्या अंगरक्षकालाच फितूर करण्यात आले. ब्रिटिश आमिषाला बळी पडून त्यानेच विश्वासघाताने सन १८६० मध्ये झोपलेल्या अवस्थेत खाज्या नाईकाची हत्या केली. त्याचे शीर धरणगाव येथील ब्रिटिश वखारी शेजारील लिंबाच्या झाडाला टांगून ठेवण्यात आले होते. आठवडाभर हे शीर टांगून ठेवण्यामागे ब्रिटिशविरोधकांना दहशत बसावी असा हेतू होता.

या ठिकाणी एक उल्लेख करणे आवश्यक वाटते की, आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांनाही फितूरीनेच पकडल्यानंतर पुणे येथे जुन्या कारागृह परिसरातील (हल्लीचे तहसिल कार्यालय, स्वारगेट) पिंपळ वृक्षाला तीन दिवस त्यांचे मृत शरीर लटकावून ठेवण्यात आले होते. हे पिंपळ वृक्ष आजही राजे उमाजी नाईक यांच्या हौतात्म्याची साक्ष देत उभे आहे. आंबापाणीच्या रणसंग्रामात हौतात्मे पत्करणार्या भिल्ल शूरवीरांना येणार्या ११ एप्रिल या पुण्यस्मरण दिनानिमित्त विनम्र अभिवादन ।

# सुजाण पालक


डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७




# मुलांना संकटावर मात करायला शिकवा



एका आलिशान कार मध्ये बसलेली एक छोटी मुलगी आज शाळेत धावण्याच्या स्पर्धेत पडली म्हणून रडत बसलेली होती! खूप लागलेलं नव्हतं, पण खूप घाबरलेली होती! आता मी शाळेतच जाणार नाही म्हणून रुसून बसली होती! कार सिग्नल ला थांबली! त्या चौकात अतिशय भरदाव वेगाने धावणाऱ्या ट्रॅफिक च्या मधोमध आपल्या इवल्याशा तान्ह्या बहिणीला एका हातात घेऊन दुसऱ्या हातात फुगे धरून एक तिच्याच वयाचा मुलगा कार जवळ आला! त्याच्याकडून फुगा घेतल्यावर कार मधली मुलगी रडायची थांबली! तेव्हा तिची आई म्हणाली, तो मुलगा पाहिला का? आपल्या परिस्थिती वर रडत न बसता , हार न मानता, इतक्या अडथळ्यांना पार करत लढतो आहे, आणि तू इतकंसं लागलं म्हणून शाळा सोडायचं म्हणते आहे? संकट आलं तरी न डगमगता त्यावर मात करण्यासाठी एक उपजत सिस्टीम आपल्याला निसर्गतःच मिळालेली असते, पण सुखलोलुप जीवनशैलीत आपण या सिस्टीमचा वापर विसरत चाललो आहोत!

संकट आलं की मुळूमुळू रडणाऱ्या पिढीला संकटावर मात करणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या गोष्टी शिकवायला हव्या! शून्यातून जग निर्माण करणाऱ्या संघर्षाला शिकवायला हवं! मुलांना संकटांवर मात करायला शिकवायला हवं! आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनशैलीत मुलांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणं पुरेसं नाही, तर त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम बनवणंही तितकंच महत्त्वाचं आहे. जीवनात येणाऱ्या अडचणी, अपयशं आणि संघर्षांना धैर्याने तोंड द्यायला शिकवणं ही पालकांची आणि शिक्षकांची जबाबदारी आहे. संकटांवर मात करण्याची क्षमता म्हणजेच रेझिलियन्स (Resilience).

मुलांना रेझिलियन्स शिकवण्याचे महत्त्व

१. स्वतःवर विश्वास वाढतो - जेव्हा मूल अपयशातून शिकतं, तेव्हा त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि ते पुढील आव्हानांसाठी तयार होतं.

२. समस्या सोडवण्याची कला शिकतात - संकट आलं की घाबरण्यापेक्षा त्यावर उपाय शोधायचा असतो, हे मूल शिकतं.

३. भावनिक स्थैर्य निर्माण होतं - मानसिकदृष्ट्या सक्षम असलेली मुलं नैराश्यात न जाता मार्ग काढतात.

४. स्वतंत्र विचारसरणी विकसित होते - अडचणींवर मात करताना त्यांची निर्णयक्षमता सुधारते.

मुलांना संकटांवर मात करायला कसं शिकवायचं?

१. अपयशाला स्वाभाविक मानावं

मुलांना हे शिकवणं गरजेचं आहे की अपयश म्हणजे काहीतरी चूक नाही, तर शिकण्याची संधी आहे. अपयश म्हणजे यशाचा पहिला टप्पा हे समजावून सांगायला हवं.

२. स्वतःहून प्रयत्न करायला शिकवा

प्रत्येक अडचणीला पालकांनी तत्काळ उपाय द्यायचा नाही, तर मुलांना स्वतःहून विचार करायला प्रवृत्त करायला हवं. यामुळे ते परिस्थितीशी सामना करायला शिकतात.

३. भावना स्वीकारायला शिकवा

राग, दुःख, निराशा यासारख्या भावना नाकारण्यापेक्षा त्यांना समजून घ्यायला शिकवलं पाहिजे. तू दुःखी असलास तरी ठीक आहे, आपण यातून शिकू शकतो असं सकारात्मक दृष्टिकोन देणं महत्त्वाचं आहे.

४. चुका स्वीकारायला शिकवा

चूक झाली तरी हरकत नाही, पण त्यातून शिकायला हवं हा दृष्टीकोन विकसित करायला हवा. मूल चुकलं तर त्याला फटकारण्याऐवजी त्यातून काय शिकता येईल, हे विचारायला हवं.

५. सकारात्मक दृष्टिकोन वाढवा

कठीण परिस्थितीतही आशावादी राहण्याची सवय लावली पाहिजे. संकटांना संधी मानणं शिकवलं तर जीवनात पुढे जाणं सोपं होतं.

६. मुलांमध्ये चिकाटी वाढवा


एखाद्या गोष्टीत अपयश आलं तरी सोडून द्यायचं नाही, हा दृष्टिकोन विकसित करणं महत्त्वाचं आहे. यासाठी खेळ, कला किंवा इतर उपक्रमांमध्ये सातत्य ठेवायला शिकवावं.

मुलांना मानसिकदृष्ट्या सक्षम बनवणं ही काळाची गरज!

आज जग झपाट्यानं बदलत आहे. स्पर्धा वाढली आहे, तणाव वाढला आहे. भविष्यात यशस्वी होण्यासाठी मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान असून उपयोग नाही, तर मानसिक लवचिकता आणि संकटांवर मात करण्याची क्षमता असणं गरजेचं आहे. त्यामुळे त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी लहानपणापासूनच सकारात्मक दृष्टिकोन, प्रयत्नशीलता आणि भावनिक स्थैर्य शिकवायला हवं. मुलांना संकटांवर मात करायला शिकवा आणि त्यांना एक सक्षम, आत्मविश्वासी व्यक्ती बनवा!

# राशी भविष्य


सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०



मेष वृषभ मिथुन कर्क सिंह कन्या



तूळ वृश्चिक धनू मकर कुंभ मीन

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी डगमग डोलणारा आहे. कुठल्यातरी दोन किंवा अधिक गोष्टींमुळे तुम्ही तारेवरची कसरत करणार आहात. लक्ष एकाग्र न राहता विचलित जास्त होण्याची शक्यता आहे. हवे तसे ध्येय साध्य करायला अवघड आहे पण तरीही तुम्ही सांभाळत असलेल्या सर्व गोष्टीत तुम्ही पुढे वाढणार आहात आणि हेच महत्त्वाचे आहे! या आठवड्यात तुम्ही आर्थिक निर्णय पुढे ढकला. सगळीकडे उत्तुंग यशाची अपेक्षा ठेवू नका. दडपण न घेता यालाच जीवन ऐसे नाव समजून हा सप्ताह हलकेपणाने घालवा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी चढाओढीचा असणार आहे. किरकोळ वादविवाद किंवा भांडणं होऊ शकतात. एखादी स्पर्धा किंवा परीक्षा द्यायची वेळ येईल. अपेक्षित यश गाठण्यासाठी अडथळे येऊ शकतात. काही लोकांमुळे हातची संधी जाऊ शकते. नोकरी व्यवसायात तुमच्या मताला किंमत मिळण्यासाठी तुम्हाला बरीच धडपड करावी लागेल. या आठवड्यात इतरांवर पटकन विश्वास ठेवू नका. लोकांना काहीतरी पटवून देण्यापेक्षा त्यांना ते आपोआप पटेल असं करुन दाखवा!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी थोडा विरंगुळा मिळण्याचा असणार आहे. तुम्ही पूर्वी श्रम केले आहेत, आता या आठवड्यात तुम्हाला त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतील. तुम्ही आत्मपरीक्षण करू शकाल आणि काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करू शकता. तुम्ही भौतिक सुखात आरामात असाल. या आठवड्यात तुम्ही काळजी सोडून आनंद घेण्याची गरज आहे. हा वेळ स्वतः मधे सुधारणा करण्यासाठी वापरा. जरी तुमच्याकडे चांगली संपन्नता असली तरी वस्तूंचा अतिरेक वापर करू नका. गरजेपुरताच वापर करा. कसलाही दिखावेपणा करू नका!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी उत्साहाचा आणि आनंदाचा आहे. काहीतरी नवीन शिकायला मिळेल. अडकलेल्या गोष्टी काही प्रमाणात पुढे सरकतील. दुरावलेली नाती जवळ येतील. एखादी आनंदाची बातमी येऊ शकते. तुम्हाला समाधान लाभेल. लहान मुलांमध्ये मन रमेल. या आठवड्यात तुम्हाला मुंगी होऊन साखर खाण्याची गरज आहे. सगळ्यांना मदत करा, दुसऱ्याचे एखादे काम स्वतःहून करा! चित्ते प्रसन्ने भुवनं प्रसन्नं या प्रमाणे मन आनंदी ठेवलंत तर घर आनंदी राहील हे लक्षात ठेवून वागा.

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी एका महत्त्वाच्या कलाटणीचा असणार आहे. तुमच्या मनाप्रमाणे नसलेले बदल घडतील आणि तुम्हाला शरणागती पत्करावी लागेल. अपेक्षित ध्येय गाठण्यात अजून वेळ आणि कष्ट लागतील. पण असं असूनही घाबरु नका, हे बदल सुधारणा करण्यासाठी गरजेचे आहेत. बदल हा निसर्गाचा नियम आहे हे विसरू नका! या आठवड्यात तुम्ही स्वतःचा अहंकार आणि मोठेपणा बाजूला ठेवून वागण्याची गरज आहे. आलेल्या परिस्थितीशी झगडायला जाऊ नका, शांतपणे स्वीकार करा!

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम आणि शंका निर्माण करणारा ठरु शकतो. तुमचा स्वतः वरचा विश्वास कमी होऊ शकतो.




*टॅरो कार्डनुसार हा आठवडा मिथुन कन्या तूळ मकर यांना लाल सिग्नल ; वृषभ सिंह वृश्चिक धनू मीन यांना पिवळा सिग्नल ; मेष कर्क कुंभ यांना हिरवा सिग्नल!

इतरांनी तुमच्या डोक्यात काहीतरी घातले तर तुम्ही पूर्णपणे त्यांच्या प्रभावाखाली राहाल अशी शक्यता दिसते आहे. पण स्वतःला मजबूत ठेवले, मन भक्कम ठेवले तर हा सप्ताह तुमच्यातील कलेला, सृजशीलतेला वाव देणारा ठरेल! या आठवड्यात तुम्ही मनावर ताबा ठेवण्याची गरज आहे. मनाप्रमाणे वागता वागता तुम्ही वाहवत तर जात नाही ना याकडे लक्ष द्या. ध्यान मेडीटेशन प्रार्थना करा.

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक नवीन सुरुवात घेऊन येत आहे. कामामध्ये संथ पण आश्वासक अशी वाटचाल होईल. आर्थिक दृष्ट्या हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक आहे. समाधानकारक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबात, आरोग्यात, कामात स्थैर्य लाभेल. या आठवड्यात तुम्ही काहीतरी नवीन शिकण्यासाठी तयार रहा. येणाऱ्या संधीचे सोने करुन घ्या. मुंगी होऊन साखर खाऊन घ्या. आर्थिक गुंतवणूक विश्वासार्ह ठिकाणी करु शकता. लहान गोष्टींमध्ये आनंद माना. आकाशात उडायचे असेल तर आधी पाय जमिनीवर ठेवावे लागतात हे विसरु नका.

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन, गायन, वादन यासारख्या गोष्टींत मन रमवा!

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी पेलायला थोडा अवघड असला तरी हताश होण्याचे कारण नाही. कारण यातूनच तुम्ही सुधारणा करु शकणार आहात. काही प्रमाणत ताण किंवा दडपण येऊ शकते, पण निराश होऊ नका. कामामध्ये तुम्ही शेवटच्या टप्प्याजवळ तुमची परीक्षा होणार आहे. मनाने भक्कम राहून पुढची वाटचाल केली तर काही प्रमाणात यश मिळेल. या आठवड्यात तुम्ही खूप गोष्टी एका वेळी अंगावर घेऊ नका. अतिविचार करणे सोडा. चार चौघात बोलून मोकळे व्हा. डोके, डोळे, पाठ, कंबर यांची विशेष काळजी घ्या. गरज वाटत असेल तर विश्रांती घ्या.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे, शक्ती आणि सामर्थ्य देणारा आहे. तुमचा आत्मविश्वास चांगला राहील, इच्छाशक्ती भक्कम राहील. कोणतीही समस्या सोडवायला तुम्हाला योग्य मार्ग सुचतील. या आठवड्यात तुमच्यासाठी सगळ्यात महत्त्वाचे आहे संसाधनांचा योग्य उपयोग. काहीही वाया घालवू नका आणि कशाचाही अतिवापर करू नका. बुद्धीने निर्णय घ्या, भावनांमध्ये अडकू नका. ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी लवचिक आणि चपळ रहा. जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला हे लक्षात ठेवून स्वावलंबी व्हा!

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक सुख समृद्धी घेऊन येत आहे. तुम्हाला एखादे लहान ध्येय गाठता येईल. एखादी हवी असलेली वस्तू घेता येईल. आर्थिक लाभ होऊ शकतो. अस्थिर परिस्थिती सुधारेल. एकंदरीत हा काळ अगदी पूर्ण नाही पण काही प्रमाणात यश देणार आहे. या आठवड्यात तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. तुमच्या आर्थिक सक्षमतेने इतरांना मदत कशी करता येईल याचा विचार करा. संकुचित वृत्ती सोडा. मन मोठे करा. सगळ्यांना सामावून घ्या. तुमच्या वर्चस्वाचा गैरवापर करू नका. अहंकारासारखा दुसरा शत्रू नाही हे लक्षात ठेवा!

**शौर्योद्गारांचा इतिहास**

संजय धनगर
मो.९६३७३२५१६०

# रयतेला सुखी ठेवणे हे माझे कर्तव्य आहे...!

रयतेला सुखी ठेवणे हे माझे कर्तव्य आहे..! हे उद्गार थोर पराक्रमी, मानवतावादी विचारधारा असलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे ! त्यांच्या राज्यकारभाराच्या काळात रयतेला त्रास होऊ नये, त्यांचेवर अन्याय होऊ नये, रयतेचे रक्षण व्हावे ही आपली प्राथमिक जबाबदारी..! म्हणून ग्वाल्हेर संस्थानातील जनतेच्या सुखासाठी त्यांनी प्रजाहीतदक्षपणे कारभार केला. त्यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाईं होळकरांनी वरील उद्गार काढले होते.





मोगलाईतील तत्कालीन औरंगाबाद जिल्ह्यातील बीडमधील चौंडी या गावी अहिल्याबाईचा जन्म इ. स. १७२५ च्या सुमारास झाला. त्या काळात येथील भूप्रदेश कायम दुष्काळी, राजकीयदृष्ट्या मागासलेला, लोकांचे दारिद्र्य हे अहिल्याबाईने प्रत्यक्ष पाहिले होते. ही परिस्थिती बदलली पाहिजे असे अहिल्याबाईला बालवयातच मनोमन वाटे. छोटी अहिल्या अशा वातावरणात लहानाची मोठी झाली. घोड्यावर बसणे, रपेट करणे हा तिचा लहान वयातील छंद होता. लहानपणा पासून धीटपणा, विनयशीलता अगंतुकांचे स्वागत करण्यातील अगत्य पाहून मल्हारराव होळकरांनी आपला पुत्र खंडेरावाबरोबर अहिल्याबाईचा विवाह त्या काळाच्या रीतीरिवाजप्रमाणे बालपणीच, म्हणजे वयाच्या आठव्या वर्षी इ. स. १७३३ मध्ये लावून दिला. मल्हाररावांनी अहिल्येला आपली सून न मानता तिच्यावर लेकीप्रमाणे प्रेम केले. त्याहीपेक्षा अहिल्याच माझा 'पुत्र' आहे अशी भावना ठेवली.

अहिल्याबाईंना संसाराबरोबरच राजकारणाचे धडे दिले. घरचे वातावरण तसे धार्मिक, वृत्तवैकल्ये यात अहिल्या रमली. अहिल्याबाई संसारी झाली; परंतु तिला पती खंडेरावपासून फारसे सुख मिळाले नाही. पती खंडेराव व्यसनी वृत्तीचे, तापट स्वभावाचे व स्वच्छंदी जीवनशैलीचे होते. खंडेराव हा ग्वाल्हेर संस्थानची दौलत सांभाळण्याच्या योग्यतेचा नाही हे ओळखून मल्हाररावांनी दौलतीचा कारभार अहिल्याबाईकडे सोपवला.

दौलतीचा कारभार हाती घेतल्यापासून अहिल्याबाईंना कौटुंबिक व राजकीय अशा अनेक दुःखद घटना व संकटांना तोंड द्यावे लागले; परंतु आपल्या प्रजाजनांकडे मात्र थोडेदेखील दुर्लक्ष होऊ दिले नाही. अतिशय नाजूक व बिकट प्रतिकूल परिस्थितीतून आपली दौलत वाचवली. त्या काळात चोर- दरोडेखोर यांची दांडगाई वाढली होती. त्यांचेकडून रयतेवर अन्याय केला जात होता. या काळात चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी व प्रजेच्या सुखासाठी अहिल्याबाईंनी आपली मुलगी पणास लावली. त्यासाठी त्यांनी असे जाहीर केले, की जो कोणी शूरपुरुष ग्वाल्हेर संस्थानातील चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त करेल व रयतेसाठी शांतता निर्माण करेल त्याचे लग्न माझ्या मुक्ताबाईशी म्हणजेच अहिल्याबाईच्या कन्येबरोबर लावून दिले जाईल. दरबारात असे जाहीर झाल्यानंतर वीर यशवंतराव फणसे या धाडसी तरुणाने या कामात यश मिळवले. या कामाने संतोष झालेल्या अहिल्याबाईंनी आपली मुलगी मुक्ताबाईचा त्या वीर तरुणाबरोबर विवाह लावून दिला. परजातीमध्ये विवाह करणे त्या काळच्या सामाजिक परिस्थितीमध्ये त्यांनी दाखवलेले धाडस अधिक पुरोगामी होते. त्याबाबतीत अहिल्याबाई म्हणतात की, *परमेश्वराने माझ्यावर जी जबाबदारी टाकलीय, ती मी पार पाडतेय. रयतेला सुखी ठेवणे हे माझे कर्तव्य आहे...!* राज्यातील कुणावरही अन्याय होऊ नये. प्रजेचा मानसन्मान ठेवलाच पाहिजे. राज्यातील जनतेवर अन्याय होऊ न देण्याचे त्यांनी प्रयत्न केले. रयतेवर अन्याय ते सहन करत नसत म्हणून त्यांच्या न्यायबुद्धीची तुलना रामशास्त्री प्रभुणे यांच्या निःस्पृह न्यायबुद्धीशी केली जाई.




महाराष्ट्राने या देशालाच नव्हे, तर संपूर्ण जगालाच पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर हे अनमोल रत्न बहाल केले आहे. जनसामान्यांसाठी जीवनभर अहिल्याबाईंनी तन-मन-धन अर्पण केले. त्या जनतेच्या सुखदुःखात सामील झाल्या. आपले वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून संस्थानातील रंजल्या गांजल्या जाणतेसाठी आपला देह चंदनाप्रमाणे झिजवला. अशी ही लोकोत्तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य व त्यांनी जनतेच्या हितासाठी केलेला आदर्श राज्यकारभार आजही आधुनिक राज्यपद्धतीमध्ये आपल्याला मोठा प्रेरक व मार्गदर्शक ठरणारा आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई देवी यांनी केलेला राज्यकारभार कोणत्याही राज्यकर्त्यापेक्षा आदर्श असाच मानला जातो.

# १५४ वर्षांपूर्वीचं प्राचीन श्रीराम मंदिर !

**(पान ४ वरुन)** बाजूस चार लहान मूर्त्या दृष्टीस पडतात. श्रीराम मंदिराच्या अगदी पाठीमागे लहानसं परंतु सुंदर असं 'भगवान परशुरामाचं' मंदिर आहे. तसेच मंदिराच्या ईशान्य दिशेस शंभर वर्षांपूर्वीची गोड पाण्याची जिवंत विहीर आजही अस्तित्वात आहे.मागील बाजूकडील खांब क्र.नऊ ...कमळ,फुले,पाने आणि नक्षी असून वरील कमानीवर दोन दोन पोपटावर सहा वानरांची फळे खातांना मूर्त्या दिसतात.मागील बाजूकडील खांब क्र.दहा ... कमळ,फुले,पाने, कमानीवर दोन दोन पोपटावर दहा पोपट असून चार लहान मूर्त्या आहेत.कोपऱ्यातील खांब क्र. अकरा ...कमळ,फुले, पानांची नक्षी,असून खांबावर दोन मूर्त्या आणि वरील चारही बाजूने चार मेंढ्या आणि बाहेरील बाजूने पंचवीस कमळांची फुले पूर्ण दगडात एकमेकावर कोरलेली आहेत. गर्भगृहाच्या उजव्या बाजूकडील खांब क्र. बारा...पाने,फुले,कमळ आणि सर्व बाजूंनी नक्षीकाम असलेले वरील चारही बाजूने चार वानरे, तसेच कमानीवर सात मुलासह एक स्त्री दिसत आहे.उजव्या बाजूकडील खांब क्र.तेरा... खांबाच्या चारही बाजूने पाने,फुले,कमळ आणि वरील बाजूस चार लहान मूर्त्या दिसतात. उजवी बाजू कडील खांब क्र.चौदा...लहान कमान असून दोन दोन पोपटावर एकूण चार पोपट आहेत.संपूर्ण नक्षीकाम पाने,फुले, कमळ इ.दिसत आहेत. तसेच कमळासह बाहेरील बाजूस चार पक्षी, कमानीवर दोन दोन पोपट असून भजन, कीर्तन आणि वाद्य वाजवणारे वादक व त्यांचे सोबत दहा मूर्त्या दिसतात. उजव्या बाजू कडील खांबक्र.पंधरा... दर्शनी भागावर पाने,फुले, कमळाच्या आकाराच्या दगडाचा खाली बेस असून खांबावर एकूण आठ मूर्त्या आहेत.त्यात मोर,ससा, पोपट ,कुत्रा आणि वरील बाजूस चार मेंढ्या,बाहेरील बाजूस अकरा प्रकारच्या विविध मूर्त्या आणि कमानीवर दोन दोन पोपटावर चार मूर्त्या दिसतात.उजवी कडील खांब क्र.सोळा ... गर्भगृहाचा बाहेरील भाग आणि प्रवेश करताना उजव्या बाजूस खांबावर पाने,फुले, नक्षीकामासह कमळ, विष्णूभगवानचा कुर्मावतार, मत्स्य अवतार,कमरेवर हात ठेवून उभ्यास्थितीत विष्णू भगवान,एका स्त्रीचे डोक्याचे केस धरून उभी असलेली दुसऱ्या स्त्रीची मूर्ती दिसत आहे. असे हे एकूण सोळा नक्षीदार दगडीखांब कमानीसह आणि प्रत्येक दगडीखांब हा कमळाच्या आकाराच्या नक्षीकाम केलेल्या बेसवरच उभा आहे.

आता सभामंडपाची माहिती जाणून घेऊ या...श्रीराम मंदिराचा भव्य असा सभामंडप असून साधारणतःपंचवीस फूट लांब आणि पंचवीस फूट रुंदीचा असून सभामंडपाची उंची जमिनीपासून जवळपास तीस फूट आहे.वीस सागवानाचे भरभक्कम खांब असून एका खांबाची रुंदी साधारणपणे एक फुटापेक्षा अधिक आहे.प्रत्येक खांबाच्या खाली दोन बाय दोन फुट आकाराचा नक्षीकाम केलेला दगडी बेस असून त्यावर हे चौकोनी खांब उभे आहेत.सोबतच वीस खांबाप्रमाणे वीस भव्य अशा कमानीसुद्धा दिसतात. सदर मंदिर हे पेशवे टाईप असून दोन मजली सभामंडप हवेशीर आहे.बैठक व्यवस्था एखाद्या मोठ्या वाड्यासारखी दिसते.सभामंडपात मध्यभागी काचेचं भलं मोठं असं चौदा रंगीत लाईटांचं झुंबर तसेच अठरा काचेच्या हंड्या रंगीत लाईटासह मंडपाची शोभा वाढवतात.तर गाभाऱ्यातील सोळा रंगीत काचेच्या हंड्या सहज आपलं लक्ष वेधून घेतात.

मंदिराचा जीर्णोद्धार... सन २००० मध्ये झालेल्या वादळी पावसामुळे मंदिरा समोर असलेलं मोठं झाड मंदिराच्या कौलारू छपरावर कोसळलं व मंदिराचं मोठं नुकसान झालं.त्यावेळेस प्रभूश्री रामचंद्राची आपल्या हातून सेवा घडावी या उदात्त हेतूने आणि तीव्र इच्छेने श्रीमती शकुंतला रामकृष्ण नाशिककर यांनी आपले दोघी पुत्र




श्री अजय आणि अभय नाशिककर यांचेकडे जीर्णोद्धाराची कल्पना मांडली.मातृआज्ञा शिरसावंद्य मानून दोन्ही पुत्रांनी दोन वर्षात म्हणजे २००२ साली मंदिराचा काया पालट केला.सभामंडपात ग्रॅनाईट सह नवीन मारबल बसविण्यात आले.तसेच नव्याने विद्युतीकरण सुद्धा करण्यात आले. त्यानंतर २०२३ साली श्री कुणाल नाशिककर यांच्या प्रयत्नातून मंदिरातील एकूण एक लहान मोठ्या सर्व मूर्त्या,पाने,फुले, नक्षीकाम,पशू,पक्षी, खांबासहित इतर सर्व विविध आणि आकर्षक रंगांनी रंगवून घेतले.सोबत इतर सजावट सुद्धा करण्यात आली.

आरती.. रोज स.साडेसात आणि सायं.साडेसात वा.प्रभू श्रीरामचंद्राची आरती नियमित होत असते. पट्टाभिषिक्त श्रीराम मंदिर संस्थानात दरवर्षी गुढीपाडवा ते रामनवमी हे रामाचे नवरात्र

दरवर्षी साजरे केले जातात. तेव्हा भजन,कीर्तन,गायन सेवेद्वारे रामाचे गुणगान करण्यात येते.सर्व धुळेकरांच्या सहर्ष सहभागाने श्रीराम जन्मोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि तेवढ्या थाटामाटात साजरा केला जातो. मंदिरातील पुजारी म्हणून श्री मोरूअण्णा महाराज व त्यानंतर नंदू महाराज यांनी निस्वार्थ,निरलस सेवा दिली.

आरती बद्दल माहिती...

साधारण ७०-७२ वर्षांपूर्वी मोरोपंत उर्फ मोरेश्वर लक्ष्मणराव मुळे यांनी स्वतः खालील प्रमाणे प्रभू श्रीरामचंद्राची आरती लिहिलेली असून आजही सदरची आरती सकाळ संध्याकाळ म्हटली जाते.

श्रीराम मंदिर संस्थेचे विद्यमान मुख्य विश्वस्त असे..श्री अभय रामकृष्ण नाशिककर,श्री सुभाषजी काकरिया, श्री विजूनाना पाच्छापूरकर,श्री प्रशांतजी विसपुते आणि सौ.भाग्यश्री अभय कुलकर्णी.

संदर्भ.. सदर माहिती ही मंदिराचे मुख्य विश्वस्त श्री अभय नाशिककर यांनी दिलेल्या आणि श्री कुणाल नाशिककर यांनी कथन केलेल्या माहितीवर आधारित आहे.

**हसा ना गडे**

दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# फाईव स्टार हॉटेल मधली कॉफी

त्या दिवशी हिच्या कोणीतरी नातेवाइकामध्ये कोणाच तरी लग्न एका मोठ्ठ्या हॉटेल मध्ये होतं. ही नखशिखांत नटून तयार झाली होती. म्हणजे अगदी मनापासून सांगायचं तर छानच दिसतं होती. लग्न होतं एका फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये. अर्थात माझंही आयुष्यात एक स्वप्न होतंच की एकदा तरी हिला फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये घेऊन जायचंच. आणि आता अनेशा फुकटात चालून आलेली ही संधी उगाच कोण सोडणार .

पण जायच्या आधी ही अगोदरच ओरडली, असंच दळभद्र्यासारखं यायचं असेल तर माझ्या सोबत अजिबात यायचं नाही. माझ्या बाबांनी तुमच्यासाठी लग्नात शिवलेला तो महागाचा कोट कधी घालणार आहात. तुमचं काही नाही हो, पण माझी अब्रू जाते. आज तर सगळे नातेवाईक, माझ्या सगळ्या जुन्या मैत्रिणी येणार आहेत तेंव्हा निदान माझ्यासाठी तरी तो कोट घाला.

मग आम्ही तो ठेवणीतला कोट काढला, त्याला मॅचिंग पॅन्ट, बेल्ट, बूट घातला. आरशात बघून बघून माझं नटण चाललं होतं. पहिल्यांदाच असे कपडे घातल्या मुळे खूप अवघडल्या सारखं देखील होतं होतं. शेवटी आम्ही आम्ही त्या हॉटेल वर पोहचलो तेंव्हा दरवाजात उभ्या असलेल्या दरवानाने आम्हाला कमरे मध्ये नव्वद अंशात वाकून नमस्कार केला आणि वेलकम सर म्हणतं दरवाजा पण स्वतःच उघडला. पहिल्यांदाच आम्ही अशा मोठ्या हॉटेल मध्ये जातं होतो. त्या मुळे बरंच अवघडल्या सारखं वाटत होतं. नाहीतर इतरवेळी, पोऱ्या, तीन नंबर टेबलं. फडकं मार अशा आरोळ्या सुरु असलेल्या हॉटेल मधलं आमचं आजपर्यंतच जाण येणंजाण होतं . त्या मुळे हे फार सुखद वाटतं होतं. तिथले वेटर पण सगळे कोट टाय घालून रुबाबदार दिसत होते.मनातल्या मनात मी बायकोला तिच्या समय सूचकते बद्दल धन्यवाद दिले.



लग्नात हीच एक बर आहे हिला पटापट ओळखीचे लोकं भेटतात.आणि ती लगेच कुठेही मिसळून नाहीशी पण होऊन जाते. मला मात्र लवकर कोणी ओळखतच नाही आणि ओळखलं तरी माझ्या धांदरट पणा मुळे चार हात दूरच राहतात. त्या मुळे मी एकटाच राहतो. पण या वेळी मी सोशल व्हायचं ठरवलं होतं.

माझी बायको तिच्या मैत्रिणी आणि नातेवाईकांसोबत गप्पा मारत बसलेली होती. एका मैत्रिणीला कॉफी हवी होती. ती सारखी एका वेटरला खाणाखुणा करून बोलावत होती. दिसायला बरी होती तरी तिच्या कडे कोणी लक्षच देत नव्हतं हे फक्त माझ्याच लक्षात आलं.

काय हवयं तुम्हाला. मी आवाजात एकदम मायाळूपणा आणून विचारलं.

अहो काय सांगू. ती सांगू लागली. मी ना इथे वेळेवर पोहोचण्या साठी घरून लवकर निघाले.त्यामुळे ना नास्ता केला ना चहा कॉफी घेतली. आणि तिथं बघा ना दोन्ही कडे किती गर्दी आहे ती.

मी पाहिलं तर खरोखरच नाश्त्याच्या ठिकाणी आणि चहा कॉफीच्या ठिकाणी पण गर्दी होती.

लग्नाच्या त्या ब्रेक फास्ट रिसेप्शन च्या काउंटर वर, ईडली वडा सांबर ठेवलेले होते, तसेच खाली नळ असलेले दोन मोठे चहा कॉफीचे कंटेनर ठेवलेले होते.ज्यात चहा होता त्याच्या समोर चहाचा बोर्ड, ज्यात कॉफी होती त्याच्या समोर कॉफीचा बोर्ड होता. म्हणजे कोणाचीच अडचण व्हायला नको. आजकाल कसं सगळं शिस्तबद्ध आणि सोयीचे झालंय. लोकं रांगेत जाऊन आपल्याला हवं ते पेय घेऊन येत होते आणि टेबलवर ठेऊन गप्पा मारत होते.

मी पाहिलेलं आहे, की अशा प्रसंगी चहा पिणारे देखील कॉफी कडेच वळतात. कधीच कॉफीची चव पण ठाऊक नसलेले, कॉफी शिवाय आपल्याला काही चालतच नाही असं बिनदिक्कत सांगतात आणि भरभरून कॉफी पितात. काही तर चहाची पण चव बघून घेतात. बघू तर खरं कशी चव आहे ती. असं म्हणतं चवी साठी दोन्ही पिऊन बघतात.

त्या मैत्रिणीला ईडली वडा पाहिजे म्हणून मी रांगेत जाऊन उभा राहिलो. माझा नंबर येई पर्यंत तिथंल सगळं संपलं होतं. मी रागात आणि रुबाबात तिथल्या वेटरला हा काय प्रकार आहे रे बाबा असं विचारलं तर तो म्हणाला साहेब किचन मध्ये बघा ना तयार होतं असेलच. मी त्याने दाखवलेल्या किचन मध्ये गेलो तर तिथल्या लोकांनी माझ्या जवळ ईडली वडा भरलेली परातच दिली. मी ती काउंटर वर ठेवली आणि सांबार आणायला किचन मध्ये गेलो. सांबार आणे पर्यंत सगळ्या इडल्या वडे लोकांनी वाटून पण घेतले होते. मी सांबार आणल्यावर सगळ्यांनी एव्हढी धक्का बुक्की केली की माझ्या कोटावर आणि पॅन्टवर बरंच सांबार सांडलं. बाकीचे वऱ्हाडी मलाच वेटर समजून अजून ईडली वडे आणा म्हणून सांगत होते. मी आपला सोशल वर्क करण्या सारखी धावपळ करत होतो.

कशा बशा मी दोन प्लेट बनवून बायकोच्या मैत्रिणी पुढे नेऊन ठेवल्या त्या वेळी माझ्या कडे, माझ्या सांबराने भरलेल्या कपड्यांकडे ज्या नजरेने बायकोने पाहिलं होतं ती नजर फारच थंड होती.

नंतर मला बायको म्हणाली, मला जरा कॉफी आणून द्याल का, प्लीज. बायकोच्या प्लीज म्हणण्यात विनंती नव्हती हे मी ओळखल आणि लगेच कॉफी काउंटरकडे पळालो.

सुदैवाने तिथं जास्त गर्दी नव्हती. मी पटापट दोन कॉफीचे पेले भरले आणि बायको पुढे एक आणि तिच्या मैत्रिणी पुढे एक पेला ठेवला.

इतकी वर्ष संसार करता आहात तुम्ही, तुम्हाला चहा आणि कॉफी मधला फरक नाही कळत काहो. कॉफी समजून तुम्ही चहा आणलाय.

मला लक्षात आलं, कोणीतरी चुकून चहा असलेल्या कंटेनर जवळ कॉफीचा बोर्ड ठेवलेला होता.

अग ओरडू नको, आत्ता आणतो कॉफी. असं म्हणून मी हक्काने किचन मध्ये पळालो, अहो काउंटरवर कॉफी संपलीय. काही तरी करा ना.

तिथला मेन वेटर म्हणाला माफ करा साहेब, जरा घड्याळात बघा. आता चहा कॉफी नाश्त्याची वेळ संपलीय. पुढच्या जेवणाच्या तयारीला लागावं लागणार.

अचानक मला डोळ्यापुढे अंधारी आल्यासारखं वाटली. आता ती अंधारी मी स्वतःच कोणताच नाश्ता न केल्याची होती का चहा कॉफी संपल्याचं कोणत्या तोंडाने सांगावं याची होती तेच समजत नव्हतं.

# शब्दझुला

## सोनफुले

सोनफुले चमकती
देती चैत्राची चाहूल
भरे रसिक मनात
निसर्गाची चैत्रभूल
आला घेऊन वसंत
रूप रस रंग गंध
मिळे प्राशाया पाखरा
फुलातला मकरंद
सृजनाच्या उत्सवाने
आनंदली राने वने
चाफा गुलाब मोगरा
डुले मादक गंधाने
चैत्र पालवी झळाळे
लाल पोपटी रंगाने
बोलू लागे आमराई
कुहू कुहू च्या नादाने
बहाव्याचा डौल न्यारा
देई झोका त्यास वारा
गुलमोहराशी पैज
लावी केशरी पांगारा
प्रणयास राघु मैना
बुलबुल आतुरले
नव सर्जन रुपाचे
रानी डोहाळे लागले
सुरू हंगाम विणीचा
फुलातला गळे रस
लाल तांबडा पळस
भरे रानी नवा जोश
साद घालती पक्ष्यांना
नटुनिया रान फुले
वृक्ष वेलींवर पक्षी
घेती आनंदाचे झुले

**-राजेंद्र वाणी**
दहिसर मुंबई

## पायवाट !

निळे गगन मोहवी
दाटे क्षितिजा निळाई
करी किलबिल पक्षी
वसंताची हिरवाई ।।१।।
मोहरली पायवाट
गंध धुंद किरणाई
सडा फुलांचा विलसे
धरा लेई तरुणाई ।।२।।
रांग कुंपणाची शोभे
वाटे नयना भुलाई
वळणाची वाट नेते
स्वप्न हिंदोळा झुलाई ।। ३।।
स्वर्ग नटे वसुधेचा
सृष्टी दृष्टी नवलाई
दाता निसर्ग मनस्वी
जीवनास मोहनाई।। ४।।
अन्नदाता आनंदला
संभारली शिवराई
नव चैतन्य संचारे
बहरली वनराई ।। ५।।

**-सौ.शामला पंडित**
चिंचवड . पुणे

## विद्याधन

मिळे विद्या शिकून
खुप पुस्तकं वाचुन
वाढे दुसर्यास सांगून
ठेवा असावा लिहून.
करू सतत वाचन
नित्य ठेवावं चिंतन
वाचुन असावं मनन
मिळे त्यातून सद्गुण.
पद प्रतिष्ठा विधेतून
संत सद्विचार अंगी
जीवन सुखी प्रसंगी
नीतिमत्ता शिक्षण सांगी.
कष्ट सेवा भाव
विद्या जीवन प्रभाव
अंधश्रद्धा काम क्रोध
विद्या जिथे अभाव.
ज्ञान धन सरस्वती
साधे त्यातुन प्रगती
जीव जीवन संमती
उच्च निर्माण नाती.

**-प्रदीप पाटील**
गणपूर ता.चोपडा,
९९२२२३९०५५




# एक रुपयात पीक विमा योजना बंद करु नये कुणाल पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**धुळे, दि.५- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी एक रुपयात पीक विमा योजना येत्या खरीप हंगापासून बंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आल्याचे समजले असून येत्या खरीपापासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश कृषी आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे शेतकरी प्रचंड चिंतेत सापडला आहे. म्हणून एक रुपयात पीक विमा योजना बंद न करता पीकविमा योजनेची पुनर्रचना करतांना शेतकरी हिताचा निर्णय घ्यावा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.**

एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे समजताच महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने धाव घेत थेट मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री ना.माणिकराव कोकाटे यांना आपले पत्र दिले आहे.



श्री कुणाल बाबा पाटील यांनी पत्रा व्दारे मागणी केली आहे कि, येत्या खरीप हंगामापासून एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत घेण्यात आल्याचे समजले. त्यानुसार अंमलबजावणी करण्याचे निर्देश दि.२६ मार्च २०२५ रोजी एक पत्राव्दारे कृषी विभागाच्या आयुक्तांना शासनाने दिले आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकरी एक रुपयात पीकविमा काढू शकणार नाही. परिणामी यापूर्वी ज्या पध्दतीने विमा हप्ता भरावा लागत होता त्याच पध्दतीने शेतकऱ्यांना पीक विमा काढण्यासाठी विमा हप्ता भरावा लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक भूर्दंड बसणार आहे. परिणामी शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तसेच प्रधामंत्री पिकविमा योजनेत केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारीत भरपाई मिळत होती. मात्र महायुती सरकारने पिक विमा योजनेंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान, प्रतिकूल हवामानामुळे पेरणी न होणे या बाबींचा अंतर्भाव करुन शेतकऱ्यांना अतिरिक्त संरक्षण मिळवून दिले होते. यापुढील काळात ह्या संरक्षण बाबी काढण्याच्या हालचाली सरकारतर्फे सुरु झाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत खरीप २०२५ हंगामपासून फक्त पीक कापणी प्रयोग आधारीत विमा योजना राबवावी,यात भरपाई निश्चित करतांना सोयाबीन,भात कापूस, गहू या पिकांसाठी ५० टक्के तंत्रज्ञान आधारीत उत्पादन आणि ५० टक्के उत्पादन पीक कापणी प्रयोगावर आधारीत गृहीत धरावे, असे निर्देश या बैठकीत देण्यात आल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मागीण आठ वर्षात विमा कंपन्यांना ४३ हजार २०१ काटी रुपये हप्त्यापोटी दिले आहेत. तुलनेने कंपन्यांनी ३२ हजार ६५८ कोटी रुपयेच भरपाई दिली. त्यांना १० हजार ५४३ कोटी रुपये नफा झाला आहे. तरी शासनाने एक रुपयात पीक विमा योजना बंद करु नये. पीक विमा योजनेची पुनर्रचना करतांना दोष, त्रुटी असतील ते दूर करावा, पीक विमा नुकसान भरपाई निश्चित करण्याच्या पध्दतीतही बदल करु नयेत. अशी मागणी पाटील यांनी मुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांकडे केली आहे.



# निमझरी येथील पटेल आश्रमशाळेचा विद्यार्थी सागर पावरा याचा बहुपयोगी व्हीलचेअरचे सादरीकरणाबद्दल गौरव

**शिरपूर, दि.५- तालुक्यातील निमझरी येथील आर.सी. पटेल अनुदानित प्राथमिक आश्रमशाळेचा विद्यार्थी सागर पिंट्या पावरा यास बहुपयोगी व्हीलचेअर चे नाविन्यपूर्ण सादरीकरण बद्दल १० हजार रु. चा धनादेश देऊन गौरव करण्यात आला.**

एस.व्ही.के.एम., एन.एम. आय.एम.एस. सावळदे ता. शिरपूर येथे झालेल्या इनोव्हेन्ट आयडीयाथॉन कॉम्पेटीशनमध्ये बहुपयोगी व्हीलचेअर चे नाविन्यपूर्ण, कल्पकतेने सादरीकरणकेल्या बद्दल शाळेतील इयत्ता ७ वी चा विद्यार्थी सागर पिंट्या पावरा यास एन.एम.आय.एम.एस. सोबस सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इनोवेशन अँड एंट्रेप्रिन्युरशिप या फोरमतर्फे रुपये हजार चा धनादेश देऊन प्रोत्साहित करण्यात आले. सदर फोरमचा प्रमुख उद्देश गरजू व नवोपक्रम तसेच उद्योजकतेला प्रोत्साहित करणे, स्टार्ट अप कल्पनांना तज्ञांच्या कडून सहकार्य, आर्थिक मदत करणे असा आहे.या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेशा पटेल, सीईओ डॉ.उमेश शर्मा यांनी सागर पावरा याचे कौतुक केले.यावेळी फोरमचे संस्थापक दिग्विजय चौधरी, संस्था सचिव सौ. रेशा पटेल, मेनन बासू, सारा पटेल, इन्चार्ज चेतन पाटील, अकॅडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील आदी प्रमुख मान्यवर तसेच शाळेचे मुख्याध्यापक पी. एन. लोहार, शिक्षक टी. एम. माळी उपस्थित होते. सागर पावरा याला विज्ञान शिक्षक एस. ए. गोपाळ यांचे मार्गदर्शन लाभले.



# सोनगीरला ईद मिलन कार्यक्रम मुस्लिम बांधवांचा अनोखा उपक्रम

**सोनगीर दि.५ (प्रतिनिधी)- येथे रमजान ईद निमित्त ईद मिलनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुस्लिम बांधवांनी हिंदू बांधवांना खीर खुरमा भरवुन ईदच्या शुभेच्छा दिल्या.**

येथील गुजर गल्लीतील जामा मशिदीत मुस्लिम बांधवांतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सर्वांनी एकमेकाबद्दल आदर राखून कुणाच्याही धार्मिक भावनांना ठेच पोहोचणार नाही असे वागावे. तरुणांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सकारात्मक गोष्टींचा प्रचार करावा. देश विघातक कृत्यांपासून लांब राहावे. आपल्या गावात व परिसरात शांतता राहिल्यास त्याचा थेट संबंध आपल्या आर्थिक प्रगतीशी येतो. यामुळे कोणत्याही कट्टर विचारांना थारा न देता स्वतःची व गावाची आर्थिक प्रगती होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. असे ते म्हणाले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य अविनाश महाजन, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र महाजन, युसुफ खा पठाण, हसन खा पठाण, आरिफ खा पठाण, शफयुद्दीन पठाण, मुन्ना पठाण, नाजिम शेख, प्रकाश गुजर, श्याम गुजर, गोरख पाटील, एम.टी. गुजर, सामाजिक कार्यकर्ते दिलीप माळी, प्रमोद धनगर, रोशन जैन, सुहानंद गुजर, प्रकाश परदेशी, परशुराम पाटील, हरिश्चंद्र पाटील, अहमदशाह बुरहान शहा, मौलाना रियाजुद्दीन, मजीद शहा, साबीर शहा, शरीफ शहा, जमील शहा, रुबाब शाह, भिकन शाह, रफिक शाह, हुसेन शाह, वसीम शाह, आयुब पेंटर आदी उपस्थित होते.

# म्हसदीत धनदाई देवीच्या यात्रोत्सवाला प्रारंभ

**साक्री, दि.५ (प्रतिनिधी)- तालुक्यातील म्हसदी येथील कुलस्वामिनी कुलदैवत धनदाई देवीच्या यात्रोत्सवाला शनिवार (दि.५) पासून प्रारंभ झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर साक्री, धुळे, दोंडाईचा, शिंदखेडा, नवापूर व मालेगाव या आगारातूनप्रवाशांच्यासोयीसाठी यात्रा स्पेशल बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे यात्रेत येणाऱ्या भाविकांनी राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनांचा लाभ घ्यावा असे आवाहन धुळे जिल्ह्याचे विभाग नियंत्रक विजय गीते यांनी केले आहे.**

देवीची यात्रा चैत्र शुद्ध अष्टमी अर्थात शनिवार पासून सुरू होत आहे. तरी देखील शुक्रवारपासून दुपारनंतर यात्रा स्पेशल बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. या बसेस सात एप्रिल सोमवार पर्यंत अखंड सेवेत राहणार आहे. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून साक्री आगार प्रमुख महाले यात्रा प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत. तर त्यांच्या मदतीसाठी साक्री आगाराचे वाहतूक निरीक्षक, दोन वाहतूक नियंत्रक तसेच धुळे कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक सागर घडमोडे हे कामकाज पाहणार आहेत. गेल्या वर्षी ४ हजार ७६६ किलोमीटरचा प्रवास झाला होता. त्यामुळे दोन लाख ७४ हजार उत्पन्न महामंडळाला प्राप्त झाले होते. यासाठी बारा वाहनांचा वापर करून पाच हजाराहून अधिक प्रवाशांची वाहतूक राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून करण्यात आली होती. यावेळी धुळे राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक विजय गीते यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय वाहतूक अधिकारी सौरभ देवरे यांच्या आदेशान्वये साक्री आगाराचे व्यवस्थापक सुनील महाले कामकाज पाहणार आहेत.

# गीत रघुनंदनचे पुनः प्रसारण

धुळे, दि.५- श्रीराम नवमीचे औचित्य साधुन धुळ्यातील गीतकार प्र.अ.पुराणिक लिखित गीत रघुनंदनचे रामनवमी निमित्त दि.६ एप्रिल पासून हनुमान जयंती पर्यंत दि.१२ एप्रिल पर्यंत दररोज सकाळी ११.३० ते १२ वाजेपर्यंत पुन:प्रसारण आकाशवाणी जळगाव केंद्रातर्फे करण्यात येणार आहे. रसिक श्रोत्यांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. गीत रघुनंदन ही एकवीस गीतांची मालिका युट्युबवर ऐकायला मिळणार आहे. संगीतकार संजय हांडे, स्वरसाज प्रसाद दुसाने व यशोधरा गोसावी यांनी चढवला असून निवेदन आकाशवाणी जळगाव केंद्राचे सतिश पप्पु व निवेदिका स्मिता दीक्षित यांचे आहे.

## SEVA NURSING INSTITUTE, DHULE

**WANTED**

The applications are invited from eligible and interested candidates for filling the vacancy of teaching staff. The essential qualification & experience is as per MUHS academic notification. The candidates must apply with complete CV, Photo & Photocopies of necessary documents to the President, Seva Nursing Institute, Dhule.

| Designation | Total Post | Clinical Speciality | Category |
|---|---|---|---|
| Professor cum Principal | 01 | Any | Open |
| Professor | 01 | Any | Open |
| Assistant Professor / Lecturer | 01 | Obstetric & Gynecological Nursing | Open |

**Address**:
Seva Nursing Institute, Seva Superspeciality &Critical Care Centre, Mission Compound, Sakri Road, Dhule
E-mail ID: sevanursing2018@gmail.com
Contact No.: (02562) 246333 / 247555

The Last Date of application is 10.04.2025 Till 5.00 PM

**Sd/-**
**President**

## आपला महाराष्ट्र
### वाचकांना विनम्र सुचना

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

# युवकाला मारहाण करत दोन लाखांची लूट

**धुळे, दि.५- शहराजवळील अन्वर नाला येथे फायनान्स कंपनीची वसुली करून घराकडे येणाऱ्या युवकाला अंधाराचा फायदा घेवून चार जणांनी अडवले. मारहाण करत त्याच्याजवळील बॅग व मोटर सायकलची चावी हिसकावून एकुण दोन लाखांचा मुद्देमाल बळजबरी घेवून पळून गेले.**

आकाश छोटू कोळी (वय २४) हा युवक चाळीसगाव चौफुलीवरील भारत फायनान्स प्रा.लि. या बचतगट कंपनीचे काम करत आहे. बचतगटांचे पैसे जमा करून अन्वर नाल्याकडून दुचाकी क्र. एमएच ३९/एएफ-०६७१ घेवून येत असतांना तोंडाला रूमाल बांधलेल्या एकाने काठीने मारून रस्त्यात अडवले. तरूण रस्त्यावर थांबताच आणखी तीन जण तोंडाला रूमाल बांधून आले. चौघांनी शिवीगाळ करत मारहाण केली. बळजबरीने बॅग हिसकावून घेतली तसेच मोटर सायकलची चावी घेवून अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. जबर मारहाण केल्याने जखमी अवस्थेत आकाश कोळी याने पहाटे तीन वाजेच्या सुमारास मोहाडी पोलीस स्टेशनला चौघांविरोधात गुन्हा दाखल केला.

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**MOHAMMAD MUSTUFA SABIR ANSARI**
MY NEW NAME IS
**ANSARI MOHAMMAD MUSTUFA MOHAMMAD SABIR**
AS PER MY DOCUMENTS
ADD- 3158, LANE NO.01, BEHIND KABREY HOSPITAL, KHATKI VADA AKBAR CHAUK, DHULE, MAHARASHTRA-424001

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ३३४ पैकी प्लॉट नं. ८६ चे एकूण क्षेत्र २७९ चौ. मी. यांस वि. सि. स. नं. १८२६८/८६ चे क्षेत्र २७९ चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र १३९.५० चौ. मी. यांसी चतुसिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ७५, दक्षिणेस : याच प्लॉट नं. ८६ पैकी उर्वरित भाग, उत्तरेस : प्लॉट नं. ८७. येणे प्रमाणे वर्णनाची बांधीव मिळकत व उर्वरित जागेसह मिळकत **श्री. किशोर बंकट ठाकरे**, रा. सातरणे ता. जि. धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **१) श्री. योगेश धर्मराज जाधव २) सौ. गितांजली योगेश जाधव** दोघे रा. तांबोळे ता. जि. जळगांव यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, रक्कम देणे/घेणे, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक : ०५/०४/२०२५

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी –भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी,
धुळे **मो. नं. ९८२२८५२६५०.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८९ पैकी प्लॉट नं. ८२ चे क्षेत्र ५९४.५७ चौ. मी. ६४०० चौ. फुट यांस वि. सि. स. नं. ३४०६ चे क्षेत्र ५८६.५ चौ. मी. सत्ता प्रकार क यांसी चतुसिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ८१, दक्षिणेस : प्लॉट नं. ९१, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **१) श्री. विजय प्रल्हाद पाटील**, रा. १२७ शिव प्रताप कॉलनी देवपूर धुळे **२) श्री. शैलेंद्र भास्करराव साळुंके** रा. १३४, सुदर्शन कॉलनी, देवपूर धुळे यांचे सामाईक मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, रक्कम देणे/घेणे, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल. व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक : ०५/०४/२०२५

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी –भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी,
धुळे **मो. नं. ९८२२८५२६५०.**

## जाहीर नोटीस

नि. नं. ॲड. एन. एम. जैन नि. ६

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४९४/२०२५

**१) जागृती बाबुराव सोळुंखे**, वय : ३३, धंदा : सिव्हील इंजिनियर,
**२) रोहित बाबुराव सोळुंखे**, वय : ३१, धंदा : सिव्हील इंजिनियर.
दोन्ही रा. १६,महिंदळे शिवार राजेंद्र नगर,साक्री रोड धुळे ता. जि. धुळे ...**अर्जदार**

**।। विरुद्ध।।**

कोणीही नाही .... **जाबदेणार**
कै. बाबुराव बंडू सोळुंखे, ता. १५/०२/२०२५ .... मयत

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कोर्ट नं. २ सो. धुळे यांचे कडे दि. १/४/२०२५ रोजी, अर्जदारांनी कि. दि. अर्ज नं. ४९४/२०२५ चा अर्ज दाखल करुन, त्यात अर्जदार शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. ९/५/२०२५ ही निश्चित केली आहे, त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कोर्ट नं.... सो. धुळे यांचे न्यायालयांत उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टात दिलेल्या व निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. ठिकाण : धुळे दि. ५/४/२०२५

सही:... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे — दिवाणी न्यायाधिश व. स्तर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय, संस्था, संबंधितास, मिळकतीचे मुळ मालक, तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडेस या मिळकतीबाबत हक्क दाखविणाऱ्या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकार– यांनी उताऱ्यावरील मालक श्रीमती रेहनाबाई तफजुलभाई बोहरी, श्री.मुस्तफा तफजुल बोहरी, श्री.इस्हाक तफजुलभाई बोहरी सर्व रा.ह.मु.– रनाळा ता.जि.नंदुरबार. यांचे सोबत मौजे शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार शिवारातील शहादा नगर पालिका हद्दीतील बखळ प्लॉट मिळकत सि.स.नं.२९५६/ब हिस्सा नं.४ चे एकूण क्षेत्र– २१७.२० यापैकी आमच्या हिस्साचे क्षेत्र– १३१.३० चौ.मी. (१४१२ चौ.फुट) पैसे यास चतु:सिमा– गाव नकाशा प्रमाणे येणे प्रमाणे मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा अगर करार केलेला असून, आमचे पक्षकारांनी लिहून देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणून देखील दिलेली असून, सौदा करून घेतलेला आहे. आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर नोटीस ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आहे. तरी सदर व्यवहाराबाबत मिळकतीचे कुठल्याही हितचिंतकाची, सौदा करार, मदार, खरेदी, खावटी, इतर वारस, ज.मु.मृत्यूपत्र वगैरे करणार यांची अगर कोणाचाही कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार करणारे बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, यांची अगर कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत, दावा, फाटा, वहिवाट, इतर अधिकार असल्यास, तसेच इतर कुणाचे मालकी हक्क असल्यास, खरेदीखताचे ओरिजनल दस्त असल्यास, बेकायदेशीर व्यवहार होत आहे, किंवा उताऱ्यावरील मालकांचे हक्काबाबत अगर मिळकत दुबार खरेदीखत होत आहे. वगैरे आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमचे पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात हरकत कळवावी, परस्पर वर्तमानपत्रात हरकत घेवू नये. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ह्या आमचे पक्षकारांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत कोणाचीही लेखी तक्रार योग्य त्या कागदपत्रासह प्राप्त न झाल्यास मिळकत निर्बोझ समजून, आमचे पक्षकार हे व्यवहार पूर्ण करतील. परस्पर वर्तमान पत्रात दिलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाही. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्या वतीने आमचे मार्फत प्रसिध्दीस देण्यात येत आहे. **दोंडाईचा, दि.०४/०४/२०२५**

**ॲड.सचिन अशोक चौधरी**
दोंडाईचा कोर्ट आवार, जि.धुळे. **मो.नं.९४२२६१९६०१**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील म.तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२५

पिंट्या केरला पावरा,
रा.सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.निबंधक सो.
जन्म, मृत्यू, विवाह नोंद
ग्रामपंचायत, सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

अर्जदार नामे–पिंट्या केरला पावरा यांचा स्वत:चा जन्म दि.०१/०१/१९८३ रोजी मौजे– सुळे ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा जन्म दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आपण स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी वा वकीलांमार्फत म.तहसिलदार सो. शिरपूर, जि.धुळे यांचे कोर्टात हजर राहून आपली हरकत/आक्षेप नोंदवावी, अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि.४/४/२०२५ अर्जदारतर्फे ॲड.

**ॲड.मनोहर व्ही.गवळे**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील म.तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२५

गाठ्या कहाऱ्या पावरा,
रा.सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.निबंधक सो.
जन्म, मृत्यू, विवाह नोंद
ग्रामपंचायत, सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

अर्जदार नामे– कैलास कहाऱ्या पावरा यांचा स्वत:चा जन्म दि.०१/०१/१९८७ रोजी मौजे– सुळे ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा जन्म दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आपण स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी वा वकीलांमार्फत म.तहसिलदार सो. शिरपूर, जि.धुळे यांचे कोर्टात हजर राहून आपली हरकत/आक्षेप नोंदवावी, अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि.४/४/२०२५ अर्जदारतर्फे ॲड.

**ॲड.मनोहर व्ही.गवळे**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं.४११/२०२५, नि.६

श्रीमती.वत्सलाबाई भिमराव पवार वगैरे ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**
भिमराव गिरधर पवार मयत ..... **मयत**

भिमराव गिरधर पवार (मयत दिनांक– ३०/११/२०२४) मयताचा पत्ता– रा.वाघाडी ता.शिरपूर, जि.धुळे.

ज्याअर्थी अर्जदार १) श्रीमती वत्सलाबाई भिमराव पवार २) श्री.भूषण भिमराव पवार ३) भारती संदीप शिरसाठ ४) श्रीमती सावित्रीबाई गिरधर पवार अ.नं.१ चे पती व अ.नं.२ व ३ यांचे वडील व अ.नं.४ यांचा मुलगा नामे भिमराव गिरधर पवार हे दिनांक– ३०/११/२०२४ रोजी अल्पशाआजाराने राहते गावी मौजे वाघाडी येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर शिरपूर यांचे न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दिनांक– ८/५/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिंधीमार्फत हजर रहावे. अन्यथा अर्जदाराचा लेखी पुरावा घेवून त्या आधारे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. में.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर, शिरपूर जिल्हा.धुळे. यांचे आदेशावरून सही शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

सही/- सही/-
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर शिरपूर** — **दिवाणी न्यायालय क.स्तर शिरपूर**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु.डी.) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.४१२/२०२५, नि.६

१) नयनकोर सुरतसिंग राऊळ,
२) योगेश सुरतसिंग राऊळ,
३) गोपाल सुरतसिंग राऊळ,
४) नटवरसिंग सुरतसिंग राऊळ,
सर्व रा.वनावल, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत सुरतसिंग केसरसिंग राऊळ हे दि.०२/११/२०२३ रोजी मौजे– वनावल, ता.शिरपूर, जि.धुळे येथे अर्जदारांकडे मयत झाले असून, अर्जदार नंबर १ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याने व अर्जदार यांना व शासकीय व निमशासकीय कामासाठी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.१०/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि.२/४/२०२५

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे** — **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील म.तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

जन्म नोंद अर्ज नं. /२०२५

रमेश रामसिंग पावरा, उ.व.५०, धंदा–मजूरी,
रा.सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

**विरूध्द**

म.निबंधक सो.
जन्म, मृत्यू, विवाह नोंद
ग्रामपंचायत, सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **जाबदेणार**

अर्जदार नामे– रमेश रामसिंग पावरा यांचा स्वत:चा जन्म दि.०१/०१/१९७६ रोजी मौजे– सुळे ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा जन्म दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२)(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आपण स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी वा वकीलांमार्फत म.तहसिलदार सो. शिरपूर, जि.धुळे यांचे कोर्टात हजर राहून आपली हरकत/आक्षेप नोंदवावी, अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि.४/४/२०२५ अर्जदारतर्फे ॲड.

**ॲड.मनोहर व्ही.गवळे**

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्ही. जज्ज सो. ज्यु.डी. यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.४२२/२०२५, नि.६/ड

१) हिराबाई एकनाथ देशमुख, रा.भाटपुरा, ता.शिरपूर, जि.धुळे,
२) सरू उर्फ सरूबाई गजन्नाथ भामरे,
रा.मकान नं.२०, वार्ड नं.२, मोयदा,
बडवानी, (मध्यप्रदेश) ..... **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै.रेशमाबाई आनंदा सोनवणे (माळी) ह्या मौजे–भाटपुरा, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.०९/०५/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.३/४/२०२५

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे** — **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

## पान १ वरुन

### कृषिमंत्री पुन्हा वादात

यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याची भावना समाजमाध्यमातून व्यक्त केली जात आहे.

**कोकाटेंना शेतकऱ्यांचे आव्हान**

कृषिमंत्री कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या अनुदानासंदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर शेतकरी संतप्त झालेत. कोकाटे हे देखील शेतकरी कुटुंबातील असून अनुदानाच्या पैशातून आम्ही लग्न करतो की कर्ज घेऊन हे कोकाटे यांनी एकदा येऊन पहावे असे आव्हान शेतकऱ्यांनी कोकाटेंना केले आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंचे शेतकऱ्यांबाबत हे पहिलेच वादग्रस्त वक्तव्य नाही. याआधीही कृषीमंत्री कोकाटेंनी शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त विधान केले होते. हल्ली भिकारीही १ रुपया घेत नाही असे वक्तव्य माणिकराव कोकाटेंनी केले होते. आता पुन्हा एकदा कोकाटे बरळल्याने शेतकऱ्यांमधून संतापाची भावना व्यक्त होते आहे. दरम्यान कोटाकेंच्या या वक्तव्यांनंतर राजकीय प्रतिक्रीया उमटू लागल्या आहेत. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सरकार शेतकऱ्यांचा सन्मान करणारे असल्याची प्रतिक्रिया दिली तर सरकारला शेतकऱ्यांशी देणेघेणे नाही असे म्हणत विजय वडेट्टीवारांनी सरकारवर टीका केली. कोकाटे हे कृषी क्षेत्रातील कुणाल कामरा असल्याचा टोला राऊतांनी लगावला आहे.

**कोकाटेंनी राजीनामा द्यावा : सपकाळ**

बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी भाजपा युती सरकार सोडत नाही. राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंना सत्तेचा एवढा माज चढला आहे की, ते सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. शेतकऱ्यांना भिकारी म्हटल्यानंतर आता या महाशयांनी कर्जमाफीचे काय करता, लग्न, साखरपुडे करता, शेतीत गुंतवता का, असा अजब प्रश्न विचारून पुन्हा एकदा अपमान केला आहे. शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या कोकोटेंना मंत्रिमंडळातून हाकलून द्या, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ पुढे म्हणाले की, सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते ते अद्याप पाळलेले नाही, कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते, त्यात कर्जमाफीवरून कृषी मंत्र्यांचा शेतकऱ्यांना प्रश्न म्हणजे चोर तो चोर आणि वरून शिरजोर असा प्रकार आहे. शेतकऱ्याला सरकार मदत करते किंवा कर्जमाफी करते म्हणजे काही उपकार करत नाही. तो जनतेचा पैसा आहे, कोकाटेच्या घरचा नाही. सरकारची धोरणे जर शेती व शेतकऱ्याला अनुकुल असती तर शेतकरी सरकारच्या मदतीवर कशाला अवलंबून राहिल. पण भाजपा युती सरकार हे शेतकरीविरोधी आहे. कृषी मंत्री कोकाटे यांनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. मूठभर उद्योगपतींना १६ लाख कोटींचे कर्जमाफ केले तेव्हा असा प्रश्न विचारण्याची धमक कोकाटे किंवा सरकारने दाखवली नाही, मग शेतकऱ्यांनाच प्रश्न विचारण्याची हिंमत का होते. सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करण्याचा रोग या महोदयांना जडला आहे. त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी.

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचे नाशिकमध्ये जय श्रीराम

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे मात्र अयोध्येत न जाता काळाराम मंदिरात आले होते. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मनसेच्या वर्धापनदिनानिमित्ताने सहकुटुंब काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेतले होते. नाशिक दौ-यावर आलेले महायुतीचे असोत की महाविकास आघाडीचे नेते ते श्री काळाराम मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेल्याशिवाय रहात नाहीत. आता काँग्रेसचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ देखील रामनवमीचा मुहूर्त साधत काळारामाचे दर्शन घेणार आहेत. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव होणार असून सपकाळ यावेळी उपस्थित राहतील. त्यानंतर त्यांची पत्रकार परिषद देखील होणार आहे. काळाराम मंदिर कायमच राजकीय नेत्यांच्या भेटीमुळे चर्चेत राहत असते.

### विभागीय आदर्श क्रीडा शिक्षक

(बी.यू.एन. रायसोनी विद्यालय, जळगाव), प्रविण पाटील (खुबचंद सागरमल विद्यालय, जळगाव), नंदुरबार-मुख्याध्यापक सुषमा शाह (श्रीमती ही.गो. श्रॉफ हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, नंदुरबार), नूतनवर्षा वळवी (एस.ए. मिशन हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, नंदुरबार), क्रीडा शिक्षक युवराज पाटील (कुबेर माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, म्हसावद), जगदीश बच्छाव (श्रीमती डी.आर. हायस्कूल, नंदुरबार) यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

विभागीय पुरस्कार निवड समितीत प्रशांत कोल्हे (विभागीय अध्यक्ष, जळगाव), डॉ.आनंद पवार (विभागीय सचिव, धुळे), संजय पाटील (नाशिक), सुनिल सूर्यवंशी (नंदुरबार) यांचा समावेश आहे. हा पुरस्कार सोहळा विभागातील गुणवंत क्रीडा शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या अथक परिश्रमांना दिलेली आदरांजली आहे. या सोहळ्यात सर्व मान्यवर, क्रीडा शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तळोद्यात दोन गटात हाणामारी

पाडवी करीत आहेत. दरम्यान दुसऱ्या गटातील महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे की, गाडीवर दगड मारतो या कारणावरुन वाद झाल्याने सात जणांनी तलवार, लोखंडी रॉड, लाकडी काठी व हाताबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत आकाश कृष्णदास राठोड, शुभम कृष्णदास राठोड व अन्य तीन असे एकुण ५जण जखमी झाले आहेत. महिलेच्या गळ्यातील सोनपोत तुटून नुकसान केले.

### मोहाडी रोड परिसरात दिवसा दागिने लंपास

रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने भर दुपारी तीन ते साडे तीन दरम्यान चोरून नेले. घटनेची खबर कळताच उपविभागीय पोलीस अधीकारी राजकुमार उपासे यांच्यासह पोलीस निरिक्षक घुसर, पोउनि. लेंडे, हेकॉ. अविनाश वाघ, पोकॉ.विनोद पाठक, आत्माराम चव्हाण यांनी भेट दिली. तसेच या गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले. श्वानाने केवळ अपार्टमेंटमध्ये वर जाण्याचाच मार्ग दाखवला बाहेर गेलाच नसल्याने पोलीसांसमोर या गुन्ह्याच्या तपासाठी कसब लागणार आहे.

### केंद्राकडून १५ कोटी रुपये मंजूर

साठी केन्द्र कडून निधी प्राप्तीसाठी पाठपुरावा सुरु आहे. त्यासाठी सुद्धा लवकर अपेक्षित निधी प्राप्त होणार आहे. मंजूर कामांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा काढून काम जलद गतीने करण्यात येणार आहे अशी माहिती आ.भदाणे यांनी दिली आहे.

### उत्सव काळात सलोखा कायम ठेवा

ईसाणी, छोटु शिंपी, सोमवेल वसावे, अहमंद मेमण, अनिल शर्मा, वेजनाथ वळवी, कैलास वाडीले, विरेंद्र ईशी, आर्यन पाडवी, अजय नाईक, संकेत अहिरे, राजु नाईक, लालु चौधरी, बंटी भोई, सुनिल भामरे, पुरुषोत्तम अहिरराव आदी उपस्थित होते. यावेळी संजय महाजन यांनी सांगिते की, आगामी सण उत्सव सर्वांनी शांततेत साजरा करावा. कोणत्याही मदतीसाठी ११२ वर टोलफ्री क्रमांकाचा उपयोग करावा. कायदा व सुव्यवस्था राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.बी. वाघ यांनी केले. आभार नरेंद्र साबळे यांनी मानले.

### एल.सी.बी.ने मुसक्या आवळल्या

विरोधात दोन तर फैजान अन्सारी विरोधात एकदा याआधीही चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनला दाखल आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत ढिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. श्रीराम पवार, पोसई.बाळासाहेब सुर्यवंशी, पोहेकॉ. प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, पंकज खैरमोडे, पोकॉ.महेंद्र सपकाळ, हर्षल चौधरी यांनी केली.

## जयनगर ग्रामपंचायतच्यावतीने मुलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण; ग्रामस्थांकडून उपक्रमाचे स्वागत

**जयनगर, दि.५ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील जयनगर येथे नुकतेच बारावीचे विद्यार्थ्यांची परीक्षा संपल्याने गावातील तसेच परिसरातील ज्या विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान व संगणक विषयी बेसिक माहिती प्राप्त करावयाची आहे अशा विद्यार्थ्यांसाठी जयनगर ग्रामपंचायतने मोफत संगणक कोर्स चालू केलेला आहे.**

सध्या ग्रामपंचायत जयनगरच्या वतीने वेगवेगळे व नाविन्यपूर्ण असे उपक्रम राबवले जात आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासोबतच महिला सक्षमीकरण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर संतोष माळी यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत कार्यालय येथे संगणक प्रशिक्षण बारावीच्या मुलांना देण्यात येत आहे. जेणेकरून बारावीच्या पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आपले करियर निवडायचे असते. त्याच्यासाठी संगणक प्रशिक्षण हे खूप महत्त्वाचे असते. म्हणून ईश्वर माळी यांनी गरजू विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. महाजन कॉम्प्युटर वडाळी यांचे संचालक सुरेश अहिरे यांच्या सहकार्यातून ग्रामपंचायत कार्यालयात विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण दिले जात आहे. याचा शुभारंभ गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर माळी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी श्री माळी यांनी सांगितले की, जिल्ह्यात जयनगर ग्रामपंचायत विकासात्मक कामे करतच आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकास व्हावा म्हणून ग्रामपंचायत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष प्राधान्य देऊन त्यांना घडवण्यासाठी प्रयतक करीत आहे. कारण आजचे विद्यार्थी हे पुढील भविष्य आहेत. म्हणून त्यांना आपण पाठबळ दिले तर त्यांचाही उत्साह वाढेल असे सांगितले. यावेळी सरपंच मोगराज सोनवणे, उपसरपंच ईश्वर माळी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक अनिल ठाकरे, महाजन कॉम्प्युटरचे संचालक सुरेश अहिरे तसेच विद्यार्थी मित्र उपस्थित होते.

## साखरपुड्याची सुरुवात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमा पूजनाने


**कोठली, दि.५ (प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील कोठली येथील रहिवासी व पुणे येथे वास्तव्यास असलेले बादलसिंगगिरासेयांचाससदे(ता. शहादा) येथील संदीप पदमसिंग गिरासे यांच्या भगीनिशी नुकताच साखरपुडा पार पडला.**



यानिमित्त प्रथमच साखरपुडाच्या सुरवातीला त्यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दर्शन घेत मंडपात प्रवेश केला. या नवीन पद्धतीमुळे उपस्थित सर्वांनाच आनंद झाला. आपल्या समाजाचे आराध्य दैवत, प्रेरणास्थान महाराणा प्रतापसिंह यांच्या स्मृतींची प्रेरणा घेऊन कोणत्याही शुभ कार्यास सुरवात करावी याबद्दल समाजबांधवामध्ये विचारविनिमय सुरू आहे. कोठली येथील ग्रामस्थ व सार्वजनिक वाचनालयाचे नवनिर्वाचित अध्यक्ष असलेले बादलसिंग नारायणसिंग गिरासे हे पुणे येथील ब्रिजस्टोन इंडिया लि.कंपनीत नोकरीस आहेत. शिवाय राज्यात युवा चळवळीत कार्य करणाऱ्या युवकमित्र परिवार संस्थेचे सुद्धा संचालक आहेत. तसेच रिस्पेक्ट रिलिटी फाऊंडेशनचे ते सचिव आहेत. सामाजिक कार्यात मोठा वाटा असल्याने व महाराणा प्रतापसिंह हे प्रेरणास्थान असल्याने त्यांनी वधूकडील पक्षास कार्यक्रमस्थळी महाराणा प्रतापसिंह यांची मूर्ती स्थापन करणेस सांगितले होते. त्यानुसार कार्यक्रमात प्रवेश करतांना त्यांनी प्रथम महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन करून मंडपात प्रवेश केला. या नवीन पद्धतीमुळे बादलसिंग यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## हस्ती बँक संस्थापक स्व.हस्तीमलजी जैन जयंती साजरी

**दोंडाईचा, दि.५- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरूकुल दाउळ शिवार कँपस दोंडाईचा येथे शनिवारी हस्ती बँकेचे संस्थापक स्वर्गीय हस्तीमलजी भोमराजजी जैन यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात स्वर्गीय दादाजी हस्तीमलजी जैन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.**



यावेळी प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, प्राचार्य जिवन सपकाळे, मुख्याध्यापक श्री. सदाशिव महाजन, उपप्राचार्या रजिया दाउदी, समन्वयक मनोज ठाकूर, समिना बोहरी, पुनम गुरबाणी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक श्रीमती. वंदना पाटील यांनी केले. यानंतर समन्वयक मनोज ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना, स्वर्गीय दादाजींच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात दिलेले भरीव योगदान तसेच कोणतेही कार्य करतांना त्यांनी आप-परभाव बाळगला नाही; आणि दुष्काळी परिस्थितीत जनतेला केलेली मदत व त्यांच्या अंगी असलेले प्रामाणिकपणा, सचोटी व पारदर्शकता ह्या चरित्र गुणांविषयी माहिती सांगितली. सोबतच स्व.दादाजी हस्तीमलजी जैन धैर्यशील, धाडसी व दृढनिश्चयी व्यक्तिमत्वाचे धनी होते. तसेच हस्तीमलजी हे एक व्यक्ती नसून; एक विचार प्रवाह, वैचारिक मूल्य आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक-शिक्षीका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वर्गीय दादाजी हस्तीमलजी जैन यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

## सप्तश्रृंगी गडावर पायी जाणाऱ्या भाविकांसाठी भोजन, वैद्यकीय सेवा उपलब्ध : अतुल सोनवणे

**धुळे, दि.५- वणी येथील सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकासांठी लोहणेर ठेंगोडे गावाच्या पुढे असणाऱ्या विठेवाडी येथील दत्तमंदिरात दि.७ ते १० एप्रिल या कालावधीत भोजन, वैद्यकीय सेवा व मोबाईल चार्जिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशी माहिती शिवसेना उबाठाचे जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे यांनी दिली.**

मागील तीस वर्षांपासून पायी जाणाऱ्या भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था केली जाते. विठेवाडीच्या दत्तमंदिर परिसरात दाट झाडी असल्याने भाविकांसाठी विश्रांतीसाठी सोय होते. आदिशक्तीच्या दर्शनासाठी श्रध्देने पायी चालत येणाऱ्या भक्तांच्या प्रकृती बिघडल्यास तातडीने उपचारासाठी डॉ.विलास बिरारीस, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.विरेंद्र गिरासे, डॉ.शकील देशमुख, डॉ.भरत पाटील, डॉ. प्रकाश पाटील, डॉ.मनिष वडनेरे, डॉ.मनोज जैन, डॉ.नितीन पाटील, डॉ.रविंद्र पाठक, डॉ. जितेंद्र पाटकर, डॉ.नितीन अमृतकर, डॉ.राहुल वाघ, डॉ. प्रशांत सोनवणे, कपिल लिंगायत, राहुल वाघ आदि वैद्यकीय सेवेसाठी तत्पर राहणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ दि.७ एप्रिल रोजी शिवसेना संपर्क प्रमुख अशोक धात्रक, खा.डॉ. शोभा बच्छाव, शिवसेनेच्या शुभांगी पाटील, मा.आ.अनिल गोटे, मा.आ. शरद पवार, देवळा येथील पंडीतराव निकम, अतुल आहेर, योगेश आहेर, धुळ्यातील नानासाहेब जाधव,प्रकाश पाटील, रमेश शिरसाठ, धनंजय शेडगे, हेमंत साळुंखे, माजी महापौर भगवान करनकाळ, नरेंद्र परदेशी, धिरज पाटील, भरत मोरे, दिपक सोनवणे, राजेंद्र जाधव, किरण हांडे, मंगेश पवार, छोटू पाटील, निंबा मराठे उपस्थित राहणार आहेत.

## धडगावला उद्या आदिवासी पावरा समाज सहविचार सभेचे आयोजन

**धडगाव, दि.५(प्रतिनिधी)- येथील कै. मानसिंग पाटील स्टेडीयम मध्ये दि.७ एप्रिल सोमवार रोजी सकाळी ११ वाजता आदिवासी पावरा समाज विचार मंच तर्फे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

आदिवासी पावरा समाज विचार मंचाने सन. २०२४ साली पावरा समाजहितासाठी काही ठराव केले होते. मात्र या ठरावांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०२४ साली केलेल्या ठरावांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, त्या ठरावामध्ये काही बदल करणे, तसेच आपले सर्वांच्या सहमतीने काही नविन ठराव आलेले आहेत ते सर्वांच्या सहमतीने समाविष्ट करणे. यासाठी अत्यंत महत्वाची सहविचार सभा आयोजित केली आहे.या सहविचार सभेस धडगांव तालुक्यातील सर्व सन्माननीय पोलीस पाटील, करवाण्या, कारभारी, डाया, सामाजिक कार्यकर्ते, समाज हितचिंतक, बुध्दीजिवी, नोकरदार कर्मचारी, अधिकारी, डॉक्टर, वकील, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पं.स. सदस्य, जि.प. सदस्य व समाजातील महिला वर्ग यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

तरी सदर सभेला समाजातिल सर्व स्तरातील लहान थोर मंडळीनी आपले समाजाप्रती दायीत्व समजुन आपल्या सुचना आणि कल्पनेसह अगत्याने येण्याचे करावे असे आवाहन धडगाव आदिवासी पावरा समाज विचार मंचचे अध्यक्ष धनसिंग दादला पावरा, सचिव फेंदा पारशी पावरा यांनी केले आहे.

## श्रीराम मंदिर देवस्थान (श्री भोंगे) येथे आज श्रीराम जन्मोत्सव

**शिरपूर, दि.५- श्रीराम मंदिर देवस्थान (श्री भोंगे) शिरपूर येथे ६ एप्रिल रोजी श्री अयोध्याधिश राजाधिराज श्रीरामरायांचा जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.**

बालाजी नगरी श्रीक्षेत्र शिरपूर येथील श्रीराम मंदिर देवस्थान (श्री भोंगे) यशवंत प्राथमिक विद्यालय समोर श्रीराम जन्मोत्सव सोहळा चैत्र शुक्लपक्ष ९, रविवार ६ एप्रिल ह्या शुभ दिवशी समस्त भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. यावेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली) श्रीक्षेत्र आळंदी, ह.भ.प. रामायणाचार्य प्रेममुती मच्छिंद्र जिभाऊ महाराज (वाडीभोकर), खालचे गाव श्री बालाजी संस्थान अध्यक्ष भूपेशभाई पटेल, बाल ब्रह्मचारी १००८ महंत सतिषदासजी महाराज भोंगे (मठाधिपती श्रीराम मंदिर देवस्थान, शिरपूर) यांचीप्रमुख उपस्थिती राहील. ६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १२ श्री महावैष्णव वारकरी संप्रदायाचे नियमानुसार



वारकरी भजन-संगीत सेवा, दुपारी ठिक १२ वाजता बाल-ब्रम्हचारी रामकृष्ण उपासक, गौ-सेवक १००८ महंत ह.भ.प. सतिषदासजी महाराज भोंगे तसेच माजी नगराध्यक्ष भूपेशभाई रसिकलाल पटेल, सौ. कृतिबेन भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते अयोध्याधिश राजाधिराज श्रीराम जन्मोत्सव मंगलमय प्रसंगी महाआरती करण्यात येणार आहे. दुपारी १२ ते रात्री १२ पर्यंत अखंडपणे दर्शन सोहळा व तिर्थ प्रसाद वाटप करण्यात येईल. चैत्र शुक्लपक्ष १०, सोमवार दि.७ एप्रिल रोजी श्रीराम नवरात्रौत्सव सांगता निमित्त महानैवेद्य आरती होऊन दुपारी १२ ते ४ वाजे पर्यंत महाप्रसाद भंडारा कार्यक्रम आयोजित केला आहे.

भाविकांनी सदर मंगलमय सोहळा, महाआरती, दर्शनाचा, तिर्थ प्रसाद व महाप्रसाद (भंडारा) याचा लाभ घ्यावा व अयोध्याधिश राजाधिराज श्रीरामराया यांच्या मंगलमय सोहळ्याची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी वे.शा.सं.मा. सागर संजय कुळकर्णी, वे.शा. सं. ह.भ.प. जयेश विवेक भोंगे, ह.भ.प. प्रथमेश प्रमोद भोंगे (उत्कृष्ट तबला वादक), बाल-वारकरी चि. विधीत जयेश भोंगे, ह.भ.प. प्रशांत रघुनाथ भोंगे उपस्थित राहतील.






## कारण नसतांना आदिवासी महिलेस मारहाण केल्याने सहा जणांविरोधात गुन्हा

**नंदुरबार, दि.५ (प्रतिनिधी)- काहीही एक कारण नसतांना पिंपर्डे ता.शहादा येथील ४५ वर्षीय आदिवासी महिलेस सहा जणांनी जातीवाचक शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याने शहादा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.**

असलोद गावाच्या बस स्थानक येथे २९ मार्च रोजी पीरबाबाकडे जाणाऱ्या रस्त्यावर २९ मार्च रोजी सकाळी ही घटना घडली. या प्रकरणी चार एप्रिल रोजी शहादा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल हिरालाल कात्रे, जितेंद्र भबूतराव कात्रे, जयू जितेंद्र कात्रे, उज्ज्वलाबाई हिरालाल कात्रे, मनिषा जितेंद्र कात्रे, व अन्नपुर्णाबाई भबूताराव कात्रे या सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस विभागीय अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु असून सहा जणांच्या विरोधात अट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पान १ वरुन

### टॉवर फाऊंडेशन चोरी करणारी टोळी

पंजाब यांचा समावेश आहे. या चौघांनाही ताब्यात घेण्यात आले असून चोरीस गेलेला मुद्देमाल टॉवर क्र.जे.०६ चे फाऊंडेशन टी-०१सेल मधील लोखंड व गुन्हा करतांना वापरलेला ट्रॉला क्र. आरजे ०९/डी-२९२८ व एक क्रेन क्र. एन एल ०४/डी-२८४० व मोबाईल असा एकुण सहासष्ट लाख सोळा हजारांचा मुद्देमाल जप्त करून चौघांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपाविभागीय पोलीस अधीकारी एस.आर.बांबळे, एल.सी.बी.चे पोनि. श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निजामपूर पोलीस स्टेशनचे अधिकारी सपोनि. मयुर भामरे, पोउनि. प्रदीप सोनवणे, मधुकर सोमासे, पोसई. गायकवाड, पोहेकॉ.प्रशांत ठाकूर,नारायण माळचे, रतन मोरे, नागेश्वर सोनवणे, प्रदीप आखाडे, पोना.खंडेराव पवार, सुनिल अहिरे, सागर थाटशिंगारे, पोकॉ.कृष्णा भिल, पृथ्वीराज शिंदे, गौतम अहिरे, प्रविण पवार यांनी केली.


**पाहिजेत**

रिसेप्शनिस्ट पाहिजे
मुलगा/मुलगी
-: संपर्क :-
द जीम
9096291888

**दुकान भाड्याने देणे आहे**

तळघर
(12x60=720 sq.ft.)
Graund floor
(12x40=450 sq.ft.)
गल्ली नं.२, लालबाग
मारोतीजवळ, धुळे
9403424581
9423191196

**पाहिजेत**

सेल्समन व अकौन्टंट पाहिजे.
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
सुनिल चौधरी
9423135555

**मुले पाहिजेत**

कुंडाणे (वार) साक्रीरोड व लळींग येथील पेट्रोल पंपासाठी अनुभवी मुले पाहिजेत तसेच हवा भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
9822107518

**पाहिजेत**

होजिअरी दुकानासाठी त्वरित लावणे आहे
हेल्पर- ०२
सेल्समन- ०२ (M/F)
संपर्क वेळ : ११ ते ५
-: संपर्क :-
9423495958
9403480041





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०